महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद येथील
कथित गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या
न्या. ए.के.ए.टी. शेख, )सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश(
चौकशी आयोगाच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने
शासनाने केलेल्या कार्यवाहीचा

# कृति अहवाल

अल्पसंख्यांक विकास विभाग

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद येथील कथित गैरव्यवहार व गैरव्यवस्थापनाची चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल देण्याच्या प्रयोजनासाठी **चौकशी आयोग अधिनियम, १९५२** (१९५२ चा ६० वा) च्या कलम ३ व ५ मधील तरतुदींनुसार शासन अधिसूचना महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण-१०/०७/प्र.क्र.१७५/ल-३, दि.०९.१०.२००७ अन्वये **न्या.ए.टी.ए.के.शेख, सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश** यांची चौकशी आयोग म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. न्या.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाने त्यांच्या दि.०७.०४.२०११ च्या पत्रान्वये त्यांच्या कार्यकक्षेतील अ.क्र.४, ५ व ६ येथील मुद्यांसंदर्भातील चौकशी अहवाल शासनास सादर केला आहे. आयोगाने त्यांच्या अहवालाची भाग-१, भाग-२ व भाग-३ अशा तीन भागात विभागणी केली आहे. या तीन भागांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे -

- **भाग-१** मध्ये विविध अनुक्रमणिका देण्यात आलेल्या आहेत.
- **भाग-२** मध्ये उपोद्घात (Preface), प्रस्तावना (Preamble) व आयोगाने प्रस्तावित केलेल्या एकूण २४ शिफारशी (Recommendations) व १ निरीक्षण यांचा समावेश आहे.
- **भाग-३** मध्ये आयोगापुढे प्राप्त झालेल्या तक्रारी, सदर तक्रारींचा तपशील, सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने केलेली एकूण ११३ प्रकरणांची तपासणी व त्यानुषंगाने आयोगाचे निष्कर्ष/शिफारशी यांचा समावेश आहे.

**न्या.ए.टी.ए.के.शेख,** चौकशी आयोगाने त्यांच्या अहवालात केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विधान मंडळाच्या पटलावर ठेवण्यात येत आहे. सदर कृती अहवाल एकूण ४ भागात असून यापैकी -

- **प्रकरण-१** मध्ये न्या.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाच्या स्थापनेमागील पार्श्वभुमी देण्यात आली आहे.
- **प्रकरण-२** मध्ये आयोगाच्या अहवालातील **भाग-१** बाबतची माहिती देण्यात आलेली आहे.
- **प्रकरण-३** मध्ये आयोगाच्या अहवालातील **भाग-२** मध्ये करण्यात आलेल्या शिफारशी व त्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीचा कृती अहवाल देण्यात आलेला आहे.
- **प्रकरण-४** मध्ये अहवालातील **भाग-३** मध्ये करण्यात आलेल्या शिफारशी व त्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीचा कृती अहवाल देण्यात आलेला आहे.

# प्रकरण-१

## न्या.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाच्या नियुक्तीची पार्श्वभुमी

**१.०** भारतात सन १९१३ पुर्वीच्या काळात अनेक वक्फ संस्था स्थापन करण्यात आलेल्या होत्या. या वक्फ संस्थांचे नियंत्रण करण्यासाठी त्या काळी Musalman Wakf Validating Act, 1913 हा कायदा पारित करण्यात आला व सर्व वक्फ संस्था या कायद्याच्या कार्यकक्षेत आणण्यात आल्या. कालांतराने, वक्फ संस्थांसाठी Musalman Wakf Validating Act, 1923 हा कायदा तर वक्फ खेरीज करुन अन्य धार्मिक संस्थांसाठी Charitable and Religious Trust Act, 1920 हा कायदा अस्तित्वात आला. याशिवाय अनेक राज्यांमध्ये त्यांचे स्वत:चे वक्फ विषयक कायदे अस्तित्वात होते. भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने वक्फ अधिनियम, १९५४ पारित करुन सर्व राज्य स्तरावरील वक्फ विषयक कायदे रद्द केले. तथापि, वक्फ अधिनियम, १९५४ हा कायदा महाराष्ट्र राज्यात केवळ मराठवाडा भागाला तर गुजरात राज्यात कच्छ भागाला लागू करण्यात आला होता व या दोन राज्यांच्या उर्वरित भागात Bombay Public Trust Act, 1950 हा कायदा लागू होता.

सद्य:स्थितीत वक्फ अधिनियम, १९९५ हा केंद्रिय कायदा दि.०१/०१/१९९६ पासून संपूर्ण देशात लागू झालेला असून या कायद्यातील कलम १३ व १४ येथील तरतुदींनुसार, शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र.वक्फ-१०/२००१/प्र.क्र.१५४/ ल-३, दि.४ जानेवारी, २००२ अन्वये पनचक्की, औरंगाबाद येथे मुख्यालय असलेल्या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. वक्फ अधिनियम, १९९५ या कायद्यात वक्फ (सुधारणा) अधिनियम, २०१३ अन्वये सुधारणा करण्यात आलेल्या असून सदर सुधारीत अधिनियम दि.१/११/२०१३ पासून अंमलात आलेला आहे.

**२.०** वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम १४ येथील तरतुदींनुसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळावर वेळोवेळी सदस्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. याच क्रमात शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र.वक्फ-१०/२००१/प्र.क्र.१५४/ल-३, दि.०२/०६/२००३ अन्वये डॉ.एम.ए. अजीज, यांची वक्फ मंडळाच्या अध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आली होती.

**डॉ.एम.ए.अजीज,** तत्कालिन अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्याविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद येथील कथित गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी महसूल व वन विभागाच्या गोपनीय अर्धशासकीय पत्र क्रमांक वक्फ-१०/२००५/ प्र.क्र.१२९/ल-३, दिनांक १९.१०.२००६ अन्वये श्री.सा.जा.कादरी, तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची "चौकशी अधिकारी" म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. श्री.सा.जा.कादरी यांनी सदर प्रकरणाची चौकशी करुन त्यांच्या क्र. म.रा.वक्फ मंडळ/ चौकशी/२१-अ, दिनांक ३१ मार्च, २००७ च्या पत्रान्वये त्यांचा चौकशी अहवाल शासनास सादर केला.

**श्री.सा.जा.कादरी,** चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या उपरोक्त चौकशी अहवालातील काही शिफारसी शासनाने स्वीकारल्या व सदर चौकशी अहवालात उल्लेखित नियमबाह्य गोष्टींची चौकशी

करुन त्याबाबतचा अहवाल देण्याच्या प्रयोजनासाठी चौकशी आयोग अधिनियम, १९५२ (१९५२ चा ६० वा) च्या कलम ३ व ५ मधील तरतुदींनुसार शासन अधिसूचना महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण-१०/०७/प्र.क्र.१७५/ल-३, दि.०९.१०.२००७ अन्वये **न्या.ए.टी.ए.के.शेख, सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश** यांची चौकशी आयोग म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. सदर आयोगाने उपरोक्त अधिसूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत आपला अहवाल शासनास सादर करावयाचा होता. तथापि, आयोगास अहवाल सादर करण्यासाठी वेळोवेळी मुदतवाढ प्रदान करण्यात आलेली आहे.

- **न्या.ए.टी.ए.के.शेख चौकशी आयोगाची कार्यकक्षा**

दि.०९.१०.२००७ च्या शासन अधिसूचने अन्वये न्या.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाची कार्यकक्षा पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आली होती :-

१. वक्फ अधिनियम, १९९५ च्या तरतुदींनुसार महाराष्ट्र राज्यात वक्फ मालमत्ता म्हणून कायदेशीररित्या संबोधण्यात आलेल्या मालमत्तांचे जिल्हानिहाय व क्षेत्रनिहाय तपशील तयार करणे,

२. वक्फ मालमत्ता म्हणून संबोधलेल्या मालमत्तांपैकी किती मालमत्तांवर व क्षेत्रांवर अतिक्रमणे झाली आहेत याचा शोध घेणे,

३. वक्फ मालमत्ता म्हणून संबोधलेल्या मालमत्तांपैकी किती मालमत्ता ह्या प्रत्यक्ष उक्त वक्फ मंडळाच्या ताब्यात आहेत, किती मालमत्ता (न्यायालयाच्या आदेशाशिवाय) इतर व्यक्ती किंवा संस्था यांच्या ताब्यात आहेत याचा शोध घेणे,

४. उक्त वक्फ मंडळ अस्तित्वात आल्यानंतर, महाराष्ट्र राज्यातील वक्फ मालमत्ता किंवा जमिनी यांची अवैधपणे करण्यात आलेली हस्तांतरणे, विकास किंवा निर्माण झालेले त्रयस्थ पक्षांचे हितसंबंध यांची विधिग्राह्यता तपासणे आणि ज्या मालमत्ता अवैधपणे हस्तांतरित किंवा विकसित करण्यात आल्या असतील किंवा ज्यात त्रयस्थ पक्षांचे हितसंबंध अवैधपणे निर्माण झाले असतील अशा मिळकती (न्यायप्रविष्ट प्रकरणे वगळून) वक्फ मंडळाकडे पुन:स्थापित करण्यासाठीच्या योजना सुचविणे, उक्त वक्फ मंडळाच्या मालमत्ता किंवा जमिनींच्या गैरव्यवस्थापनासाठी जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवरील जबाबदारी निश्चित करणे,

५. वक्फ मालमत्तांच्या सुरळीत व प्रभावी व्यवस्थापनासाठी, ज्या मालमत्तांमधून उत्पन्न मिळू शकेल आणि उक्त वक्फ मंडळ स्वतंत्ररित्या व्यवस्थापन करु शकेल यासाठीच्या योजना सुचविणे आणि वक्फ मालमत्तांवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी उपाययोजना सुचविणे,

६. वक्फ मालमत्तांच्या अवैध हस्तांतरणासाठी, विकासासाठी किंवा त्रयस्थ व्यक्तींचे हितसंबंध निर्माण होण्यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तिंवरील जबाबदारी निश्चित करणे.

***टीप :*** *आयोगाने कोणत्या काळापासूनची प्रकरणे चौकशीसाठी घ्यावी ही बाब वरील अधिसूचनेत स्पष्ट करण्यात आली नव्हती. आयोगाने सर्व प्रकरणांची चौकशी केलेली नसून केवळ त्यांच्याकडे ज्या ज्या प्रकरणासंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या अशा प्रकरणांची तसेच काही प्रकरणांमध्ये वर्तमानपत्रात छापून आलेल्या बातम्यांआधारे, अशा प्रकारे एकूण ११३ प्रकरणांची चौकशी करुन अहवाल सादर केला आहे.*

**३.०** न्या.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाने त्यांच्या कार्यकक्षेतील अ.क्र.४, ५ व ६ येथील मुद्यांसंदर्भातील चौकशी अहवाल दि.०७.०४.२०११ च्या पत्रान्वये शासनास सादर केला असून मुद्दा क्र.१, २ व ३ चे स्वरुप व्यापक असल्याचे नमूद करुन पुरेसा कर्मचारीवृंद व साधनसामुग्री अभावी सदर मुद्दा क्र.१, २ व ३ बाबत अहवाल सादर करण्यास असमर्थता व्यक्त केली आहे.

मंत्रालय इमारतीला गुरुवार, दि.२१/०६/२०१२ रोजी लागलेल्या आगीत इमारतीच्या ४थ्या, ५व्या, ६व्या व ७व्या मजल्यावरील बहुतांश कार्यालये/दालने व तेथे ठेवण्यात आलेले अभिलेख/धारिका पूर्णत: भस्मसात झालेल्या आहेत. तत्कालीन अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, यांच्या दालनाचाही (खोली क्र.६२९-विस्तार, ६वा मजला) भस्मसात झालेल्या दालनांमध्ये समावेश होता व सदर दालन व तेथील संपूर्ण अभिलेख देखील सदर आगीत नष्ट झाले. **न्या.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाने दि.०७.०४.२०११ च्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालाची मूळ प्रत, सहपत्रे व सी.डी. याच दालनात ठेवण्यात आलेली होती व ही सर्व सामग्री आगीत नष्ट झालेली आहे.** केवळ, अहवालाची सी.डी. वरुन घेण्यात आलेली सॉफ्ट कॉपी सुरक्षित होती.

वरील पार्श्वभुमीवर दि.२३/०७/२०१२ च्या शासन पत्रान्वये न्या.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाला त्यांच्या अहवालाची स्वाक्षऱ्या असलेली प्रत व सहपत्रांची प्रतिलिपी शासनास उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरुन न्या.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाने त्यांच्या दि.२७/०९/२०१२ च्या पत्रान्वये सदर अहवालाची स्वाक्षऱ्या असलेली प्रत उपलब्ध करुन दिली आहे. तथापि, सहपत्रांचे जतन करण्यात न आल्याने सदर सहपत्रांची प्रत उपलब्ध करुन देण्यास आयोगाने असमर्थता व्यक्त केली आहे .

**४.०** **न्या.ए.टी.ए.के.शेख,** चौकशी आयोगाने त्यांच्या उपरोक्त अहवालाची भाग-१, भाग-२ व भाग-३ अशा एकूण ३ भागांत विभागणी केलेली आहे. भाग-१ मध्ये विविध अनुक्रमणिका देण्यात आलेल्या आहेत. भाग-२ मध्ये उपोद्घात (Preface), प्रस्तावना (Preamble) व आयोगाने प्रस्तावित केलेल्या योजना (Schemes) यांचा समावेश आहे. भाग-३ मध्ये आयोगापुढे प्राप्त झालेल्या तक्रारी, सदर तक्रारींचा तपशील, सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयोगापुढे झालेल्या कामकाजाचा तपशील, व आयोगाचे निष्कर्ष यांचा समावेश आहे.

- **भाग-१** मध्ये विविध अनुक्रमणिका देण्यात आलेल्या आहेत. **(जोडपत्र-२)**
- **भाग-२** मध्ये उपोद्घात (Preface), प्रस्तावना (Preamble) व आयोगाने प्रस्तावित केलेल्या शिफारशी (Recommendations) यांचा समावेश आहे. त्याशिवाय या भागात आयोगाने एकूण २४ शिफारशी केल्या असून १ निरीक्षण नोंदविले आहे. (**जोडपत्र-३**).
- **भाग-३** मध्ये आयोगापुढे प्राप्त झालेल्या तक्रारी, सदर तक्रारींचा तपशील, सदर तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने केलेली तपासणी व आयोगाचे निष्कर्ष/शिफारशी यांचा समावेश आहे. **(जोडपत्र-४)**.

*********

## प्रकरण-२

# न्या.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाच्या अहवालातील भाग-१
## (अहवालातील पृष्ठ १ ते ३०)

अहवालाच्या भाग-१ मध्ये पुढे नमूद केल्याप्रमाणे विविध अनुक्रमणिका देण्यात आलेल्या आहेत-

१) अहवालातील पृष्ठ १ ते ७ येथे सर्वसाधारण अनुक्रमणिका देण्यात आलेली आहे.

२) आयोगाने चौकशी केलेल्या वक्फ संपत्तींची अहवालनिहाय अनुक्रमणिका चौकशी अहवालातील पृष्ठ ८ ते १४ येथे दर्शविण्यात आलेली आहे.

३) आयोगाने चौकशी केलेल्या वक्फ संपत्तींची तक्रारनिहाय अनुक्रमणिका चौकशी अहवालातील पृष्ठ १४ ते २० येथे दर्शविण्यात आलेली आहे.

४) आयोगाने चौकशी केलेल्या वक्फ संपत्तींची जिल्हानिहाय अनुक्रमणिका चौकशी अहवालातील पृष्ठ २१ ते २९ येथे दर्शविण्यात आलेली आहे.

५) आयोगाने चौकशी अहवालात ज्या अधिकाऱ्यांना अनियमिततेसाठी व्यक्तिश: जबाबदार धरले आहे त्यांची अधिकारीनिहाय याद्या, ज्यामध्ये ज्या प्रकरणांत या अधिकाऱ्यांना आयोगाने जबाबदार धरले आहे त्याप्रकरणांची अनुक्रमणिका दर्शविण्यात आलेली आहे, चौकशी अहवालातील पृष्ठ ३० ते ३३ येथे दर्शविण्यात आलेल्या आहेत.

६) आयोगाने चौकशी अहवालात अनियमिततेसाठी ज्या प्रकरणांमध्ये जिल्हा वक्फ अधिकाऱ्यांना जबाबदार धरले आहे अशा प्रकरणांची अनुक्रमणिका चौकशी अहवालातील पृष्ठ ३४ ते ३५ येथे दर्शविण्यात आलेली आहे.

७) आयोगाने चौकशी अहवालात अनियमिततेसाठी व्यक्तिश: जबाबदार धरलेल्या वक्फ मंडळ सदस्यांची/अधिकाऱ्यांची नांवे व संबंधित प्रकरणांची अनुक्रमणिका चौकशी अहवालातील पृष्ठ ३५ ते ३८ येथे दर्शविण्यात आलेली आहे. यामध्ये ज्या प्रकरणांमध्ये आयोगाने मुतवल्लींना जबाबदार धरले आहे अशा प्रकरणांची अनुक्रमणिका चौकशी अहवालातील पृष्ठ ३६ ते ३८ येथे दर्शविण्यात आलेली आहे.

८) आयोगाने चौकशी अहवालात अनियमिततेसाठी ज्या प्रकरणांमध्ये मंत्री महोदय व संबंधित वकिलांना जबाबदार धरले आहे अशा प्रकरणांची अनुक्रमणिका चौकशी अहवालातील पृष्ठ ३९ येथे दर्शविण्यात आलेली आहे.

*************

## प्रकरण-३

## न्या.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाच्या अहवालातील भाग-२
**(अहवालातील पृष्ठ ३१ ते ८८)**

आयोगाच्या अहवालातील भाग-२ च्या सुरुवातीस उपोद्घात (Preface) (पृष्ठ ३१) व तद्नंतर पृष्ठ क्र. ४२ ते ७० येथे प्रस्तावना (Preamble) देण्यात आलेली आहे. असून सदर प्रस्तावनेच्या सुरुवातीस आयोगाने स्वत:ची कार्यकक्षा नमूद केली आहे. तद्नंतर आयोगाने असे नमूद केले आहे की, आयोगास सोपविण्यात आलेल्या कामाचे व्यापक स्वरुप विचारात घेता तसेच, महसूल विभाग, जिल्हा भूमी अभिलेख निरीक्षक व नगर भूमापन कार्यालय या कार्यालयांकडून अपेक्षित असलेला सहकार्य विचारात घेता दि.२०.०३.२००९ रोजी सदर चौकशी आयोग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत प्रधान सचिवांनी असे निदेश दिले की, आयोगाने त्यांच्या कार्यकक्षेतील अनुक्रमांक ४, ५ व ६ येथील मुद्यांबाबत चौकशी करावी व अनुक्रमांक १, २ व ३ येथील बाबीं संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निदेश दिले. (अहवालातील पृष्ठ ४३)

***अभिप्राय :*** *वरील परिच्छे क्र.५.० प्रमाणे.*

**६.१ आयोगाच्या अधिकारांवरील निर्बंध (Restrictions on Powers) :**

अहवालातील पृष्ठ क्र.३१ येथे आयोगाने असे नमूद केले आहे की, आयोगाची स्थापना करण्याविषयीच्या अधिसूचनेतील सर्वसाधारण निदेश (General Directions) च्या परिच्छेद ६ येथे नमूद केल्यानुसार आयोगाची स्थापना Commission of Enquiries Act च्या कलम ५ मधील उपकलम क्र. २, ३ व ५ अंतर्गत करण्यात आलेली आहे. सदर उपकलमांतील तरतुदींनुसार चौकशी आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्राप्त आहेत. तथापि, सदर कायद्यातील कलम ५ मधील उपकलम ४ मध्ये नमूद अधिकार सदर आयोगास प्रदान करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे आयोगाला फौजदारी प्रक्रिया संहितेचे अधिकार मिळाले नाहीत. परिणामी, ज्या लोकांनी आयोगास माहिती पुरविली नाही अशा लोकांविरुध्द फौजदारी न्यायालयाकडे आयोगास दाद मागता आलेली नाही. तसेच, पोलीस विभागाला आदेश/निर्देश देता आलेले नाहीत. आयोगाने एका प्रकरणी समन्स बजावण्याकरिता बीड पोलिसांचे सहकार्य मागितले असता त्यांनी आयोगाचे पत्र स्वीकारण्यासही नकार दिला. (अहवालातील पृष्ठ क्र.३१).

***अभिप्राय :*** *याबाबत आता कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.*

**६.२ आयोगाचे कार्यक्षेत्र (Jurisdiction of Commission)** : आयोगाची स्थापना करण्याविषयीच्या अधिसूचनेतील कलम ४ (Clause IV) येथे आयोगाचे कार्यक्षेत्र नमूद करण्यात आले असून त्याची आयोगाने पुढीलप्रमाणे तीन भागात विभागणी केली आहे :-

(अ) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची स्थापना झाल्यानंतर राज्यातील वक्फ मालमत्तांचे बेकायदेशीर हस्तांतरण, विकास किंवा तिसऱ्या पक्षाच्या अधिकारांची निर्मिती या बाबींची वैधता तपासणे.

(ब) बेकायदेशीररित्या हस्तांतरण झालेल्या किंवा विकास करण्यात आलेल्या किंवा बेकायदेशीररित्या तिसऱ्या पक्षांचे अधिकारांचे निर्मिती झालेल्या (न्यायप्रविष्ट प्रकरणे वगळून) मालमत्ता वक्फ मंडळाकडे पुर्ववत करण्याच्या दृष्टीने योजना (Scheme) सुचविणे.

(क) वक्फ मंडळाच्या मालमत्ता/जमिनी च्या गैरव्यवस्थापना संदर्भात जबाबदारी निश्चित करणे.

बेकायदेशीर हस्तांतरणाची वैधता तपासणे व जबाबदारी निश्चित करणे यासाठी उपरोक्त तरतूदींनुसार आयोग सक्षम आहे. तथापि, न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये बेकायदेशीररित्या हस्तांतरण झालेल्या व इतर वक्फ संपत्ती वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्यासंदर्भात आयोगाचे अधिकार वस्तुत: निर्बंधित असल्याने काही प्रकरणांमध्ये कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली नसल्याचे आयोगाने नमूद केले आहे. (अहवालातील पृष्ठ ३२ ते ३३)

***अभिप्राय :*** *यासंदर्भात शासन स्तरावरुन कार्यवाही अपेक्षित नाही.*

**६.३ ज्वलंत समस्या (Burning Problems) :**

आयोगाचे कार्यालय हे शहरापासून लांब असल्याने खाजगी व्यक्तींनाही तेथे पोहोचणे खर्चिक व गैरसोयीचे होते, परिणामी खाजगी व्यक्तिंकडून माहिती गोळा करण्यासही आयोगास मर्यादा होत्या. परिणामी आयोगाकडे माहिती गोळा करण्यासाठी वक्फ मंडळ हे एकमेव स्त्रोत होते व त्यांच्याकडून सहकार्य मिळालेले नाही, असे नमूद करुन आयोगाने काही अधिकाऱ्यांच्या नावाचा व काही प्रकरणांचा सविस्तर उल्लेख केला असून सदर अधिकाऱ्यांची नावे व प्रकरणांचा तपशील पृष्ठ ४७ ते ५१ येथे कृपया पहावा. काही मुतवल्ली, वक्फ मंडळाचे अध्यक्ष व सदस्य देखील अन्याय्य लाभ मिळवण्याच्या हेतूने गैरकृत्यांमध्ये सामील झाल्याचे आयोगाने नमूद केले असून वक्फ संपत्ती ही सर्वसामान्यांच्या वापरासाठी व हितासाठी असल्याचे व त्याचे उल्लंघन होत असल्यास त्याविरुध्द तक्रार करण्याविषयी सर्वसामान्य जनतेमध्ये जनजागृती मोहीम राबविणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे. लोकांच्या तक्रारींची योग्य ती दखल घेतली जात नसल्याने वक्फ मालमत्ता संदर्भातील तक्रारींचे निवारण करण्यासाठी एका विशिष्ट संवर्गातील अभिकरणाची नियुक्ती शासनाने करावी अशी आयोगाने शिफारस केलेली आहे. (पृष्ठ ३४)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *आयोगाने अहवालात नावानिशी उल्लेख केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून स्पष्टीकरण मागवून कार्यवाही करण्याबाबत तसेच आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे तक्रार निवारणासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याबाबत वक्फ मंडळाला निदेश देण्यात आलेले आहे.*

### ६.४ वक्फ जमिनीवरील शासकीय अतिक्रमण :

शहर व नागरी वसाहतीतील वा त्या जवळील बहुतेक वक्फ मालमत्ता अनधिकृतपणे शासकीय व निमशासकीय यंत्रणांच्या ताब्यात असल्याचे आयोगाने आपल्या अहवालात नमूद केले असून अशा यंत्रणांकडून वक्फ मंडळास बाजारभावाने भाडे भरणे अनिवार्य करणे गरजेचे आहे. (पृष्ठ ३४)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *वक्फ अधिनियम, १९९५ मधील सुधारीत तरतुदींनुसार, शासकीय व निमशासकीय यंत्रणांच्या ताब्यात असलेल्या वक्फ मालमत्तांसंदर्भात बाजारभावाने भाडे आकारुन वसुली करण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात आलेले आहेत.*

### ६.५ नैराश्यवादी दृष्टीकोण (Pessimistic Approach) :

वक्फ मालमत्तांकडे बघण्याचा केवळ वक्फ मंडळ वा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचाच नव्हे तर सर्वसामान्य जनतेचाही दृष्टीकोण नैराश्यवादी होता व आताही तो तसाच असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. या पुष्टयर्थ आयोगाने मौलाना आझाद एज्युकेशनल ट्रस्ट, औरंगाबाद चे उदाहरण दिले आहे. सदर ट्रस्टला दिनांक ०३.११.१९६१ रोजी १९५ एकर वक्फ जमीन लीज वर देण्यात आलेली आहे. तथापि, सद्य:स्थितीत या ट्रस्टच्या ताब्यात सुमारे ३० एकर इतकीच जमीन असून उर्वरित १६५ एकर जमिनीचे काय झाले आहे, याचे सदर ट्रस्ट कडे उत्तर नाही. यासंदर्भात आयोगाने नमूद केलेली इतर उदाहरणे पृष्ठ ३७ ते ४० येथे कृपया पहावीत.

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *वक्फ मालमत्तांच्या तपशिलास व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे, राज्यातील वक्फ मालमत्तांची सद्य:स्थिती काय आहे, त्या कोणाच्या ताब्यात आहेत, अतिक्रमणे असल्यास ती हटवून वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना करणे आवश्यक आहे, या बाबींचा सखोल अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्याच्याही वक्फ मंडळाला सूचना देण्यात आलेल्या आहेत.*

### ६.६ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेले असहकार्य :

ज्या प्रकरणांमध्ये आयोगाने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना समन्स पाठविले, तथापि, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांना प्रतिसाद दिलेला नाही, अशा प्रकरणांचा तपशील पृष्ठ ४० ते ५१ येथे कृपया पहावा.

ज्या प्रकरणांमध्ये आयोगाने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अजामीनपात्र समन्स पाठविले तसेच दंडाची आकारणी केली आहे, अशा प्रकरणांचा तपशील पृष्ठ ५० येथे कृपया पहावा.

एका प्रकरणांमध्ये आयोगाने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांविरुध्द सन्माननीय उच्च न्यायालयात तक्रार दाखल केली असून सदर तक्रार सन्माननीय उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ८११४/२००९

म्हणून दाखल केलेली आहे. आयोगाने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याविरुध्द विभागीय आयुक्त यांचेकडे माहिती अधिकारांतर्गत तक्रार दाखल केली होती. याबाबतचा तपशील पृष्ठ ५१ येथे कृपया पहावा.

ज्या प्रकरणांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्रोटक अहवाल सादर केला आहे अशा प्रकरणांची यादी पृष्ठ ५१ येथे कृपया पहावा.

***करण्यात आलेली कार्यवाही*** *: आयोगाने अहवालात उल्लेख केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून स्पष्टीकरण मागवून कार्यवाही करण्याबाबत वक्फ मंडळाला निदेश देण्यात आलेल्या आहेत.*

**६.७ जिल्हा वक्फ अधिकारी यांनी केलेले असहकार्य :**

ज्या प्रकरणांमध्ये आयोगाने जिल्हा वक्फ अधिकारी यांना समन्स पाठविले, तथापि, जिल्हा वक्फ अधिकारी यांनी त्यांना प्रतिसाद दिलेला नाही, अशा प्रकरणांचा तपशील पृष्ठ ५१ ते ५७ येथे कृपया पहावा.

***करण्यात आलेली कार्यवाही*** *: आयोगाने अहवालात उल्लेख केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांकडून स्पष्टीकरण मागवून कार्यवाही करण्याबाबत वक्फ मंडळाला निदेश देण्यात आलेल्या आहेत.*

**६.८ आयोगाने विविध कार्यालयाशी केलेला पत्रव्यवहार :**

आयोगाने विविध कार्यालयांना पाठविलेले समन्स व त्यांच्याकडून प्राप्त झालेले उत्तर/अहवाल याबाबतचा तपशील पृष्ठ ५८ ते ५९ येथे कृपया पहावा.

**६.९ महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी केलेले अधिकार कक्षेचे उल्लंघन :**

महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी ज्या प्रकरणांमध्ये त्यांच्या अधिकार कक्षेचे उल्लंघन केले आहे, अशा प्रकरणांचा तपशील पृष्ठ ६० ते ६१ येथे कृपया पहावा.

***करण्यात आलेली कार्यवाही*** *: आयोगाने उल्लेख केलेल्या महसुली अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्याबाबत महसूल विभागाला सूचना देण्यात आलेल्या आहेत.*

**६.१० आयोगाच्या कार्यालयासाठी जागा/सोयी-सुविधा/कर्मचारीवृंद/अनुदान :**

आयोगाने त्यांच्या कार्यालयासाठी योग्य जागा मिळण्याविषयी विविध कार्यालयांशी केलेल्या पत्रव्यवहाराचा तपशील अहवालातील पृष्ठ ६१ ते ६२ येथे व सोयी-सुविधा संदर्भातील तक्रारीचा तक्ता अहवालातील पृष्ठ ६३ ते ६४ येथे, आवश्यक कर्मचारीवृंदासंदर्भातील पत्रव्यवहाराचा तपशील पृष्ठ ६४ ते ६५ येथे तसेच आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानाचा तसेच अनुदान मुक्त करण्यास झालेल्या विलंबाचा तपशील पृष्ठ ६५ ते ६७ येथे कृपया पहावा.

***अभिप्राय :*** *आयोगाचे कामकाज आता संपुष्टात आले असल्याने याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.*

**६.११ सेनेतील अधिकाऱ्यांनी आयोगाच्या कामकाजात निर्माण केलेले अडथळे :**

आयोगाचे कार्यालय औरंगाबाद शहरातील निजाम बंगला भागात असून सदर भाग मिल्ट्री परिसरात मोडतो. त्यामुळे आयोगाच्या कार्यालयात येण्यासाठी स्वत: आयोग, आयोगाचे कर्मचारी व सामान्य जनता यांना सैनिक परिसरातून यावे लागते. त्यावेळी या सगळयांची सैनिक अधिकाऱ्यांकडून अकस्मात तपासणी केली जात असे व ते सर्व संबंधितांसाठी गैरसोयीचे ठरत होते. यासंदर्भात आयोगाने जिल्हाधिकारी व तर प्राधिकरणांकडे सैनिकी अधिकाऱ्यांविरुध्द केलेल्या तक्रारींची तपशील अहवालातील पृष्ठ ६८ येथे कृपया पहावा.

***अभिप्राय :*** *आयोगाचे कामकाज आता संपुष्टात आले असल्याने याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.*

**६.१२ विद्युत पुरवठा/संगणक/प्रिंटर :**

आयोगाच्या कार्यालयास पुरविण्यात आलेल्या विद्युत पुरवठा, संगणक व प्रिंटर विषयीच्या आयोगाच्या तक्रारींचा तपशील पृष्ठ ६८ ते ७० येथे कृपया पहावा.

***अभिप्राय :*** *आयोगाचे कामकाज आता संपुष्टात आले असल्याने याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.*

## आयोगाने केलेल्या सर्वसाधारण शिफारशी (General Recommendations) : (अहवालातील पृष्ठ ७१ ते ८८)

**७.०** वक्फ मंडळातील विविध विषयांसंदर्भात आयोगाने एकूण २४ शिफारसी केल्या असून आयोगाने या शिफारशींना योजना (Schemes) असे संबोधले आहे. त्याशिवाय एक निरीक्षण नोंदविले आहे. आयोगाने सुचविलेल्या २४ योजना/शिफारशींपैकी एकूण १५ योजना/शिफारशी मान्य करण्यात आलेल्या असून त्याशिवाय ५ शिफारशी अंशत: मान्य करण्यात आलेल्या आहेत व उर्वरित ४ शिफारशी अमान्य करण्यांत आलेल्या आहेत. या योजनांचा/शिफारशींचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

**७.१ वक्फ मालमत्तांचे संगणकीकरण :**

वक्फ मंडळाच्या कामकाजात पारदर्शकता निर्माण व्हावी याद्दष्टीने राज्यातील सर्व वक्फ मालमत्तांचे संगणकीकरण करण्यात यावे व ते अद्ययावत तपशिलासह वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावे, जेणेकरुन सर्वसामान्य जनतेला वक्फ मालमत्तांवर नजर ठेवता येईल व आवश्यकतेनुसार संबंधित जिल्हा वक्फ अधिकारी वा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांचेकडे तक्रार नोंदविणे शक्य होईल, अशी योजना आयोगाने सुचविली आहे. (पृष्ठ ७१)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस* ***मान्य*** *करण्यात आली आहे. वक्फ मालमत्तांचे संगणकीकरण करण्याचे काम करण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेला असून त्यामधून सदरचे काम प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत वक्फ मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या सर्व अभिलेखाचे संगणकीकरण करुन सदर माहिती वक्फ मंडळाच्या वेबसाईट वर अपलोड करण्यात आलेली आहे.*

*(मान्य-१)*

**७.२ वक्फ मालमत्तांचे सर्व्हेक्षण :**

वक्फ मंडळाने राज्यातील वक्फ मालमत्तांचे सर्व्हेक्षण सहा महिन्याच्या आत पूर्ण करुन ते वेबसाईटवर उपलब्ध करुन द्यावे. जेणेकरुन सर्वसामान्य जनतेला वक्फ मालमत्तांवर नजर ठेवता येईल व आवश्यकतेनुसार संबंधित जिल्हा वक्फ अधिकारी वा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांचेकडे तक्रार नोंदविणे शक्य होईल, अशी योजना आयोगाने सुचविली आहे. (पृष्ठ ७१)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस* ***मान्य*** *करण्यात आली आहे. वक्फ अधिनियमातील तरतुदींनुसार वक्फ मंडळाला राज्यातील वक्फ मालमत्तांचे सर्व्हेक्षण करण्याचे अधिकार प्राप्त नाहीत. या उद्दिष्टाकरिता राज्य शासनाने सर्व्हेक्षण आयुक्तांची नियुक्ती करावयाची असते. वक्फ अधिनियम, १९९५ मधील सुधारीत तरतुदींनुसार दुसरे सर्व्हेक्षण आयुक्त नियुक्त करण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे.*

*(मान्य-२)*

**७.३ मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद न्यायालयीन संवर्गातून भरणेबाबत :**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अर्धन्यायायिक स्वरुपाचे काम करावे लागते. त्यामुळे या पदावरील अधिकाऱ्याला कायद्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. सबब, वक्फ मंडळात न्यायायिक स्वरुपाच्या कामकाजासाठी एक व प्रशासकीय कामकाजासाठी एक असे एकूण दोन मुख्य कार्यकारी अधिकारी नेमण्यात यावेत, व न्यायायिक मुख्य कार्यकारी अधिकारी हा उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली ठेवण्यात यावा तसेच, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने वक्फ मंडळाच्या कामकाजावर बारकाईने लक्ष ठेवावा व आवश्यकतेनुसार वक्फ अधिनियमातील कलम २६ अंतर्गतचे अधिकार वापरावेत व यामध्ये त्याच्याकडून कसूर झाल्यास त्यासाठी त्याला व्यक्तिश: जबाबदार धरण्यात यावे, अशी योजना आयोगाने सुचविली आहे. (पृष्ठ ७१)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस* ***अंशत: मान्य*** *करण्यात आली आहे. दोन मुख्य कार्यकारी अधिकारी नेमण्याची शिफारस वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींशी विसंगत आहे. तथापि, मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर न्यायालयीन संवर्गातील अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याच्या दृष्टीने संबंधित नियमांमध्ये सुधारणा करण्यात आलेली असून त्यानुसार न्यायालयीन संवर्गातील अधिकाऱ्याची मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नियुक्ती देखील करण्यात आलेली आहे.*

*(अंशत: मान्य-१)*

### ७.४ **वक्फ मंडळात विधी विभागाची स्थापना :**

वक्फ मंडळात एक स्वतंत्र विधी विभागाची स्थापना करण्यात यावी. सदर विभागात एक विधी अधिकारी, दोन लिपिक व एक शिपाई असावा. संपूर्ण राज्यात वक्फ मंडळाने दाखल केलेले किंवा वक्फ मंडळाविरुध्द दाखल करण्यात आलेले न्यायालयीन प्रकरणांचे कामकाज सदर विभागाने हाताळावे. वक्फ मंडळाने एका विधी अधिकाऱ्याची नियुक्ती करावी व तो मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या अधिनस्त न ठेवता थेट वक्फ मंडळाच्या अधिनस्त ठेवण्यात यावा. सदर अधिकाऱ्याला जिल्हा न्यायालयातील १० वर्षांचा अथवा उच्च न्यायालयातील ७ वर्षांचा अनुभव असावा व त्याने या न्यायालयांपुढे वक्फशी संबंधित प्रकरणे हाताळलेली असावी. सदर विधी अधिकाऱ्याने वक्फ मंडळाच्या सर्व याचिका/अपील/ लेखी निवेदन इ. चे मसुदे तयार/मान्य करावे. त्याने सर्व न्यायालयीन प्रकरणांवर बारकाईने लक्ष ठेवावे व संबंधित वकिलांना वेळोवेळी योग्य ते निर्देश द्यावेत. त्याला कोणत्याही वरिष्ठ वकिलाचा सल्ला घेण्याची मुभा असावी व त्यापोटी येणारा खर्च वक्फ मंडळाने सोसावा. वक्फ मंडळाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने विधी अधिकाऱ्याला न दाखवता न्यायालयात थेट उत्तर वा लेखी निवेदन सादर केल्यास असा कर्मचारी प्रशासकीय कारवाईस पात्र ठरेल व त्याप्रकरणी वक्फ मंडळाला होणाऱ्या नुकसानीसंबंधी त्याला जबाबदार धरण्यात यावे, अशी योजना आयोगाने सुचविली आहे. (पृष्ठ ७१)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस **मान्य** करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या आस्थापनेची पुनर्रचना करुन औरंगाबाद येथील मुख्यालय व्यतिरिक्त नाशिक, पुणे, नागपूर, अमरावती व कोकण येथे ५ प्रादेशिक कार्यालये सुरु करण्याचा वक्फ मंडळाच्या प्रस्तावास शासनाने सहमती प्रदान केलेली आहे. सदर पुनर्रचित आस्थापनेत औरंगाबाद येथील मुख्यालयासाठी एक विधी अधिकारी व तीन विधी सहाय्यक तर प्रत्येक प्रादेशिक कार्यालयासाठी एक विधी सहाय्यकाचे पद मंजूर करण्यास शासनाची सहमती प्रदान करण्यात आलेली आहे.*

*(मान्य-३)*

### ७.५ **वक्फ मंडळासाठी वकिलांचे पथक (Panel of Advocates) :**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने अनुभवी व तज्ञ वकिलांचे एक पथक नेमावे. मंडळाने सदर पॅनेलवरील वकिलांकडून मासिक अहवाल मागवावा ज्यामध्ये संबंधित वकिलांनी वक्फ न्यायाधिकरण किंवा इतर न्यायालयापुढील ज्या प्रकरणांत त्यांनी मंडळाची बाजू मांडलेली आहे त्या प्रकरणाच्या घडामोडी, निर्णय व निर्णय जर मंडळाच्या विरोधात गेला असेल तर त्याची कारणे व त्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही याबाबतचा तपशिल असावा. पथकावरील प्रत्येक वकिलाच्या कामगिरीचा दर दोन वर्षांनी आढावा घेण्यात यावा व एखाद्या वकिलाची कामगिरी असमाधानकारक आढळल्यास त्याच्यावर त्याला काढून का टाकण्यात येऊ नये, या विषयीची कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी व त्याचा खुलासा असमाधानकारक आढळून आल्यास स्वयंस्पष्ट व कारणे दर्शविणाऱ्या आदेशाद्वारे अशा

वकिलाला पथकावरुन काढून टाकण्यात यावे. पथकावरील वकिलांना अतिरिक्त सरकारी वकिलांना प्रदान करण्यात येणाऱ्या दराने मोबदला देण्यात यावा, अशी योजना आयोगाने सुचविली आहे. (पृष्ठ ७२)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस* ***मान्य*** *करण्यात आली असून असे पथक अस्तित्वात आहे.*

*(मान्य-४)*

**७.६ प्रत्येक जिल्ह्यात दोन लिपिकांची नियुक्ती करणेबाबत :**

वक्फ मंडळाने प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन ईश्वराची भिती बाळगणाऱ्या लिपिकांची भरती करावी. सदर लिपिकांनी संबंधित जिल्ह्यातील प्रत्येक वक्फ संपत्तीला किमान दोन वर्षातून एक वेळा प्रत्यक्ष भेट द्यावी व संबंधित वक्फ मालमत्ता अधिकृत व्यक्तिच्या ताब्यात आहे किंवा कसे, याबाबत अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करावा. तसेच सदर लिपिकांनी संबंधित उपनिबंधकाच्या कार्यालयाला भेट द्यावी व कोणत्याही वक्फ मालमत्तेचा विक्री करार (Sale Deed) झालेला आहे किंवा कसे, याची चौकशी करावी व असा व्यवहार झाल्याचे आढळून आल्यास त्याचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करावा. लिपिकाने सादर केलेला अहवाल वस्तुस्थितीच्या विरुध्द असल्याचे आढळून आल्यास तो प्रशासकीय कारवाईस पात्र ठरेल तसेच झालेल्या नुकसानीस जबाबदार राहील. उपनिबंधकांनी विक्री कराराची नोंदणी करताना संबंधित मालमत्ता इनाम आहे किंवा कसे, याची खात्री करावी व तसे असल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ आणि जिल्हा वक्फ अधिकारी यांना तसे सूचीत करुन नोंदणी करण्याची कार्यवाही ७ दिवसांसाठी स्थगित करावी. मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ आणि जिल्हा वक्फ अधिकारी यांनी सदर ७ दिवसांच्या आत आपली बाजू उपनिबंधकापुढे मांडावी व तद्नंतर उपनिबंधकाने नोंदणी करणासंबंधी पुढील कार्यवाही करावी. उपनिबंधकांनी विक्री कराराची नोंदणी करण्याचा निर्णय घेतल्यास त्याची प्रत तात्काळ मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ आणि जिल्हा वक्फ अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावी. उपनिबंधकाची कार्यवाही वक्फ हिताच्या विरुध्द असल्यास त्याविरुध्द आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ आणि जिल्हा वक्फ अधिकारी यांची राहील, अशी योजना आयोगाने सुचविली आहे. (पृष्ठ ७२)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस* ***अंशत: मान्य*** *करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची संख्या ५१ वरुन १०६ इतकी करण्यास तसेच, तेथील आस्थापनेची पुनर्रचना करुन औरंगाबाद येथील मुख्यालय व्यतिरिक्त नाशिक, पुणे, नागपूर, अमरावती व कोकण येथे ५ प्रादेशिक कार्यालये सुरु करण्याचा वक्फ मंडळाच्या प्रस्तावास शासनाने सहमती प्रदान केलेली आहे. वक्फ मंडळाच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेता प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी दोन लिपिकांची नियुक्ती करणे काहीसे अवघड आहे. तथापि, आयोगाने दोन लिपिकांकडून जी कार्यवाही करुन घेण्याचे सुचविले आहे ती कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित*

*प्रादेशिक कार्यालयातील विभागीय वक्फ अधिकारी/सहाय्यक मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर सोपविण्याबाबत वक्फ मंडळाला कळविण्यात आलेले आहे.*

*(अंशत: मान्य-२)*

**७.७ मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा वक्फ अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या :**

जिल्हा वक्फ अधिकाऱ्याने जेथे वक्फ मालमत्ता आहेत, अशा प्रत्येक शहर/गाव ला दोन वर्षातून एकदा भेट द्यावी व तेथील वक्फ मालमत्तांच्या विक्री, लीज, हस्तांतरण वा गहाण ठेवण्याबद्दल कोणतेही व्यवहार झाले आहे किंवा कसे, याची चौकशी करावी. असे व्यवहार झाले नसल्यास निरंक अहवाल व झाले असल्यास संबंधित व्यवहाराचा तपशील व सदर व्यवहार वक्फ मंडळाच्या परवानगीने अगर परवानगी न घेता झालेला आहे याबाबत तीन दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ यांना अहवाल सादर करावा. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यानी एक आठवड्याच्या आत आवश्यक ती कार्यवाही करावी. जर जिल्हा वक्फ अधिकाऱ्यानी जर त्याचे कर्तव्य करण्यात कसूर केल्याचे आढळून आल्यास त्याला तात्काळ निलंबनाखाली ठेवून त्याच्यावर प्रशासकीय कार्यवाही सुरु करावी. सदर कार्यवाही तीन महिन्यांच्या आत पूर्ण करुन त्याच्यावरील आरोप सिध्द झाल्यास किमान शिक्षा सेवेतून काढून टाकणे अधिक दंड अशी असावी व दंडाची आकारणी मंडळाला झालेल्या नुकसानाच्या प्रमाणात असावी. त्याने दंडाचा भरणा न केल्यास त्याला अशी शिक्षा भोगावी लागेल जी या संदर्भात वक्फ अधिनियम, १९९५ मध्ये करण्यात येणाऱ्या सुधारणेद्वारे विहित करण्यात येईल. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने जिल्हा वक्फ अधिकाऱ्याकडून वरीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाल्यानंतर आपल्या कर्तव्यात कसूर केल्याचे आढळून आल्यास त्याला तात्काळ निलंबनाखाली ठेवून त्याच्यावर प्रशासकीय कार्यवाही सुरु करावी. सदर कार्यवाही तीन महिन्यांच्या आत पूर्ण करुन त्याच्यावरील आरोप सिध्द झाल्यास किमान शिक्षा सेवेतून काढून टाकणे अधिक दंड अशी असावी व दंडाची आकारणी मंडळाला झालेल्या नुकसानाच्या प्रमाणात असावी. त्याने दंडाचा भरणा न केल्यास त्याला अशी शिक्षा भोगावी लागेल जी या संदर्भात वक्फ अधिनियम, १९९५ मध्ये करण्यात येणाऱ्या सुधारणेद्वारे विहित करण्यात येईल.

अशी शक्यता आहे की, वक्फ मंडळाला शासकीय विभागाकडून प्रतिनियुक्तीवर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत त्यामुळे शासनाने नियुक्त केलेल्या निवड मंडळाच्या देखरेखीखाली वक्फ मंडळाने स्वत:च्या कर्मचाऱ्यांची स्वत: नियुक्ती करावी. लिपिकांच्या नियुक्ती आदेशात वर नमूद केलेल्या बाबी संदर्भातील अटी व शर्ती सुस्पष्ट शब्दात नमूद केलेले असावी, अशी योजना आयोगाने सुचविली आहे. (पृष्ठ ७३)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस **मान्य** करण्यात आली आहे. आयोगाने जिल्हा वक्फ अधिकाऱ्याकडून जी कार्यवाही करुन घेण्याचे सुचविले आहे ती कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित प्रादेशिक कार्यालयातील विभागीय वक्फ अधिकारी/सहाय्यक मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर सोपविण्याबाबत वक्फ मंडळाला कळविण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे वक्फ मंडळातील*

*कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ च्या तरतुदी लागू करण्यात आलेल्या आहेत.*

*(मान्य-५)*

**७.८ वक्फ मंडळाला शासनाकडून निधी उपलब्ध करुन देणेबाबत :**

वक्फ मंडळाला शासनाकडून कोणतेही निधी/आर्थिक अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत नाही. वक्फ मंडळाला विविध वक्फांकडून प्राप्त होणाऱ्या निधीतून कार्यालयीन व कर्मचारी वृंदावरील खर्च करावा लागतो. असे म्हंटले जाते की, कर्मचाऱ्यांना महिनोमहिने पगार मिळत नाही. (पृष्ठ ७३)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस* ***मान्य*** *करण्यात आली आहे. शासनाकडून महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला रु.१५ कोटी इतके सहायक अनुदान मंजूर करण्यात आलेले असून त्यापैकी रु.३.८६ कोटी इतका निधी वितरीत देखील करण्यात आलेला आहे.*

*(मान्य-६)*

**७.९ वक्फ मंडळातील अपूरा कर्मचारीवृंद :**

वक्फ मालमत्ता या संपूर्ण राज्यभर विखूरलेल्या असून त्या केवळ जिल्हा किंवा तालुक्याच्या ठिकाणीच आहेत असे नव्हे तर लहान सहान गावात देखील त्या आहेत. वक्फ मंडळाच्या औरंगाबाद येथील कार्यालयात सुमारे 20 कर्मचारी कार्यरत असून जिल्ह्याच्या ठिकाणी २ ते ३ कर्मचारी कार्यरत आहेत. गाव किंवा गावांच्या एखाद्या समुहासाठी कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे जिल्हा वक्फ अधिकाऱ्याला गाव पातळीवरील वक्फ मालमत्तेवर तसेच काही मुतवल्ली व इतर व्यक्तींच्या अनिष्ट कारवायांवर लक्ष ठेवणे शक्य होत नाही. वक्फ मंडळाकडे पोलिसांसारखे बळ उपलब्ध नसल्याने जमिनींचा ताबा घेण्यात अडचणी येतात. काही प्रकरणी न्यायालयाकडून हुकुमनामा मिळून देखील वक्फ मंडळाला जमिनींचा ताबा घेता आलेला नाही. त्यामुळे लगेचच अशा जमिनींवर पुन्हा अतिक्रमणे होतात व नव्याने न्यायालयीन प्रक्रिया सुरु करावी लागते व त्यात अनेक वर्षांचा कालावधी जातो. (पृष्ठ ७३)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस* ***मान्य*** *करण्यात आली आहे. वर नमूद केल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची संख्या ५१ वरुन १०६ इतकी करण्यास तसेच, तेथील आस्थापनेची पुनर्रचना करुन औरंगाबाद येथील मुख्यालय व्यतिरिक्त नाशिक, पुणे, नागपूर, अमरावती व कोकण येथे ५ प्रादेशिक कार्यालये सुरु करण्याचा वक्फ मंडळाच्या प्रस्तावास शासनाने सहमती प्रदान केलेली आहे.*

*(मान्य-७)*

**७.१० मालमत्तांचा विकास**

आजमितीस वक्फ मंडळाकडे मोठ्या प्रमाणावर मालमत्ता आहे तथापि पैसा नाही अशी अवस्था आहे. ज्या वक्फ मालमत्ता शहर किंवा गावाच्या जवळ आहेत त्यांचा विकास करण्यात आल्यास व त्या

विकसीत मालमत्तांचे भाड्यावर किंवा अन्यथा समाजातील युवांना वाटप करण्यात आल्यास त्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकेल. परिणामी वक्फ मंडळाला उत्पन्नाचे एक कायम स्त्रोत उपलब्ध होईल व समाजातील बेरोजगारीची समस्या सोडविण्यास हातभार लागेल. त्यादृष्टीने वक्फ मंडळाने एक योजना हाती घेऊन मालमत्तांचा विकास करावा व अशा विकसीत मालमत्ता गरजू लोकांना राहण्यासाठी किंवा उद्योगधंद्यासाठी उपलब्ध करुन द्याव्यात. यासाठी पुढीलप्रमाणे योजना असावी :

१) वक्फ जमिनीच्या बाहेरील वर्तुळाचे (Outer Circle) अशा प्रकारे विकास करण्यात यावा की, तळमजल्यावर दुकाने व गोदाम, पहिल्या व दुसऱ्या माळ्यावर १/२रुम किचन, ३ रुम किचन आणि काही आलीशान (Luxurious) सदनिका बांधण्यात याव्यात.

२) गरजू लोकांना एक गाळा अधिक एक गोदाम अशा प्रकारे दुकानाचे दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टयावर (लीज) वाटप करण्यात यावे.

३) १/२रुम किचन च्या सदनिका दारिद्र्य रेषेखालील लोकांना सवलतीच्या दराने वाटप करण्यात यावे. ३ रुम किचन सदनिका वर्ग-३ चे कर्मचारी या सारख्या मध्यम वर्गीयांना सवलतीच्या दराहून काहीसे अधिक दराने वाटप करण्यात यावे. या दोन संवर्गावरील व्यक्तिंना आलीशान (Luxurious) सदनिका बाजारभावाने वाटप करण्यात यावे.

४) अशाप्रकारे मालमत्तांचा विकास करताना निधी उपलब्धतेचा प्रश्न निर्माण होईल. त्यादृष्टीने आयोगाने असे सुचविले आहे की, विकासकांकडून या उद्दिष्टांकरिता जाहीर निविदा मागविण्यात याव्यात. विकसीत मालमत्ता ६०:४० किंवा ५०:५० या प्रमाणात वक्फ मंडळ आणि विकासक (विकासकाला ९९ वर्षाच्या लीजवर) अशा प्रमाणात वाटप करण्यात यावे. विकासकाच्या वाट्याला आलेल्या जागा त्याला भाडेपट्टीवर गरजू लोकांना देण्याचा अधिकार राहील. ९९ वर्षाच्या लीजचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर विकासकाला वाटप करण्यात आलेली विकसीत मालमत्ता वक्फ मंडळाकडे पुर्ववत होईल.

५) अशाप्रकारे विकसीत करण्यात आलेली जागा सुमारे १० एकर इतकी असल्यास बाहेरील वर्तुळातील सुमारे २ ते ३ एकर जागा विकसीत होईल व त्याच्या आतील सुमारे ७ ते ८ एकर जागेला आपोआपच संरक्षण मिळेल. (पृष्ठ ७४)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस* ***अंशत: मान्य*** *करण्यात आली आहे. आयोगाच्या उपरोक्त शिफारशींपैकी अ.क्र.४ येथील शिफारस वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींशी विसंगत असल्याने ती मान्य करणे शक्य नाही. उर्वरित शिफारसींबाबत वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींनुसार तपासणी करुन आवश्यकतेनुसार प्रस्ताव सादर करण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात आलेले आहेत.*

*(अंशत: मान्य-३)*

### ७.११ समित्यांची स्थापना :

वक्फ मालमत्तांची देखरेख, सुव्यवस्था तसेच विकास करण्याकरिता प्रत्येक गाव, नगर व शहरात एक समिती स्थापन करण्यात यावी. या समितीत मुतवल्लींचा समावेश नसावा. सदर समितीच्या अधिकार क्षेत्रातील वक्फ मालमत्तांची देखरेख व निगराणी व आवश्यकतेनुसार पोलिसांकडे किंवा न्यायालयात तक्रार दाखल करण्याची कार्यवाही सदर समिती करेल व त्यात कसूर झाल्यास त्याची जबाबदारी सदर समितीची राहील. अशा प्रकरणी काही न्यायालयीन कार्यवाही करावयाची असल्यास अशी कार्यवाही वक्फ मंडळाच्या नियंत्रणाखाली करण्यात यावी.

असे निदर्शनास आले आहे की, वक्फ मंडळाकडून एक किंवा दोन वर्षे अशा अल्प कालावधीकरिता व्यवस्थापन समित्यांचे गठन करण्यात येते व समितीची मुदत संपल्यानंतर मुदतवाढ देण्याविषयीच्या कार्यवाहीस वक्फ मंडळाकडून गैरवाजवी विलंब करण्यात येतो. त्यामुळे दरम्यानच्या कालावधीत एखाद्या प्रकरणी अपील दाखल करावयाचे असल्यास कालमर्यादेचा प्रश्न उद्‌भवतो. असेही निदर्शनास आले आहे की, अत्यंत मनमानी पध्दतीने मुतवल्लींना हटविण्याची व विश्वस्त मंडळावर सदस्य वाढविण्याची कार्यवाही वक्फ मंडळाकडून करण्यात येते. अशा बाबी वक्फ मंडळाने टाळणे आवश्यक आहे असे अहवालातील पृष्ठ ११० ते १११ येथे नमूद करण्यात आले आहे. (पृष्ठ ७४)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस **अमान्य** करण्यात आली आहे. आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे समित्या स्थापन करावयाच्या झाल्यास साहजिकच त्यात स्थानिक नागरिकांचा समावेश असेल. अशा अशासकीय सदस्यांच्या कामगिरीवर नियंत्रण ठेवणे व त्यांच्याकडून कर्तव्यात कसूर झाल्यास त्याबाबत जबाबदारी निश्चित करणे प्रत्यक्षात अत्यंत कठीण व अव्यवहार्य ठरण्याची शक्यता आहे. शिवाय आयोगाने एका आधीच्या शिफारसीत वक्फ मालमत्तांच्या देखरेखीची जबाबदारी जिल्हा वक्फ अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर सोपविण्याचे व त्यात त्यांच्याकडून कसूर झाल्यास त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची शिक्षा देण्याचे प्रस्तावित केले आहे. एक कामगिरी जिल्हा वक्फ अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर तसेच उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित समितीवर एकाच वेळी सोपविणे अव्यवहार्य ठरणार असून त्यामुळे कामाची पुनरावृत्ती होऊन अनावश्यक गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता आहे. सबब, ही शिफारस मान्य करता येत नाही.*

*(अमान्य-१)*

### ७.१२ अवाजवी शर्त (Un-warranted Term) :

काही लीज प्रकरणांमध्ये लीजधारक लीजचे हस्तांतरण करु इच्छित असल्यास त्याला विशिष्ट फी चा वक्फ मंडळाकडे भरणा करावा लागेल अशा अर्थाच्या शर्तीचा समावेश केला जातो. अशा शर्तीमुळे लीजधारकाला हस्तांतरण करण्यास प्रोत्साहन मिळत असल्याने लीज करारांमध्ये वक्फ मंडळाने अशा शर्तींचा समावेश करु नये. (पृष्ठ ७५)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस **मान्य** करण्यात आली आहे. वक्फ मालमत्तांसंबंधी भाडेकरार करण्यासाठी एक नमुना भाडेपट्टा करार (Model Lease Agreement) तयार करुन त्यानुसार आवश्यक त्या प्रकरणांमध्ये भाडेपट्टा करार करण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात आलेले आहे.*

*(मान्य-८)*

**७.१३ इनामी मालमत्तेच्या विक्री करारासंदर्भातील शिक्षा :**

वक्फ मंडळाच्या आवश्यक मान्यतेशिवाय इनामी मालमत्तेचे हस्तांतरण करता येत नाही, असे असतानाही मुतवल्ली व काही प्रकरणांमध्ये चेअरमन त्यांच्या खाजगी स्तरावरुन इनामी मालमत्तेचा विक्री करार करण्यास मान्यता देत असल्याचे दिसून आले. यावर उपाय म्हणून यासंदर्भात वक्फ अधिनियमात शिक्षेची तरतूदी केली जाणे आवश्यक आहे. आयोगाला यासंदर्भात काही व्यक्तिंकडून पर्याय सुचविण्यात आले आहे, त्याआधारे आयोगाने पुढीलप्रमाणे योजना प्रस्तावित केली आहे :-

वक्फ मालमत्तांचे अनधिकृतरित्या विक्री, लीज, अदलाबदल, गहाण ठेवणे इ. सारख्या अपकृत्यास जबाबदार ठरतील अशा दोषी ठरलेल्या वक्फ मंडळाचे अध्यक्ष/सदस्य/मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याविरुध्द न्यायालयात खटले दाखल करण्यात येऊन शिक्षा करण्यात यावी. या संदर्भात वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ३२ (२)(जे), ५१ आणि ५६ येथील तरतूदी महत्वाच्या आहेत. सदर तरतुदींमध्ये तसेच वक्फ अधिनियमाच्या इतर काही कलमांमध्ये/उपकलमांमध्ये त्याचप्रमाणे अन्य काही कायद्यांतील कलमांमध्ये/उपकलमांमध्ये सुधारणा करण्याचे आयोगाने प्रस्तावित केले असून सदर कलमांच्या/उपकलमांच्या मूळ तरतुदी व आयोगाने प्रस्तावित केलेल्या सुधारित तरतुदी अहवालातील पृष्ठ ११२ ते १२६ येथे कृपया पहाव्यात. पर्यवेक्षणाचे व नियंत्रणाचे अधिकार जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांना देणे. (पृ.७५)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस **मान्य** करण्यात आली आहे. वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ५२-ए येथील सुधारीत तरतुदींनुसार वक्फ मंडळाच्या मान्यतेशिवाय वक्फ मालमत्ते विषयी व्यवहार करणाऱ्या मुतवल्लींना कमाल २ वर्षाची शिक्षा होण्याची तरतूद आहे. तसेच, वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम २८ येथील सुधारीत तरतुदींनुसार वक्फ मंडळाच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हा दंडाधिकारी, अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी व उप विभागीय दंडाधिकारी यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे.*

*(मान्य-९)*

**७.१४ मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अवलंबवावयाची कार्यपध्दती (Procedure) :**

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांच्या कर्तव्याचे कशाप्रकारे निर्वाहन करावे याबाबतची सविस्तर योजना आयोगाने प्रस्तावित केली असून सदर योजना पृष्ठ ८३ ते ८५ येथे कृपया पहावी.

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस **मान्य** करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे कामकाज कशाप्रकारे करण्यात यावे यासाठी वक्फ अधिनियम, १९९५ यामधील कलम १०९ च्या पोटकलम १ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र वक्फ नियम, २००३ विहित केलेले आहे.*

*(मान्य-१०)*

**७.१५ जनजागृती (Awareness in Public) :**

राज्यातील वक्फ मालमत्तेसंदर्भात सर्वसामान्य जनतेमध्ये जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने आयोगाने सुचविलेली योजना अहवालातील पृष्ठ १३० येथे कृपया पहावी. (पृष्ठ ८६)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस **मान्य** करण्यात आली आहे. राज्यातील वक्फ मालमत्तेसंदर्भात व्यापक प्रमाणात प्रसिध्दी करण्याविषयी वक्फ मंडळाला कळविण्यात आलेले आहे.*

*(मान्य-११)*

**७.१६ वक्फ न्यायाधिकरण :**

वक्फ अधिनियम, १९९५ यामधील कलम ८३ येथील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने औरंगाबाद येथे वक्फ न्यायाधिकरणाची स्थापना केलेली आहे. गरीब तक्रारदारांना वक्फ न्यायाधिकरणाकडे दाद मागणे सद्य:स्थितीत खर्चिक ठरत असल्याने प्रत्येक महसूली विभागासाठी स्वतंत्र वक्फ न्यायाधिकरण स्थापन करण्यात यावे असे आयोगाने सुचविले आहे. (पृष्ठ ८६)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस **मान्य** करण्यात आलेली असून याबाबत आवश्यकतेनुसार कार्यवाही करण्यात येईल.*

*(मान्य-१२)*

**७.१७ वक्फ मालमत्तांचा तपशील प्रसिध्द करणे :**

प्रत्येक गाव, नगर व शहरामध्ये तेथील सर्व वक्फ मालमत्तांचा सविस्तर तपशील तसेच या मालमत्ता वक्फ मंडळाच्या पूर्वमान्यतेशिवाय विक्री, लीज, गहाणखत किंवा अदलाबदलीद्वारे हस्तांतरणीय नसल्याबाबत व या संदर्भात कोणतीही अपकृती झाल्यास वक्फ मंडळाकडून त्याविरुध्द कार्यवाही केली जाईल याबाबीला त्रैमासिक किंवा सहामाही किंवा वार्षिक प्रसिध्दी देण्यात यावी, अशी आयोगाने शिफारस केली आहे. (पृष्ठ ८७)

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस **अंशत: मान्य** करण्यात आली आहे. वक्फ मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या सर्व मालमत्तांचा तपशील वक्फ मंडळाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेला आहे.*

*(अंशत: मान्य-४)*

## ७.१८ <u>**वक्फ मंडळातील गैरव्यवहार (Illegalities by Board)**</u> :

वक्फ मंडळाकडून झालेले काही व्यवहार आयोगाने अहवालातील पृष्ठ १३२ येथे नमूद केले असून त्याबाबत निरीक्षण नोंदविले आहे. (पृष्ठ ८७)

*<u>**करण्यात आलेली कार्यवाही**</u> : याबाबत आयोगाने नेमकी शिफारस केलेली नसून केवळ निरीक्षण नोंदविले आहे. तथापि, आयोगाने उल्लेख केलेल्या सर्व प्रकरणांची वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींनुसार तपासणी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत वक्फ मंडळाला निदेश देण्यात आलेले आहे.*

## ७.१९ <u>**वक्फ मंडळाचे गठन (Constitution of the Wakf Board)**</u> :

वक्फ मंडळाच्या अध्यक्ष पदावर राजकीय व्यक्तिंची नियुक्ती न करता वक्फ मंडळाच्या कामकाजात रस असणाऱ्या सेवानिवृत्त न्यायालयीन अधिकारी किंवा भा.प्र.से. किंवा समकक्ष संवर्गातील सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी व तसेच वक्फ क्षेत्रात काम करणाऱ्या व वक्फ च्या कामात रस असणाऱ्या व्यक्तिंचीच सदस्य म्हणून वक्फ मंडळावर नियुक्ती करण्यात यावी, अशी योजना आयोगाने सुचविली आहे. (पृष्ठ ८७).

*<u>**करण्यात आलेली कार्यवाही**</u> : सदर शिफारस **अमान्य** करण्यात आली आहे. वक्फ मंडळावरील सदस्यांची नियुक्ती व त्यामधून अध्यक्षांची नियुक्ती कशाप्रकारे करण्यात यावी याबाबतच्या तरतुदी वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम १४ अन्वये विहित करण्यात आलेल्या आहेत. सदर तरतुदींशी आयोगाने केलेली शिफारस ही विसंगत असल्याने सदर शिफारस मान्य करणे शक्य नसल्याने ती अमान्य करण्यात आली आहे.*

*(अमान्य-२)*

## ७.२० <u>**महसुली अभिलेख (Revenue Record)**</u> :

इनामी मालमत्तेच्या ७/१२ उताऱ्यामधील कब्जेदार रकान्यात "प्रतिबंधित सत्ता प्रकार" अशी नोंद केली जाणे नियमानुसार आवश्यक असताना काही महसुली अधिकारी कब्जेदार रकान्यात खाजगी व्यक्तिंच्या नावाची नोंद करतात. याबाबत आयोगाने अशी योजना सुचविली आहे की, इनामी मालमत्तेसाठी ७/१२ ऐवजी स्वतंत्र उतारा उदा. ७/१३ विहित करण्यात यावा. सदर उताऱ्याला (कागदाला) विशिष्ट असे वेगळे रंग विहित करण्यात यावे. (पृष्ठ ८८).

*<u>**करण्यात आलेली कार्यवाही**</u> : सदर शिफारस **मान्य** करण्यात आली असून आयोगाच्या सदर तरतुदींबाबत विचार करण्याविषयी महसूल विभागाला कळविण्यात आलेले आहे.*

*(मान्य-१३)*

**७.२१ वक्फ मंडळाच्या पुनर्गठणाची प्रक्रिया :**

वक्फ मंडळाचा कालावधी पूर्ण होण्याच्या सहा महिने आधी शासनाने वक्फ मंडळाच्या पुनर्गठणाची प्रक्रिया सुरु करावी. आधीच्या वक्फ मंडळाचा कालावधी संपल्याच्या लगत पुढच्या दिवशी नवीन वक्फ मंडळाने कार्यभार हाती घ्यावा. या प्रक्रियेमध्ये एक दिवसाचा जरी विलंब होणार असल्यास विलंबाच्या कालावधीकरिता मंडळावर प्रशासकाची नियुक्ती करण्यात यावी जेणेकरुन गोंधळ व गैरव्यवस्थापन टाळणे शक्य होईल. (पृष्ठ ८८).

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस **अमान्य** करण्यात आली आहे. सदर शिफारस वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींशी विसंगत असल्याने मान्य करणे शक्य नसल्याने ती अमान्य करण्यात आली आहे.*

*(अमान्य-३)*

**७.२२ उच्च न्यायालयात विशेष अभिहस्तांकन (Special Assignment in High Court) :**

वक्फ, ट्रस्ट, स्थायी दान (Endowment) सारखी प्रकरणे हाताळण्याकरिता उच्च न्यायालयातील प्रत्येक बेंच समोर विशेष अभिहस्तांकन असावे. (पृष्ठ ८८).

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस **अमान्य** करण्यात आली आहे. वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींनुसार वक्फ मालमत्तांशी संबंधित प्रकरणे वक्फ न्यायाधिकरणापुढे सादर केली जाणे आवश्यक आवश्यक असून अशा प्रकरणांमध्ये थेट उच्च न्यायालयात दाद मागण्याची तरतूद नाही. या तरतुदींशी सदर शिफारस विसंगत असल्याने ती मान्य करणे शक्य नसल्याने ती अमान्य करण्यात आली आहे.*

*(अमान्य-४)*

**७.२३ Ceiling Act :**

वक्फ मालमत्तेला कमाल नागरी जमीन धारणा कायद्याच्या तरतुदीतून वगळण्यात आलेले आहे. तथापि बीड जिल्ह्यात इनाम जमिनींना सदर कायदा लावण्यात येऊन या कायद्याद्वारे विहित करण्यात आलेल्या मर्यादेबाहेरील जमीन सरप्लस घोषित करण्यात आली. (पृष्ठ ८८).

**करण्यात आलेली कार्यवाही :** सदर शिफारस **मान्य** करण्यात आली आहे. आयोगाने सुचविल्याप्रमाणे कमाल ग्रामीण जमीन धारणा कायद्यात दुरुस्ती करण्यास कृषि विभागाने मान्यता दिलेली असून त्याप्रमाणे सुधारणा करण्याबाबत कृषि विभागाला कळविण्यात आलेले आहे.

*(मान्य-१४)*

**७.२४ शोध व निरीक्षण विभाग (Search & Inspection Department) :**

ज्या मालमत्ता वस्तुत: वक्फ मालमत्ता आहेत तथापि, प्रत्यक्षात वक्फ मंडळाच्या ताब्यात वा नियंत्रणाखाली नाहीत अशा मालमत्तांचा शोध घेण्यासाठी १ विधी अधिकारी, २ लिपिक व १ शिपाई यांचा समावेश असलेला एक स्वतंत्र विभाग असावा. (पृष्ठ ८८).

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस* ***अंशत: मान्य*** *करण्यात आली आहे. राज्यातील वक्फ मालमत्तांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र विभागाची स्थापना न करता वक्फ मंडळाच्या क्षेत्रिय कार्यालयातील सहायक मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यावर ही जबाबदारी सोपविण्याबाबत वक्फ मंडळाला निदेश देण्यात आलेले आहे.*

*(अंशत: मान्य-५)*

**७.२५ कार्यशाळा आयोजित करणे (Conducting of Workshops) :**

अनेक दिवाणी न्यायालय व महसूल अधिकाऱ्यांना वक्फ अधिनियम, १९९५, Hydrabad Abolition of Inam & Cash Grant Act, 1954 आणि त्यातील तरतुदींचे सखोल ज्ञान नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले असल्याचे नमूद करुन, उच्च न्यायालयाला त्यांच्या अधिनस्त असलेल्या न्यायपालिकांकरिता कार्यशाळा आयोजित करण्याची विनंती करण्यात यावी, तसेच महसूल विभागालाही महसुली अधिकाऱ्यांकरिता अशा प्रकारे कार्यशाळा आयोजित करण्याचे निदेश देण्यात यावेत, अशी आयोगाने शिफारस केली आहे. (पृष्ठ ८८).

***करण्यात आलेली कार्यवाही :*** *सदर शिफारस* ***मान्य*** *करण्यात आली आहे. कनिष्ठ न्यायालयीन अधिकाऱ्यांना त्यांच्या नियुक्तीच्या वेळी दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणामध्ये वक्फ अधिनियम, १९९५ व हैद्राबाद एबालिशन ऑफ इनाम अॅक्ट मधील संबंधित तरतुदींचा समावेश करण्याचे विधी व न्याय विभागाला कळविण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे, महसुली अधिकाऱ्यांकरिता आयोगाने प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यशाळा आयोजित करण्याविषयी महसूल विभागाला विनंती करण्यात आलेली आहे.*

*(मान्य-१५)*

*************

## जोडपत्र- ४

## न्या.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाच्या अहवालातील भाग-4

## (अहवालातील पृ.८९ ते ४३१)

| अ. क्र. | प्र. क्र. | वक्फ संस्थांचे नाव | आयोगाच्या शिफारशी | प्रस्तावित कार्यवाही | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | दर्गा शाह शौकतमिया, औरंगाबाद.<br>2/3 सदस्यांच्या मान्यतेशिवाय भाडेपट्टा.<br>वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ३२(२)(जे) चे उल्लंघन | दर्गा शाह शैकतमिया, औरंगाबाद सर्व्हे नं. ४० व ४१ मधील एम.आय.डी.सी. रेल्वे स्टेशन, औरंगाबाद क्षेत्रातील ३ एकर ३ गुंठे जमीन वक्फ मंडळाच्या दि.१९.०६.२००६ च्या ठरावाद्वारे वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ३२(२)(जे) मधील तरतुदीनुसार आवश्यक २/३ सभासदांच्या अनुमतीशिवाय सुफा शिक्षण संस्थेला भाडेपट्टयावर देण्यात आली. केवळ ३ सदस्य उपस्थित होते. संस्थेचा अर्ज दि.१८.०८.२००६ रोजीचा होता आणि मु.का.अ.ने दि.२३.०८.२००६ रोजी भाडेपट्टा प्रमाणपत्र दिले. सदर जमिनीचा ताबा त्यांच्याकडे असल्याचा वक्फ मंडळाचा दावा असून वरील संस्थेने देखिल जमिनीचा ताबा असल्याचा दावा केला होता. वक्फ मंडळाने दि.१३.०३.२००८ रोजी भाडेपट्टा रद्द केल्याविषयी नोटीस दिली होती. त्याविरुध्द वक्फ न्यायाधिकरणात वक्फ अर्ज क्र.११/०८ दाखल करण्यात आलेला आहे. वरील बेकायदेशीर व्यवहारासाठी वक्फ मंडळाचे तत्कालिन मु.का.अ. श्री.एम.वाय. पटेल व अध्यक्ष डॉ. एम. ए. अजीज जबाबदार आहेत. | महसूल व वन विभागाने तत्कालीन मुकाअ, श्री. एम. वाय. पटेल, (२०१२ मध्ये सेवानिवृत्त झालेले अपर जिल्हाधिकारी) यांचेविरुध्द कार्यवाही करावी.<br>वक्फ न्यायाधिकरणातील प्रकरणाचा पाठपुरावा करण्याचे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना निदेश देण्यात यावेत व प्रकरणाची सद्यस्थिती वक्फ मंडळाकडून अवगत करुन घ्यावी.<br>न्यायालयात पाठपुरावा करण्यात यावा. | |
| २ | २ | दर्गा दाऊद औलिया मगरिबी, औरंगाबाद (चितलांगे)<br>2/3 सदस्यांच्या मान्यतेशिवाय भाडेपट्टा.<br>वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ३२(२)(जे) चे उल्लंघन | दर्गा दाऊद औलिया मगरिबी, औरंगाबाद च्या सि.टी.एस. नं. १२५०३ मधील ४४१८.३१ चौ.मी. इतकी जमीन वक्फ मंडळाच्या ठराव क्र.8, दि.१६.०६.२००४ अन्वये श्री. दिलीप रामगोपाल चितलांगे आणि कुलभूषण रामचंद्र अगरवाल यांना 3 वर्षाच्या मुदतीकरिता भाडेपट्टयावर देण्यात आली होती. सदर ठराव मंडळाच्या ९ पैकी ५ सदस्यांच्या मान्यतेने करण्यात आलेला असून त्यामुळे वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ३२(२)(जे) मधील तरतुदींचे उल्लंघन झाले आहे. सदर भाडेकरार रु.२.४ लाख प्रतिवर्ष व मंडळाला रु.५ लाखाची जमीन तसेच इमारत उभारणी नंतर रु.५ प्रति चौ.फु. या दराने भाडे अशा अटींवर करण्यात आला होता. सदर भाडेकरार श्री.एम.वाय.पटेल, मु.का.अ., यांच्या | महसूल व वन विभागाने तत्कालीन मुकाअ, श्री. एम. वाय. पटेल, यांचेविरुध्द कार्यवाही करावी.<br>वक्फ मंडळाच्या 2 सदस्यांच्या मान्यतेने करण्यात आलेल्या भाडेपट्टा कराराच्या नूतनीकरण संदर्भात असे दिसून येते की, भाडेपट्टा धारकांनी दाखल केलेल्या या.क्र.4627/2007 ला अनुसरुन न्यायालयाने वक्फ बोर्डाच्या दि.21.04.2007 व | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | दि.१.८.२००५ च्या आदेशान्वये कार्यान्वित करण्यात आला. महाराष्ट्र वक्फ नियम, २००३ मधील नियम क्र.26 येथील तरतुदीनुसार भाडेपट्टा करार वक्फ मंडळाच्या कर्मचाऱ्यांनी नव्हे तर संबंधीत संस्थेच्या मुतवल्लीने करणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चेअरमन यांना दि.06.05.2004 रोजी सादर केलेल्या क्र.एमएसबीडब्ल्यु/एसएनटी/97/204 या टिप्पणीवरुन दिसून येते की, श्री.चितलांगी यांनी वकफ मंडळाला रु.1 कोटी देणगी देण्याचे प्रस्तावित केले होते. तथापि, मंडळाने फक्त रु.5 लाख इतकी देणगी स्विकारली व त्यामुळे मंडळाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. यासाठी वक्फ मंडळाचे तत्कालीन मु.का.अ. श्री.एम.वाय.पटेल आणि चेअरमन श्री.एम.ए.अझीझ हे जबाबदार आहेत.<br>श्री.अब्दुल रऊफ शेख, तत्कालीन मु.का.अ यांनी दि.26.07.2007 च्या नोटीसीद्वारे सदर भाडेपट्टा रद्द केला. मंडळाने ठराव क्र.21/08 दि.03.04.2008 अन्वये सदर भाडेपट्टा चालू न ठेवण्याचा निर्णय घेतला.<br>श्री.एस.एस.ए.काद्री, तत्कालीन मु.का.अ यांनी भाडेपट्टा धारकांना लिहिलेल्या दि.28.08.2008 च्या पत्रान्वये लिज कराराची मुदत दि.07.04.2008 रोजी संपुष्टात आल्याचे व तत्कालीन चेअरमनने केलेले सर्व भाडेपट्टे व अदलाबदल करार रद्द झाल्याचे व मंडळाने दिलेल्या एन.ओ.सी. रद्द झाल्याचे कळविले.<br>तथापि, श्री.तारिक अन्वर व श्री.ए.यु.पठाण या केवळ 2 सदस्यांनी पारित केलेल्या ठराव क्र.85/08 दि.21.11.2008 अन्वये भाडेपट्टा कराराचे नूतनीकरण करण्यातआले. श्री.एस.एस.ए.काद्री, तत्कालीन मु.का.अ यांनी असे नमूद केले की, त्यावेळी मंडळात केवळ वर नमूद दोनच सदस्य असल्याने सदर ठराव पुर्ण गणसंख्येने पारित झाला आहे. श्री.ए.यु.पठाण हे समन्स पाठवून देखिल मंडळापुढे उपस्थित राहीले नाहीत.<br>मंडळाचे तत्कालीन सदस्य श्री.तारिक अन्वर व श्री.ए.यु.पठाण तसेच, श्री.एस.एस.ए.काद्री, तत्कालीन मु.का.अ हे भाडेपट्टा कराराच्या नुतनीकरणासाठी जबाबदार आहेत. | दि.26.07.2007 च्या नोटीसींना दि.16.08.2007 रोजी स्थगिती दिली होती व सदर स्थगिती दि.25.06.2008 च्या आदेशान्वये सुरु ठेवण्यात आली. तथापि, या आदेशान्वये भाडेकराराची मुदत संपल्यास त्याबाबत कार्यवाही करण्यापासून वक्फ मंडळाला अवरोध करण्यात आले नव्हते.<br>राज्य शासनाने दि.04.09.2008 च्या अधिसूचनेन्वये 7 नवीन सदस्यांची वक्फ मंडळावर नियुक्ती केली होती. त्यास या.क्र.7071/2008 अन्वये आव्हान देण्यात आले होते. त्यास अनुसरुन न्यायालयाने दि.17.06.2009 च्या आदेशान्वये चेअरमनच्या निवडणुकीस स्थगिती दिली व दि.29.07.2009 च्या आदेशान्वये 7 पैकी 5 सदस्यांची नियुक्ती रद्द केली होती.<br>अल्पसंख्याक विकास विभागाने तत्कालीन मु.का.अ., श्री.एस.एस.ए.काद्री यांच्या विरुध्द कार्यवाही करावी.<br>सदर मालमत्ता मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम, 1995 व वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्याच्या वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| ३ | ३ | दर्गाह नवगाजी बाबा, वैजापूर, | दर्गा नवागाजी बाबा, वैजापूर, जि.औरंगाबाद ची सर्व्हे नं. २५३ मधील १० | बेकायदेशीर व्यवहारांबद्दल महसूल व वन | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | जि.औरंगाबाद. 2/3 सदस्यांच्या मान्यतेशिवाय भाडेपट्टा.<br>वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ३२(२)(जे) चे उल्लंघन | एकर ६ गुंठे जमीन वक्फ मंडळाच्या ९ सदस्यांपैकी फक्त ५ सदस्यांच्या सहमतीने दि.२५.११.२००५ च्या ठरावाद्वारे भाडेपट्टयावर देण्यात आली होती. सदर ठरावाद्वारे जमिनीची पाहणी करुन निर्णय घेण्याचे अध्यक्षांना प्राधिकार प्रदान करण्यात आले होते. तथापि, मु.का.अ. श्री.एम. वाय. पटेल यांनी दि.२५.११.२००५ च्या आदेशाद्वारे भाडेपट्टा मंजूर केला. कालांतराने सदर भाडेपट्टा तत्कालीन मुकाअ, श्री.ए.आर.शेख यांनी दि.08.06.2008 रोजी रद्द केला.<br>बेकायदेशीर व्यवहारांसाठी वक्फ मंडळाचे तत्कालिन मु.का.अ. श्री.एम.वाय. पटेल हे जबाबदार आहेत. अध्यक्ष डॉ. एम. ए. अजीज हे सुध्दा जबाबदार (Implied responsible) आहेत. | विभागाने तत्कालीन मु.का.अ., श्री. एम.वाय. पटेल, यांचेविरुध्द कार्यवाही करावी.<br>सदर जमिनीचा ताबा वक्फ मंडळाकडे आहे याबाबतीत खात्री करण्याचे मु.का.अ., वक्फ मंडळ यांना निदेश देण्यात यावे. | |
| ४ | ४ | दर्गा हजरत सिकंदर शाह वली वैजापूर, औरंगाबाद.<br>51 वर्षांकरिता भाडेपट्टा.<br>वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम 56(1) चे उल्लंघन | दर्गा हजरत सिकंदर शाह वली वैजापूर, औरंगाबाद ची सर्व्हे नं. २८९ मधील २ एकर ७ गुंठे जमिनीपैकी 1 एकर 4 गुंठे इतकी जमीन वक्फ मंडळाच्या क्र.20/96, दि.२७.९.१९९६ च्या पत्रान्वये श्री. नरेश श्रीवास्तव यांना ५१ वर्षासाठी भाडेपट्ट्यावर देण्यात आली. वक्फ अधिनियम, १९९५ अंमलात आल्याच्या दि.१.१.१९९६ वा तदनंतर करण्यात आलेले ३ वर्षापेक्षा अधिक कालावधीचे सर्व भाडेपट्टे शासनाने रद्द केले व त्यानुसार लीज धारकांना दि.२.७.२००१ रोजी पत्राद्वारे कळविण्यात आले. ताबा परत घेण्याविषयीचे नियमित आदेश वक्पफ्फ मंडळाकडून निर्गमित करण्यात आले. तथापि, याप्रकरणी लीज धारकाला दि.10.04.2008 रोजी नोटीस देण्यात आली. सदर विलंबासाठी मुकाअ हे जबाबदार आहेत. श्री.एस.एस.ए. काद्री, मुकाअ यांनी जिल्हा वक्फ अधिकाऱ्यांना लिहिलेल्या दि.23.07.2009 च्या पत्रान्वये स्थळ तपासणी करुन मंडळाला अहवाल सादर करण्याचे निदेश दिले.<br>मु.का.अ. श्री. एम. वाय. पटेल व अध्यक्ष डॉ. एम. ए. अजीज हे या बेकायदेशीर व्यवहारासाठी जबाबदार आहेत. सध्याचे मुकाअ, श्री.एस.एस.ए. काद्री व त्यांचे पुर्वाधिकारी हे देखिल सदर प्रकरणी वक्फ मालमत्तेच्या संरक्षणाविषयी झालेल्या दुर्लक्षासाठी जबाबदार आहेत. | सदर वक्फ मालमत्ता सुरक्षित असल्याबाबत व ती वक्फ संस्थेच्या हितासाठी वापरण्यात येत आहे, ही बाब सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम, 1995 व वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत.<br>सदर प्रकरणी झालेल्या दुर्लक्षासंबंधी सन 2000 पासूनच्या सर्व मुकाअ कडून शासनाने खुलासा मागवावा. | |
| ५ | ५ | दर्गाह हजरत सय्यद शाह शरीफ, नागेश्वरवाडी, औरंगाबाद. | दर्गाह हजरत सय्यद शाह शरीफ, नागेश्वरवाडी, औरंगाबाद. सर्व्हे क्र. 31, 46 & 24 मधील सी.टी.एस.क्र 4624 & 4631 या जमिनी सदर दर्गाहच्या नांवे | सदर प्रकरणी 51 वर्षाचा लीज करार करण्यात आलेला असल्याने वक्फ अधिनियम, | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आहेत. मु.का.अ. यांनी आपल्या उत्तरात असे नमूद केले की सदर जमिनी वक्फ मंडळाच्या ठराव क्र.१३३, दि.३०.०९.१९८९ अन्वये श्री.सिराजुलहसन यांना ५१ वर्षाकरिता लीजवर देण्यात आल्या होत्या. याबाबतचा ठराव पूर्ण बहुमताने पारीत करण्यात आला होता. त्यांनी दि.११/१२/१९८९ रोजी कार्यान्वित करण्यात आलेल्या लीज कराराची प्रत सादर केली. सदर व्यवहार वक्फ अधिनियम, १९९५ अंमलात येण्यापुर्वीचा असल्याने व याबाबतचा ठराव पूर्ण बहुमताने पारीत करण्यात आलेला असल्याने अधिक खोलात जाण्याची गरज नाही. सबब, तक्रार गुणवत्ता रहित आहे. सदर प्रकरणी वक्फ न्यायाधिकरणापुढे दावा क्र.१९/०८ दाखल आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने आयोगाने निरीक्षण नोंदविणे योग्य नाही. प्रकरण दप्तरी दाखल करण्यात येत आहे, असे आयोगाने नोंदविले आहे. | १९५४ च्या कलम ३६ चे उल्लंघन झाले आहे. तरी सदर कराराचा आढावा घेऊन संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्वत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| ६ | ६ | वळूज, ता. गंगापूर, जि.औरंगाबाद येथील सर्व्हे नं. 211 | वळूज, ता. गंगापूर, जि.औरंगाबाद येथील सर्व्हे नं. 211 मधील 31 एकर, 35 गुंठे इतकी जागा दिनांक 19.3.1996 च्या वक्फ मंडळाच्या ठरावाद्वारे 51 वर्षाकरिता लीजवर देण्यात आली.<br>मुकाअ, श्री.एस.एस.ए. काद्री यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. | सदर प्रकरणी 51 वर्षाचा लीज करार करण्यात आलेला असल्याने वक्फ अधिनियम, १९५४ च्या कलम ३६ चे उल्लंघन झाले आहे. तरी सदर कराराचा आढावा घेऊन संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| ७ | ७ | मस्जिद, दर्गाह सय्यद शाह हुसैनी, औरंगाबाद | मस्जिद, दर्गाह सय्यद शाह हुसैनी ची सर्व्हे नं. 83 मधील 10 एकर, 10 गुंठे पैकी 313.70 आर. व सर्व्हे नं. 91 मधील 3 एकर, 22 गुंठे पैकी 131.77 आर. दिनांक 21.7.2005 च्या विक्री कराराद्वारे निर्माण भारती, औरंगाबाद यांना विकण्यात आली. सदर प्रकरणी वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम 32(2)(j) r/w कलम 51 चे उल्लंघन झालेले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. WR 5778/07 | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन संबंधित मालमत्तेची सद्य:स्थितीची माहिती घेऊन वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम **51 व 52** प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना आदेश देण्यात याव्यात. | |
| ८ | ८ | चेतनानगर, औरंगाबाद | चेतनानगर, औरंगाबाद, ची सर्व्हे नं. 20(2) सिटी सर्व्हे नं. 15158/1 ते | सदर संस्थेची वक्फ म्हणून असलेली नोंदणी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 15158/7 मधील बाग शेरजंग मस्जिद, कब्रस्तान आणि दर्गा या वक्फ मालमत्तेच्या 5937 चौ.फूट इतकी जागा. न्यायाधिकरणाने याबाबत निकाल दिला आहे. | रद्द करण्याविषयीची तक्रार. याबाबत वक्फ मंडळाकडून अहवाल घ्यावा व त्यानुसार कार्यवाही करावी | |
| ९ | ९ | दर्गा जरजारी बक्क्ष, खुलताबाद, औरंगाबाद | सांगवी, ता. गंगापूर येथील सर्व्हे नं. २७/२८ मधील ४३ एकर ३५ गुंठे ची जमीन वक्फ मंडळाचे मु.का.अ. श्री. एम. वाय. पटेल यांनी वक्फ मंडळाचा ठराव नसताना ऑक्टोबर, २००६ मध्ये बेकायदेशीरपणे जमिनीच्या अदलाबदलाचे आदेश काढले. सदर अनियमिततेस श्री. एम.वाय. पटेल हे जबाबदार आहेत व श्री.अजीज अहमद, सहा.मुख्य कार्यकारी अधिकारी देखील जबाबदार आहेत. | सदर प्रकरणी श्री. एम. वाय. पटेल, २०१२ मध्ये सेवानिवृत्त झालेले अपर जिल्हाधिकारी, धुळे यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. आदेश रद्द करण्याबाबत कायदेशीर सल्ला घेऊन कार्यवाही करण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. आदेश रद्द करण्याबाबत कायदेशीर सल्ला घेऊन कार्यवाही करण्याचे निदेश वक्फ मंडळाला द्यावेत. | |
| १० | १० | दर्गा हजरत सय्यद शाह अहमद गुजराती, कलीबावाडी औरंगाबाद | दर्गा हजरत सय्यद शाह अहमद गुजराती, कलीबावाडी औरंगाबाद ची सर्व्हे नं. ३९ मधील १६ एकर ३० गुंठे इतकी जमीन श्री. रसमजी बेजामजी यांना १४ वर्षाच्या भाडेपट्टयावर दि. १९.४.१९६६ ते १८.४.१९८० पर्यंत दिले आणि तद्नंतर २२८२ चौ.मी. इतकी जागा श्री. निर्मलचंद पगारिया व इतर यांना विकत दिली. वरील व्यवहार वक्फ मंडळाच्या परवानगीशिवाय करण्यात आला. श्री. हारमोस बेजामजी यांनी उपजिल्हाधिकारी (LR) औरंगाबाद यांचेकडे **हैद्राबाद अबॉलिशन ऑफ इमाम्स अँड कॅश ग्रँट ॲक्ट १९५** च्या कलम ४, ५ व ६ खाली, त्यांच्या नांवे ताबा हक्क बद्दल निर्णय देण्यासाठी अर्ज केल्याचे आढळून येते. तद्नंतर १२.२.२००२ रोजी श्री. हारमोस बेजामजी सदर जमीन वाय कॅटेगरी ऐवजी के कॅटेगरी करण्याच्या दृष्टीने अधीक्षक, भूमी अभिलेख (लँड रेकॉर्ड) यांचेकडे अर्ज केला. वाय कॅटेगरी जमीन रिलीजस इनाम जमीन आहे व के कॅटेगरी जमीन खाजगी जमीन आहे. उप जिल्हाधिकारी (LR) आणि अधीक्षक, भूमी अभिलेख (लँड रेकॉर्ड) यांनी सदर जमिनीस कम्युनिटी सर्व्हिस इनाम म्हणून ठरविले. सदर प्रकरणी वक्फ मंडळाने सी.आर.पी.क्र. ६०/२००८ अन्वये उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे सुट नं.१६/२००२ च्या निकालाविरुध्द सी.आर.पी. दाखल केला आहे. तसेच रिट पिटीशन १२४५/२००४ सुध्दा आहे. | सदर प्रकरणी १९.१०.२००० च्या दरम्यान कार्यरत असलेले संबंधित उप जिल्हाधिकारी, औरंगाबाद (LR) यांनी तसेच १२.२.२००२ दरम्यान कार्यरत असलेले अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी कम्युनिटी सर्व्हीस इनाम म्हणून वक्फ जमिनीबाबत अधिकार नसताना आदेश काढले आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. सर्व्हे नं. ३९ बद्दल १९९५ च्या रिर्पोटच्या वास्तविकतेबाबत आयोगाने संशय व्यक्त केला आहे. वरील सर्व आदेशावर सद्य:स्थिती पाहून वक्फ मंडळाने कायदेशीर सल्ला घेऊन अपील दाखल करावे. | |
| ११ | ११ | जामा मस्जीद, केज, जि.बीड | जामा मस्जीद, केज, जि.बीड ची सर्व्हे नं. १३/१, १३/२, १७/१, १७/२ मधील | सदर प्रकरणी श्री. एम. वाय. पटेल, २०१२ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ४ हेक्टर ११.२५ आर इतक्या जमिनीचे बेकायदेशीरपणे अदलाबदल ३ हेक्टर ३७.५ आर सुन्नी जावला बरोबर केले. वक्फ मंडळाच्या २/३ सदस्यांच्या सहमतीशिवाय मु.का.अ. वक्फ मंडळ यांनी १९.११.२००४ रोजी आदेश पारीत केले. मु.का.अ. श्री. एम. वाय. पटेल हे सदर अनियमितेस जबाबदार आहे. | मध्ये सेवानिवृत्त झालेले अपर जिल्हाधिकारी, धुळे यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. तसेच बेकायदेशीरपणे अदलाबदल केलेले आदेश रद्द करुन जमीन ताब्यात घेण्याचे आदेश वक्फ मंडळास द्यावेत. | |
| १२ | १२ | जामा मस्जीद, बीड ची तरफग्राम, बीड येथील जागा | जामा मस्जीद, बीड ची तरफग्राम, बीड येथील जागा. सर्व्हे नं.122 मधील एकूण 25.01 म्हणजेच 25 एकर 10 गुंठे जागा यावलवाडी, ता. शिरुर (कसार), जिल्हा बीड येथील गट नं. 1163, 1157A1, 1157A2,1162, 1158AA3, 1157AA1, 1157AA2, 1162, 1163, 1158AA3, 1157A1, 1157AA2, 1162, 1163, 1158AA3, 1153 व 1097 या मधील अनुक्रमे 0.23, 0.49, 0.49, 0.18, 0.98, 0.46, 0.49, 0.18, 0.33, 0.97, 0.50, 0.51, 0.18, 0.23, 0.98, 2.00 व 0.81 अशा एकूण 25 एकर इतक्या जागेबरोबर बेकायदेशीररित्या अदलाबदल करण्यात आली आहे. सदर प्रकरणी श्री.एम.ए.अजीज तत्कालीन अध्यक्ष हे व जिल्हा वक्फ अधिकारी हे जबाबदार आहेत. | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना आदेश देण्यात याव्यात. तत्कालीन जिल्हा वक्फ अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी. | |
| १३ | १३ | मस्जीद नालवांडी, बीड | मस्जीद नालवांडी, बीड ची गट नं. ५८३ मधील ५ एकर जमीन मु.का.अ. वक्फ मंडळ यांनी भाडेपट्टीने श्री. निलेश यांना वक्फ मंडळाच्या २/३ सदस्यांच्या सहमतीशिवाय मु.का.अ. वक्फ मंडळ यांनी १९.४.२००६ रोजी आदेश पारीत केले. मु.का.अ. श्री. एम. वाय. पटेल हे सदर अनियमितेस जबाबदार आहे. | सदर प्रकरणी श्री. एम. वाय. पटेल, २०१२ मध्ये सेवानिवृत्त झालेले अपर जिल्हाधिकारी, धुळे यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. सद्य:स्थितीचा आढावा घेवून जमीनीचा ताबा घेण्याचे आदेश वक्फ मंडळास द्यावेत. | |
| १४ | १४ | ईदगाह, गेवराई, बीड | ईदगाह, गेवराई, जि. बीड ची सर्व्हे नं. १२६ पैकी ५० x २०० चौ.फूट जमीन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गेवराई ला क्र. wakf/snt/5143/2006, दि.-- अन्वये वक्फ मंडळाच्या ठरावशिवाय मु.का.अ. वक्फ मंडळ यांनी दिली. मु.का.अ. श्री. एम. वाय. पटेल हे सदर अनियमितेस जबाबदार आहे. | सदर प्रकरणी श्री. एम. वाय. पटेल, २०१२ मध्ये सेवानिवृत्त झालेले अपर जिल्हाधिकारी, धुळे यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. जमिनीचा ताबा घेण्याचे/भाडे आकारण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. जमीनीचा ताबा घेण्याचे/भाडे आकारण्याचे निदेश व महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास द्यावेत. | |
| १५ | १५ | दर्गाह हजरत कोचक शाह वली, | दर्गाह हजरत कोचक शाह वली, बीड या वक्फ संस्थेच्या सर्व्हे क्र.95 मधील | वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बीड | 14 एकर 19 गुंठे जमिनी पुढीलप्रमाणे भाडे तत्त्वावर देण्यात आली.<br>अ) जमीनीच्या इनामदाराने 2 एकर जमीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला रु.7000/- वार्षिक दराने 99 वर्षाकरिता भाड्यावर दिली.<br>ब) ठराव क्र.1308 दि.02.08.1971 अन्वये 2 एकर 19 गुंठे इतकी जमीन अंजुमन इशात ए तालिम या संस्थेला 99 वर्षाकरिता भाडेपट्टीवर देण्यात आली.<br>क) दि.24.03.1994 च्या आदेशान्वये 1 एकर 10 गुंठे इतकी जमीन श्री.रामजी कर्मसी हर्सी पाटील यांना भाडेपट्टीवर देण्यात आली.<br>ड) दि.18.10.1994 या आदेशान्वये भाडेपट्टी कराराचा कालावधी नमूद न करता 2 एकर 12 गुंठे इतकी जमीन कर्मसी हर्सी पटेल यांना भाडेपट्टीवर देण्यात आली.<br>ई) श्री.नारायण कर्मसी पटेल यांना ५१ वर्षाकरिता प्लॉट्स पोटभाड्यावर / गहाण ठेवण्यास दि.१५.०४.१९९५ च्या ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले.<br>वरील सर्व व्यवहार हे वक्फ अधिनियम 1954 च्या कलम 36 अे उल्लंघन करणारे आहेत. या सर्व व्यवहाराचे पुन्हा मुल्य निर्धारण करुन सदर व्यवहार चालू ठेवावा किंवा रदद करावा याबाबत वक्फ मंडळ आणि राज्य शासनाने पुर्नविचार करावा. भाडेपट्टी करार चालू ठेवणे, खंडित करणे मुल्यनिर्धारित करणे या बाबींची कार्यवाही दर 3 ते 5 वर्षांनी करावी. | कलम 52 प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला अल्पसंख्याक विकास विभागाने सूचना द्याव्यात.<br>वक्फ अधिनियमात सध्या अस्तित्वात असलेल्या कलम 26 च्या खाली पुढे नमूद करण्यात आलेला परंतुक समाविष्ट करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने सुधारणा करण्याची कार्यवाही करावी.<br>"परंतु वक्फ मंडळाने एखाद्या वक्फ मालमत्तेसंबंधी मान्यता दिलेल्या एखादा व्यवहार वक्फ अधिनियम, 1995 किंवा वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 मधील तरतुदीशी विसंगत असल्याचे राज्य शासनाच्या निदर्शनास आल्यास राज्य शासन स्वत:हून संबंधीत प्रकरणाची सर्व कागदपत्रे मागवून घेईल व प्रकरणाची चौकशी केल्यानंतर बेकायदेशिर व्यवहार रद्द करण्याविषयी शासन आदेश पारित करेल." | |
| १६ | १६<br>भाडेपट्टा | दर्गाह हजरत कोचक शाह वली, बीड | दर्गाह हजरत कोचक शाह वली, बीड च्या मार्गाची सर्व्हे क्र.95 मधील 14 एकर 29 गुंठे जमिनीबाबत पुढीलप्रमाणे भाडे करार करण्यात आला.<br>अ) जमीनीच्या इनामदाराने 2 एकर जमीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला भाडेपट्टीवर दिली.<br>ब) सखाराम गोरे आणि राजाराम के. गोरे यांना 5 एकर जमीन दि.04.08.1969 रोजी रु.३००० च्या मोबदल्यात ९९ वर्षाकरिता भाडेपट्टीवर देण्यात आली. दि.३०.१०.१९८९ च्या ठराव क्र.११८ अन्वये वक्फ मंडळाने ५० वर्षाचा भाडेकरार नियमित केला आहे.<br>क) आदेश क्र.4032/94, दि.18.10.1994 अन्वये 2 एकर 12 गुंठे इतकी जमीन रामसिंग करमसिंग पटेल आणि हरसिंग करमसिंग पटेल यांना | सदर प्रकरणी वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम **51 व 52** प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना आदेश देण्यात यावेत. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा वक्फ अधिकारी जबाबदार असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 51 वर्षांकरिता भाडेपट्टीवर देण्यात आली. अतिरिक्त जिल्हाधिकारी, बीड यांनी प्रकरण क्र.2000 इनाम/जमीन.बीड/61 प्रकरणी दि.27.09.2004 रोजी दिलेल्या आदेशान्वये त्यांच्या अधिपत्याखाली महसूल अधिकाऱ्यांना सर्व्हे क्र.95 येथील जमीन ताब्यात घेऊन ती 1 साल पध्दतीने भाडेपट्टीवर देण्याचे निदेश दिले. तथापि सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली नाही. मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.622/06 प्रकरणी दिलेल्या दि.14.10.2008 या आदेशान्वये दि.15.07.2005 चे आदेश रद्द करुन अहमदबीन अबुद, राहणार बीड यांचे 2 एकर 35 गुंठे प्रकरणावर पुर्नविचार करण्याचे आदेश दिले. आधी देण्यात आलेल्या दि.27.09.2004 चे आदेश रद्द करण्यात आले नाहीत. त्यामुळे सदर दि.27.09.2004 चे आदेश अंमलबजावणीस पात्र आहेत. आयोगाने बजावलेल्या नोटीसीला विभागीय, जिल्हाधिकारी बीड व तहसिलदार बीड यांच्याकडून कोणताही प्रतिसाद देण्यात आलेला नाही.<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद आणि जिल्हा वक्फ अधिकारी हे एकूण दुर्लक्षासाठी जबाबदार आहेत. | | |
| १७ | १७ | दर्गाह हजरत कोचक शाह वली, बीड | मुतवल्ली श्री.फझलुद्दीन यांचा मुलगा श्री.झकीयोद्दिन उर्फ मुन्ना यांनी दर्गाह हजरत कोचक शाह वली, बीड च्या मालकीचे सर्व्हे क्र.95 मधील 9 एकर 31 गुंठे जमीनीमध्ये प्लॉट्स पाडून ते विविध लोकांना विकले अशी तक्रार होती. तथापि, या जागेवर अतिक्रमण झालेले आहे व याबाबत न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित आहेत. | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकते- नुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना आदेश देण्यात यावेत. | |
| १८ | १८ | मस्जिद दिवाणवाडा, बीड | सर्व्हे क्र.168 मधील 15 एकर 17 गुंठे इतकी जमीन श्री.प्रदीप द्वारकादास मंत्री यांना वक्फ मंडळाने दिर्घ मुदतीसाठी भाडेपट्टीवर दिली होती. सदर भाडेपट्टयाचा 25 वर्षांचा कालावधी पुर्ण झाल्यावर दि.26.07.1999 रोजी जमीनीचा ताबा घेण्यात येऊन तो मुतवल्ली मोहम्मद हबीबुद्दीन नसिरुद्दीन यांना | तक्रारीत तथ्य नसल्याचे वक्फ मालमत्तेचा ताबा मुतवल्लीकडे देण्यात आलेला असल्याचे आयोगाने नमूद केले आहे.<br>तथापि, सदर प्रकरणाची स्थळ तपासणी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | देण्यात आला. तथापि प्रदीप द्वारकादास मंत्री यांनी आदेश क्र.2002/ROR/45, ज्या अन्वये निम्न न्यायालयाने त्यांच्याविरुध्द दिलेले आदेश फिरविण्यात आले होते, प्रकरण गुणवत्ता रहित आहे. जिल्हा वक्फ अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रतिसाद दिला नाही. | करुन व तपशिलाची तपासणी करुन सदर वक्फ मालमत्तेचा ताबा अद्याप श्री. प्रदीप द्वारकादास मंत्री यांच्याकडे असल्यास वक्फ मंडळाकडे ताबा परत घ्यावा. आवश्यकता असल्यास यथोचित अभिकरणात अपील दाखल करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना आदेश देण्यात यावेत. | |
| १९ | १९ | मस्जिद दिवाणवाडा, बीड | सर्व्हे क्र.170 मधील 22 एकर 38 गुंठे इतकी मस्जिद दिवाणवाडा बीडच्या मालकीची जमीन श्री.कैलास बाबुराव नरवडे यांना बेकायदेशीररित्या भाडेपट्ट्यावर देण्यात आली. सदर जमीन श्री.कैलास बाबुराव नरवडे यांना कधीही भाडेपट्ट्यावर देण्यात आली नव्हती असे जिल्हा वक्फ अधिकारी यांनी नमूद केले. प्रकरणात तथ्य नाही. | तक्रारीत तथ्य नसल्याचे आयोगाने नमूद केले आहे. तथापि, सदर जमिनीचा ताबा वक्फ संस्थेकडे आहे किंवा कसे ही बाब तपासून आवश्यकतेनुसार वक्फ अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना द्याव्यात. | |
| २० | २० | चिला शेख फरीद शाखरगंज आणि कब्रस्थान, नेकनूर, बीड | चिला शेख फरीद शाखरगंज आणि कब्रस्थान नेकनूर बीडच्या मालकीच्या नेकनूर बीड येथील सर्व्हे क्र.49 मधील 9 एकर 32 गुंठे इतकी जमीन सय्यद हुस्सैन व इतर यांनी श्री.लिंबाजी पंढरीनाथ कारंडे यांना भाडेपट्टीवर दिली. तक्रारीच्या पृष्ठ्यर्थ कोणतेही कागदपत्र सादर करण्यात आलेले नाहीत. सदर प्रकरणाची तपासणी करण्याकरिता वक्फ बोर्ड हे योग्य प्राधिकरण आहे. कब्जेदार रकान्यात खाजगी व्यक्तीचे नाव कमी करुन वक्फ मालमत्तेचे नाव दाखल करण्याचे विभागीय आयुक्त यांनी त्यांचे पत्र क्र.2000/भूमी सुधारणा/वक्फ, दि.08.03.2001 अन्वये निदेश दिले होते. त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. उप विभागीय दंडाधिकारी बीड महसूली अभिलेखात योग्य त्या दुरस्त्या करण्याबाबत निदेश देण्यात यावेत. | सर्व्हे क्र.49 च्या 7/12 च्या उताऱ्यासंदर्भात योग्य त्या सुधारणा करुन कब्जेदार रकान्यात फक्त सुधारित संस्थेच्या नावाची नोंद करण्याबाबत महसूल विभागाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या मार्फत सूचना द्याव्यात.<br>सदर वक्फ मालमत्ता एखाद्या तिसऱ्या पक्षाला भाडेपट्टीवर देण्यात आलेली आहे किंवा कसे याची तपासणी करुन व असल्यास सदर मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम, 1995 तसेच वक्फ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | (सुधारणा) अधिनियम, 2013 मधील तरतुदीनुसार आवश्यक त्या कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना अल्पसंख्याक विकास विभागाने आदेश द्यावेत. | |
| २१ | २१<br>ग्रामविकास विभाग<br>जिल्हा परिषद ग्राम पंचायत<br>बीएसएनएल टॉवर | दर्गाह हजरत उमर्शावली आणि कब्रस्थान, धिंदरुड, बीड | दर्गाह हजरत उमर्शावली आणि कब्रस्थान, धिंदरुड रोड येथील सर्व्हे क्र.14, गट क्र.731 येथील 3 एकर 35 गुंठे इतक्या जमिनीसंदर्भात ग्राम पंचायत धिंदूर्द रोड आणि जिल्हा परिषद बीड यांनी पुढीलप्रमाणे अनधिकृत व्यवहार केले.<br>अ) सदर जमिनीवर जिल्हाधिकारी, बीड यांनी अनधिकृत रित्या शाळेचे बांधकाम केले.<br>ब) ग्रामपंचायत धिंदरुड रोडने सदर जमिनीवर अतिक्रमण करुन कार्यालयाची इमारत बांधली.<br>क) सदर जमिनीवर आठवडा बाजार प्रवेशाची ग्रामपंचायतीने परवानगी दिली व भाडेपट्टी रु.60 हजार वसूल केली.<br>ड) ग्रामपंचायतीने सदर जमिनीवर टॉवर उभारण्याची भारत संचार निगम लिमिटेडला परवानगी दिली.<br>आयोगाने बजावलेल्या नोटीसींना वरील प्राधिकरणाने कोणताही प्रतिसाद दिला नाही. ग्रामपंचायतीने वक्फ मंडळ व राज्य शासनाविरुध्द सदर जमिनीच्या इतर रकान्यात मुस्लिम कब्रस्थान या फेरफार नोंदी क्र.2127 दि.15.02.2007 विरुध्द दिवाणी दावे दाखल केलेले आहेत. सदर दावे अद्याप प्रलंबित असल्याचे दिसते. आयोगाने बजावलेल्या नोटीसींना जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी व तहसिलदार यांनी कोणाताही प्रतिसाद दिलेला नाही. | कोणतीही विशिष्ट शिफारस नाही. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.<br>प्रकरणाचा पाठपुरावा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना निदेश देण्यात यावेत.<br>ग्रामविकास विभागाने वरील बाबी मान्य केल्या आहेत. बाजारभावाने या जागेचे भाडे वक्फ बोर्डाला देण्याविषयीचे आदेश ग्रामपंचायत धिंद्रुड व जिल्हा परिषद, बीड यांना देण्यात यावेत. | |
| २२ | २२<br>महसूल विभाग<br>नगर विकास विभाग | जामा मस्जिद बीड | अ) जामा मस्जिद बीडच्या सर्व्हे क्र.46 मधील 28 एकर 35 गुंठे जमीन ठराव क्र.८८ दि.19.07.1996 अन्वये 51 वर्षाकरिता भाडेपट्टीवर देण्यात आलेल्या यासंबंधीचे आदेश तत्कालीन मराठवाडा वक्फ मंडळाच्या सचिवांनी निर्गमित केले. यापैकी १४ एकर १७ गुंठे जमीन मासू, गोविंद आणि रोहीदास पिता बाल्या यांना 14 एकर 17 गुंठे जमीन खतीब जिलानी समशोद्दिन, सय्यद हमीद जिलानी सय्यद बनेमियाँ यांना भाडेपट्टीवर देण्यात आली. सदर भाडेपट्टा | 1. शासन स्तरावर प्रलंबित असलेली प्रकरणे त्वरित निकाली काढली जाणे आवश्यक आहे. या प्रकरणी वक्फ मंडळ पक्षकार म्हणून सामिल नसल्यास वक्फ मंडळाला सदर प्रकरणात पक्षकार म्हणून सामिल करणेविषयी मंडळाला सूचना देण्यात | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | दि.07.07.1996 रोजी अंमलात आलेल्या वक्फ अधिनियम 1995 च्या तरतुदीशी विसंगत आहे. उप जिल्हधिकारी भूमी सुधारणा श्री.एन.टी. धोत्रे, यांनी दि.27.06.2001 रोजी पारित केलेले आदेश हे अधिकार नसताना करण्यात आलेले असून या आदेशान्वये सदरची जमीन मदतमाश असल्याचे जाहीर करुन ती भाडेपट्टीवर देण्यात आलेली आहे. दि.27.06.2001 च्या आदेशास राज्य शासनापुढे अपिलाद्वारे आव्हान देण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन दि.16.08.2002 रोजी स्थगिती देण्यात आली असून प्रकरण अद्याप प्रलंबित आहे. सदर प्रकरणी शासनाकडून कसूर झाले असल्याने ही गंभीर बाब आहे.<br>ब) तरफ ग्राम बीड येथील सर्व्हे क्र.45 मधील 32 एकर 21 गुंठे जमिनीप्रकरणी उपजिल्हाधिकारी श्री.एन.टी.धोत्रे यांनी दि.16.08.2000 रोजी पारित केलेले आदेश हे अधिकार बाह्य असून सदर आदेशान्वये जमीन मदतमाश असल्याचे जाहीर करुन ती भाडेपट्टीवर देण्यात आलेली आहे. सदर आदेशाला राज्य शासनापुढे आव्हान देण्यात आलेले असून त्यास अनुसरुन दि.13.08.2002 रोजी स्थगिती आदेश देण्यात आलेले आहे. सदर अपिल अद्याप प्रलंबित असून सदर प्रकरणी शासनाकडून कसूर झाले असल्याने ही गंभीर बाब आहे. नगर रचनाकार अधिकाऱ्याने वक्फ बोर्ड किंवा महसूल विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र नसताना श्री.झैनुद्दिन व इतर यांना त्यांच्या शासन आदेश क्र.45/टीपी/टीपी बीड 392, 401, 390 दि.19.05.2003 आणि 386,387 दि.17.05.2003 अन्वये परवानगी दिली असून त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाणे आवश्यक आहे. | याव्यात.<br>2. श्री.एन.टी.धोत्रे उप जिल्हाधिकारी बीड यांनी अधिकार बाह्यरित्या काढलेले आदेश .... त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात यावी.<br>3. तत्कालीन मराठवाडा वक्फ मंडळाने वक्फ अधिनियम, 1995 च्या तरतुदीशी विसंगत कारवाई केलेल्या प्रकरणामध्ये अधिनियमांचे कलम 52 व 54 नुसार कारवाई करण्याच्या वक्फ मंडळाला सूचना देण्यात याव्यात.<br>4. दि.17.05.2003 व दि.19.05.2003 या कालावधीत कार्यरत असणारे नगर रचनाकार अधिकाऱ्यांविरुध्द नगर विकास विभागाने कारवाई करावी. | |
| २३ | २३<br>महसूल | मस्जिद नेकनूर, जिल्हा बीड | मस्जिद नेकनूर जिल्हा बीड सर्व्हे क्र.330 मधील 1 एकर 4 गुंठे इतकी जमीन शेहजादा बेगम वलीउद्दीन यांनी खोटी व बनावट कागदपत्रे दाखवून संस्थेच्या ताब्यात घेतली. महसूल अधिकाऱ्यांनी शेहजादा बेगम यांच्या नावे महसूल अभिलेखातील नांवे कमी करण्याविषयी दिलेल्या आदेशांचे तलाठ्यांनी पालन केले नाही. तहसिलदार, बीड यांनी मंडळ निरिक्षक यांच्या नावे पाठविलेले दि.22.01.2008 च्या पत्रान्वये धार्मिक संस्थेचे नांव महसूल अभिलेखात का नोंदविण्यात आलेले नाही. अशी पत्राद्वारे विचारणा केलेली होती. यासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी | 7/12 उताऱ्यात वक्फ संस्था म्हणून नोंद घेण्याविषयी महसूल व वन विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना निदेश द्यावेत.<br>मु.का.अ., वक्फ मंडळ यांना या विषयी पाठपुरावा करण्याचे अल्पसंख्याक विकास विभागाने निदेश द्यावेत. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सर्व जिल्हाधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेल्या दि.08.03.2001 च्या पत्रान्वये इनाम जमिनीच्या 7/12 उताऱ्यात वक्फ मंडळ नोंद घेण्याविषयी निदेश दिले होते. त्याचे तलाठ्यांनी पालन केले नाही. अर्जदाराने सर्व तपशिलासह तलाठ्याशी संपर्क साधावा. | | |
| २४ | २४ अभिप्राय नाही. | दर्गाह ख्वाजा शेख मसूद किरमानी, चन्नई, जि.बीड. | दर्गाह ख्वाजा शेख मसूद किरमानी, चन्नई, जि.बीड ची सर्व्हे क्र.७१ मधील २ एकर १० गुंठे, सर्व्हे क्र.२३३ मधील १ एकर २८ गुंठे आणि गट क्र.६५ मधील ८ हेक्टर ५९ आर, या सर्व जमिनी तिऱ्हाईत पक्षांच्या ताब्यात आहेत. उप जिल्हाधिकारी, अतियात, अंबेजोगाई यांच्या आदेश क्र.२००१/ इनाम/ बीडी/ २२१३, दि.०३/०३/२००२ मध्ये नमूद केल्यानुसार, दिवाणी दावा क्र.७९/६३ आणि ८१/७५ मध्ये आलेल्या निवाडयानुसार सदर जमिनी मशरुतुल खिदमत नसून कम्युनिटी सर्व्हिस इनाम असल्याने, प्रकरण खारीज करण्यात आले आहे. तथापि, दि.०७/०३/१९७४ च्या राजपत्रात सदर जमिनी वक्फ मालमत्ता म्हणून दर्शविण्यात आल्या आहेत. दिवाणी न्यायालयाने आदेश पारीत केले असल्याने आयोगाचे अभिप्राय नाहीत. | अभिप्राय नाहीत. दिवाणी न्यायालयाचे आदेश.<br>आयोगाने अभिप्राय नमूद केलेले नसले तरी, दि.०७/०३/१९७४ च्या राजपत्रात सदर जमिनी वक्फ मालमत्ता म्हणून दर्शविण्यात आलेल्या असल्याने, प्रकरणाची तपासणी करुन दिवाणी न्यायालयाच्या आदेशाविरुध्द यथोचित अभिकरणात अपिल दाखल करण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| २५ | २५ | जामा मस्जिद, बीड | जामा मस्जिद, बीड ची अतिक्रमणाबाबत ८२,०८३ चौ.फू. इतकी जमिन दि.२६/०१/१९७० च्या भाडे कराराद्वारे खालिक पेंटर यांना ९९ वर्षाच्या भाडे पट्टयावर देण्यात आलेली असून ते वक्फ अधिनियम, १९५४ च्या कलम ३६ चे उल्लंघन करणारे आहे. सदर भाडेपट्टा रु.१००/- प्रति वर्ष इतक्या अल्प रक्कमेवर देण्यात आला. सदर उल्लंघनासाठी वक्फ मंडळाचे तत्कालीन सचिव व मु.का.अ. हे जबाबदार असू शकतील. आयोगाच्या अनुसार अतिक्रमणबाबत तक्रारीत तथ्य नाही. दप्तरी दाखल करण्यास पात्र. | अतिक्रमणाबाबत प्रकरणात तथ्य नसल्याने ते दप्तरी दाखल करण्यास पात्र असल्याचे आयोगाने नमूद केले आहे. तथापि, कथित भाडेपट्टा हा ९९ वर्षासाठी देण्यात आलेला असल्याने प्रकरणी वक्फ अधिनियम, १९५४ आणि वक्फ अधिनियम, १९९५, वक्फ (सुधारणा) अधिनियम, २०१३ मधील तरतुदींचे उल्लंघन झालेले आहे. तरी, सदर प्रकरणी वक्फ अधिनियम, १९९५, वक्फ (सुधारणा) अधिनियम, २०१३ च्या कलम ५२ व ५४ प्रमाणे कार्यवाही करण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| २६ | २६ महसूल | जामा मस्जिद, बीड | जामा मस्जिद, बीड ची सर्व्हे क्र.121 मधील 25 एकर 32 गुंठे इतक्या जमिनीचा 7/12 उतारा मोहम्मद मजहरुद्दिन मोहम्मद खलिलुददीन, मोहम्मद | तक्रारीत तथ्य आढळून आले नसल्याने तक्रार दप्तरी दाखल करण्यास पात्र असल्याचे | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | लतिफद्दीन आणि मोहम्मद सैनुद्दीन पिता मोहम्मद रहेमुद्दीन यांच्या नावावर आहे. तथापि, वर नमूद व्यक्ती हे मुतवल्ली या नात्याने सदर जमिनीचा ताबा धारण करत असल्याचे दिसून येत असल्याने तक्रारीत तथ्य नाही. | आयोगाने नमूद केले आहे. तथापि, कोणत्याही व्यक्तीचे नाव वक्फ मालमत्तेत समाविष्ट करण्यात येऊ नये आणि 7/12 उताऱ्यावर केवळ संबंधीत वक्फ संस्थेचे नाव नोंदविण्यात यावे, असे शासनाने निदेश दिलेले असल्याने सदर प्रकरणी 7/12 उताऱ्यात संबंधीत वक्फ संस्थेचे नाव नोंदविण्याविषयी व प्रतिबंधीत सत्ता प्रकार अशी या प्रकरणी व सर्व वक्फ मालमत्ता संदर्भात महसुली अभिलेखात नोंद घेण्याविषयी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत महसूल व वन विभागाला विनंती करण्यात यावी. | |
| २७ | २७ | जामा मस्जिद, बीड | जामा मस्जिद, बीड ची ३०' x २०' इतकी जमीन अब्रारखान असलमखान (अव्यस्क). जिल्हा वक्फ अधिकारी, श्री. मकसूद अहमद यांनी असे नमूद केले की सदर जागा वक्फ मंडळाने दि.२४/०५/१९९४ रोजी रु.७५ प्रति माह इतक्या दराने भाडेपट्टयावर दिली होती. सदर मालमत्ता वक्फ मालमत्ता असल्याची राजपत्रात नोंद आहे. तथापि, आर.सी.एस.क्र.३७१/०४ प्रकरणी आलेल्या निवाडयानुसार सदर मालमत्ता वक्फ नाही. असलम खान यांनी ते भाडेपट्टा धारक असल्याचे मान्य करुन दि.२६/१०/२००५ चा भाडेपट्टा करार सादर केला. त्यांना ११ महिन्याकरिता रु.७५ प्रति माह दराने भाडेपट्टा देण्यात आल्याचे दिसते. रु.७५ प्रति माह ही रक्कम खूपच कमी वाटत असल्याने भाडेपटट्याच्या नुतनीकरणाच्या वेळीस याबाबत पुर्नविचार व्हावा. | सद्य:स्थितीत तपासून जमिनीचा ताबा वक्फ मंडळाकडे घेण्यात यावा. व भाडेपट्टी कराराची तपासणी करण्यात यावी. भाडेपट्टा कराराची तपासणी करुन वक्फ (सुधारणा) अधिनियम, २०१३ च्या कलम ३२(२)(जे) मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्याच्या वक्फ मंडळाला सूचना देण्यात याव्यात. | |
| २८ | २८ | मस्जिद आणि दर्गाह हजरत दायमशाह मुलायमशाह, धारुर, बीड | मस्जिद आणि दर्गाह हजरत दायमशाह मुलायमशाह, धारुर, बीड ची गट क्र.362 मधील 3 हेक्टर 44 आर जमिनीपैकी 33 गुंठे इतकी जमिन अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी बीड यांनी श्री.अंबदास बिरुबा निर्मल यांना दि.31.12.2004 रोजी पेट्रोल पंपासाठी वाटप केली. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी आयोगाच्या नोटीसींना प्रतिसाद दिला नाही. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी त्यांच्या दि.24.12.2004 च्या पत्रान्वये जमिनीच्या स्वरुपाविषयी केलेल्या विचारणेस अनुसरुन जिल्हा वक्फ अधिकाऱ्यांनी | जिल्हा वक्फ अधिकाऱ्यांनी नोंदविलेल्या आक्षेपांची दखल न घेता पेट्रोल पंपासाठी जागा वाटप करण्याविषयीचे दि.31.12.2004 चे असद्‌भावपूर्ण आदेश पारित करणारे तत्कालीन अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्या विरुध्द महसूल विभागाने कार्यवाही करावी. तसेच सदर मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याबाबत | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | त्यांच्या दि.30.12.2004 च्या पत्रान्वये अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांना सदर वक्फ जमिनीबाबतचा सर्व तपशील उपलब्ध करुन दिला होता. असे असतानाही अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी दि.31.12.2004 रोजी श्री.अंबादास यांच्या नावे पेट्रोल पंपासाठी ना हरकत प्रमाणपत्र जारी केले. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांनी केलेली कार्यवाही घाई गडबडीत व असद्भावपूर्वक केल्याचे दिसून येते. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी प्रकरण क्र.129/2005 मध्ये दिलेल्या दि.19.06.2006 च्या आदेशान्वये श्री.अंबादास यांना सदर जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याचे आदेशीत केले होते. तसेच त्यांच्या जावक क्र.4867/06 दि.11.08.2006 च्या उप विभागीय अधिकारी, आंबेजोगाई यांना लिहिलेल्या पत्रान्वये सदर अतिक्रमण हटविण्याची विनंती केली होती. तथापि, त्यांनी दुर्लक्ष केले व प्रकरणाचा पाठपुरावा केला नाही. | वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 नुसार कार्यवाही करण्याचे वक्फ मंडळाला निदेश द्यावेत.<br>सदर आदेश रद्द करणे किंवा बाजारभावाने भाडेपट्टा वसूल करण्याचे निदेश वक्फ मंडळाला द्यावेत. | |
| २९ | २९<br>महसूल<br>साप्रवि | जामा मस्जिद, इदगाह, दर्गाह शेख मसूद किरमानी, आंबेजोगाई, बीड | जामा मस्जिद, इदगाह, दर्गाह शेख मसूद किरमानी, आंबेजोगाई, बीड ची सर्व्हे क्र.573 मधील 35 एकर 12 गुंठे इतकी जमीन दि.07.03.1974 च्या राजपत्रात वक्फ मालमत्ता म्हणून दर्शविण्यात आलेली होती. तथापि, महसूली अधिका-यांनी सदर जमिनीची 573/अे/1, 3 एकर 35 गुंठे व 573/बी/2, 31 एकर 17 गुंठे अशी 2 भागात विभागणी केली व 3 एकर जमीन स्वातंत्र्य सैनिक हाऊसिंग सोसायटीला फेरफार नोंदणी क्र.4178 अन्वये तसेच 10 आर इतकी जमीन फेरफार नोंदणी क्र.11770 अन्वये सैनिक भवन साठी आणि 1 एकर 21 आर इतकी जमीन फेरफार नोंदणी क्र.9957 अन्वये मागासवर्गीय हाऊसिंग सोसायटीकरिता आणि 85 आर इतकी जमीन फेरफार नोंदणी क्र.9857 अन्वये माजी सैनिकांच्या मुलांकरिता वसतीगृहासाठी दिली. जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी आणि तहसिलदार हे महसुली अधिकारी आयोगापुढे उपस्थित झाले नाहीत. मंडळ अधिकारी आंबजोगाई आणि तलाठी यांनी देखिल आयोगाच्या समन्सना उत्तर दिले नाही. तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सदर जमिनीचे 1959-60 साली तुकडे करण्यात आले होते. अतिरिक्त मंडळ निरिक्षक, आंबेजोगाई यांनी फेरफार जमिनीचे तुकडे केल्याबाबतची नोंदणी क्र.1926 दि.31.08.1972 ची नोंद केली आहे. | 1. विविध संस्थांना, सहकारी संस्थांना/जमिनीचे वाटप करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द महसूल विभागाने कारवाई करावी.<br>2. राज्य शासनाने सदरच्या जमिनी मोकळ्या करुन त्या संबंधीत वक्फ संस्थेला परत कराव्यात. 7/12 उताऱ्यात सदर जमिनी वक्फ असल्याचे व प्रतिबंधीत सत्ता प्रकार असल्याबाबत स्पष्ट नोंद घेण्यात यावी. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सदर प्रकरणी झालेल्या व्यवहारासाठी दि.31.08.1972 रोजी फेरफाराची नोंद घेणारे अतिरिक्त मंडळ निरिक्षक तसेच विविध संस्था, सोसायट्यांना जमिनीचे वाटप करणारे प्राधिकारी हे जबाबदार असल्याचे आयोगाने नमूद केले आहे. सदर प्रकरणी शासनाकडून या जमिनी मोकळया करुन देणे किंवा अन्यथा वक्फ मंडळाला प्रतिपूर्ती केली जाणे आवश्यक आहे. | | |
| ३० | ३०<br>महसूल<br>वक्फ<br>न्याया. | दर्गाह हजरत जानपीरबाबा, नलवंडी, बीड | दर्गाह हजरत जानपीरबाबा, नलवंडी, ता.पाटोदा, बीड ची सर्व्हे क्र.129 मध्ये 5 एकर 11 गुंठे जमीन राजपत्रात वक्फ मालमत्ता म्हणून दर्शविण्यात आलेली आहे. तथापि, तलाठी श्री.कोमटवार यांनी फेरफार नोंद क्र.450 द्वारे जालिंदरनाथ देवस्थानाचे नाव दाखल केले आहे. उप विभागीय अधिकारी बीड यांनी दि.18.05.1998 च्या पत्राद्वारे तहसिलदार पाटोदा यांना एम एल आर कोडच्या कलम 257 खाली उपरोक्त फेरफार नोंद वगळण्याचे निदेश दिले होते. उप विभागीय अधिकाऱ्यांनी धारिका क्र.93/ईएसटी/कवी/709, दि.10.11.1997 च्या आदेशान्वये तलाठी श्री.कोमटवार यांनी नोंद केलेली फेरफार नोंद क्र.450 रदद केली होती. दि.31.03.1994 च्या आदेशान्वये सदर तलाठ्याची एक वेतनवाढ रोखून धरण्यात आली होती. तथापि, या आदेशानुसार कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. या संदर्भातील एक दाव्याशी संबंधीत प्रकरण क्र.11/2003 वक्फ न्यायाधिकरणापुढे प्रलंबित आहे. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी कब्जेदार रकान्यात वक्फ संस्थेच्या नावाची नोंद व प्रतिबंधीत सत्ता प्रकार अशी नोंद घेण्याविषयी दिलेल्या निदेशांचे सदर प्रकरणी पालन करण्यात आलेले नाही. सदर प्रकरणी शिक्षात्मक कार्यवाहीचे निदेश दिले जाणे आवश्यक. | 1. सदर प्रकरणी उप विभागीय अधिका-यांनी दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी केली जाईल हे महसूल विभागाने सुनिश्चित करावे. फेरफार नोंद क्र.450 घेणाऱ्या व उप विभागीय अधिकाऱ्यांनी आदेशित करुन देखिल सदर नोंद दुरुस्त न करणाऱ्या तलाठीविरुध्द विभागीय कारवाई करण्यात यावी.<br>2. वक्फ न्यायाधिकरणापुढील प्रकरणाचा वक्फ मंडळाने तातडीने पाठपुरावा करावा. | |
| ३१ | ३१<br>वक्फ मंडळ<br>वक्फ<br>न्याया.<br>महसूल<br>विभाग<br>वि व न्या<br>विभाग | दर्गाह हजरत चिल्ला जानपिर मस्जिद आणि कब्रस्थान, राईमोह यावलवाडी,ता.पाटोदा, आता तालुका शिरुर, जि.बीड | दर्गाह हजरत चिल्ला जानपिर मस्जिद आणि कब्रस्थान, राईमोह यावलवाडी, ता.पाटोदा, आता तालुका शिरुर, जि.बीड ची सर्व्हे क्र.1042 मध्ये 4 एकर 11 गुंठे जमीन दि.27.12.1973 च्या राजपत्रात नोंद आहे. सदर जमिनीचे जलेंद्रनाथ देवस्थान या नावाच्या मंदिरात रुपांतर करण्याचे प्रयत्न सुरु आहे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी चौकशी क्र.203/1981 प्रकरणी दि.01.02.1982 रोजी दिलेल्या आदेशान्वये सदर संस्था मुस्लिम ट्रस्ट असल्याचा व याला बीपीटी ॲक्ट लागू नसल्याचा निवाडा दिला आहे. तसेच चौकशी क्र.412/1990 आणि | 1. वक्फ न्यायाधिकरणापुढील प्रकरणांचा वक्फ मंडळाने तातडीने पाठपुरावा करावा.<br>2. खोडसाळ वृत्तीच्या लोकांनी वक्फ मालमत्ता बळकावू नये, याची महसूल विभागाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत दक्षता घ्यावी.<br>3. चुकीच्या कागदपत्रांआधारे कोणत्याही ट्रस्टची नोंदणी केली जाणार नाही. याबाबत | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | धर्मादाय आयुक्त | | तक्रार क्र.15/2003 यामध्ये तक्रारदार यशस्वी झाले नाहीत. वक्फ मंडळाने जिल्हाधिकारी यांना लिहिलेल्या दि.21.01.2003, 05.02.2003 आणि 20.02.2003 चे उत्तर देण्यात आले नाही. सदर प्रकरणी वक्फ न्यायाधिकरणात दावा दाखल करण्यात आलेला आहे. | दक्षता घेण्याच्या विधि व न्याय विभागाने धर्मादाय आयुक्तांना सूचना द्याव्यात. | |
| ३२ | ३२ | मस्जिद बुन्देलपुरा, बीड | मस्जिद बुन्देलपुरा, बीड. सदर प्रकरणी वक्फ अधिनियमाच्या कलम 32 (2)(जे) आणि कलम 51 व कलम 56 चे भंग झाले असल्याचे आयोगाने नमूद केले असून यासाठी सदर वक्फ मालमत्तेचे मुतवल्ली श्री.मिस्बाहउल्लाह हे जबाबदार असल्याचे म्हटले आहे. मुतवल्लीनी 30x30 चे दोन प्लॉट लीजवर दिलेले आहेत. परंतू कालांतराने लीजडीड रद्द केले आहे. | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र, राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. | |
| ३३ | ३३ | कम्प्लेन्ट जनरल<br>उप जिल्हाधिकारी, भूमी सुधारणा, बीड व इतर अधिकाऱ्यांनी पारित केलेले आदेश. | एखादी मालमत्ता वक्फ मालमत्ता आहे किंवा कसे हे ठरविण्याचे कोणतेही अधिकार नसताना, उप जिल्हाधिकारी, बीड यांनी पुढे नमूद करण्यात आलेल्या जमिनी मदतमाश असल्याचे निरिक्षण म्हणून जमिनीच्या ताबा धारकाला ताबा अधिकार (occupancy right) बहाल केला.<br>श्री.एन.टी.धोत्रे, उप जिल्हाधिकारी, भूमी सुधारणा यांनी पारित केलेले आदेश :-<br>अे) ठराव क्र.63 दि.07.07.1996 आधारे जाहेदा बेगम यांच्या ताब्यात असलेल्या गाव कुर्ला ता. व जि.बीड येथील सर्व्हे क्र.25 (गट क्र.197) मधील 10 हेक्टर 35 आर आणि 5 हेक्टर 90 आर जमिनीचे प्रकरण.<br>बी) सर्व्हे क्र.45 या मिळकतीवर श्री.निजामुद्दीन यांचा दावा होता. उप जिल्हाधिकारी, भूमी सुधारणा यांच्या आदेशान्वये या सर्व्हे क्रमांकापैकी 50 टक्के जमिन शेख कासिम शेख अहमद यांना बहाल करण्यात आली. सदर प्रकरणी वक्फ न्यायाधिकरणात श्री.निजामुद्दीन यांच्याविरुध्द दावा आरसीएस क्र.41/04 आणि श्री.जैनुद्दीन यांच्याविरुध्द दावा दावा आरसीएस क्र.42/04 आणि श्री.महसूल बल्लय्या यांच्याविरुध्द दावा आरसीएस क्र.44/04 सर्व्हे क्र.46 प्रकरणी, दाखल करण्यात आलेले आहेत.<br>सी) सर्व्हे क्र.25 आणि 84 प्रकरणी 2001-इनाम-डेस्क-57, दि.17.05.2001 रोजी पारित करण्यात आलेले आदेश. | वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 107 येथील तरतुदींनुसार कोणत्याही वक्फ मालमत्तेच्या ताब्यासंदर्भात लिमिटेशन्स ॲक्ट, 1963 च्या तरतूदी लागू होत नाहीत. सबब या प्रकरणी विविध अधिकाऱ्यांकडून पारित करण्यात आलेले आदेश हे अधिकारबाह्य स्वरुपाचे असून वक्फ मंडळाने या आदेशांविरुध्द वक्फ न्यायाधिकरणात अपिल दाखल करणे आवश्यक आहे. यासाठी वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत.<br>महसूल विभागाने संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदींनुसार कार्यवाही करावी. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | डी) गाव सुपेवाडी येथील सर्व्हे क्र.125, 127 प्रकरणी<br>1) 2001/इनाम/एलआर/65, दि.28.05.2001,<br>2) 2000/इनाम/डेस्क/43, दि.18.07.2001,<br>3) 2000/इनाम/डब्ल्युएस/30, दि.30.04.2001<br>4) 2000/इनाम/एलआर/121, दि.28.05.2001<br>5) 2000/इनाम/डब्ल्युएस/29, दि.28.05.2001<br>ई) जामा मस्जिद, बीडची सर्व्हे क्र.46 मधील जमिनी प्रकरणी 2001/इनाम/डेस्क-56, दि.27.06.2001<br>एफ) जामा मस्जिद, केज सर्व्हे क्र.13 व 14 क्र.2001/इनाम/209, दि.09.07.2001<br>जी) जामा मस्जिद, बीड सर्व्हे क्र.45 क्रमांक-2001/इनाम/एलआर/100, दि.28.08.2000<br>एच) गांव शिंदोड येथील सर्व्हे क्र.38<br>आय) गांव वासनदी येथील सर्व्हे क्र.148<br>गाव तरफ ग्राम सर्व्हे क्र.57, 121, 122, गाव साखरे बोरगाव सर्व्हे क्र.66/4120, 67/409, गाव येळंबघाट येथील सर्व्हे क्र.233, 235, 236, गाव अहेगाव सर्व्हे क्र.30 आणि 34 गाव गेवरिया साजनपूर सर्व्हे क्र.26/114 या जमिनी उप जिल्हाधिकारी, अतियात, बीड यांच्या आदेशान्वये शासनाच्या ताब्यात घेण्यात आल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ यांनी केलेल्या संदर्भास अनुसरुन उप विभागीय अधिकाऱ्यांनी वक्फ जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी कार्यवाही करणे अपेक्षित असताना वक्फ मंडळाकडून करण्यात आलेल्या अशा संदर्भावर उप विभागीय अधिकाऱ्यांकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही असे आयोगाने नोंदविलेले आहे.<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ यांच्या जावक क्र.एमएसबीडब्ल्यु/एनक्वायरी/4867/06, दि.08.08.2006/11.08.2006 अन्वये उप विभागीय अधिकारी, आंबेजोगाई यांना अतिक्रमण हटविण्यासाठी संदर्भ करण्यात आला होता. तथापि, 3 वर्षाचा कालावधी उलटून गेला तरी अतिक्रमणे हटविण्यात आलेली नाही.<br>उप जिल्हाधिकारी, भू.सु., उस्मानाबाद यांनी पुढील प्रकरणांमध्ये वक्फ मालमत्तेचे इनाम खालसा झाल्याचे आदेशित केले :- | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अे) दि.30.09.1997 च्या आदेशान्वये सर्व्हे क्र.104/4 मधील 4 एकर 19 गुंठे जमीन (अधिकाऱ्याचे नाव नमूद नाही)<br>बी) दि.30.05.2003 च्या आदेशान्वये सर्व्हे क्र.104/8 आणि 118/1 मधील 2 एकर 10 गुंठे आणि 2 एकर 12 गुंठे (अधिकाऱ्याचे नाव नमूद नाही) सदर प्रकरणी इनाम जमिनी या मोअज्जल आणि पेश इमाम या समाजाच्या सेवेसाठी देण्यात आलेले इनाम होते व त्यांना खाजगी इनाम म्हणता येणार नाही.<br>सी) श्री.एस.बी.मोहिते यांच्या दि.23.01.2004 च्या आदेशान्वये सर्व्हे क्र.228 मधील 1 हेक्टर 21 आर जमीन. त्यांनी सदर जमीन मशरुत्तूल खिदमत असल्याचे नमूद केले आहे. हैदराबाद इनाम खालसा कायदा, 1954 च्या कलम 1(2)(i) च्या तरतुदी विचारात घेता, त्यांना सदर इनाम खालसा करणे शक्य नव्हते.<br>डी) श्री.एस.बी.मोहिते यांच्या दि.17.01.2004 च्या आदेशान्वये सर्व्हे क्र.228 येथील 6 हेक्टर जमीन. त्यांनी सदर जमीन मशरुत्तूल खिदमत असल्याचे नमूद केले आहे. हैदराबाद इनाम खालसा कायदा, 1954 च्या कलम 1(2)(i) च्या तरतुदी विचारात घेता, त्यांना सदर इनाम खालसा करणे शक्य नव्हते.<br>ई) या जमिनीची विक्री ही वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 32(2)(जे) आणि कलम 51 येथील तरतुदींच्या विरोधात आहे.<br>एफ) हैदराबाद इनाम खालसा कायदा, 1954 चे कलम 1(2)(i)<br>जिल्हाधिकारी, नांदेड यांनी त्यांच्या क्र.69ई-एचआयए.डब्ल्युएसआय/572, दि.15.01.1969 अन्वये सर्व्हे क्र.8 येथील मस्जिद आणि अशुरखाना वाजेगाव, जिल्हा-नांदेड येथील वक्फ जमीन अन्यसंक्रामण (एलियनेट) केली.<br>श्री.जी.के.कळसेकर, उप जिल्हाधिकारी, भू.सु. यांनी त्यांच्या दि.20.04.1996 च्या आदेशान्वये मस्जिद नझिर, रोजबा मोहल्ला, किल्लेअर्क, हर्सुल, औरंगाबाद येथील जमीन राजपत्रात वक्फ मालमत्ता म्हणून नोंदणी असतानाही सदर जमीन मदतमाश असल्याचे जाहीर केले. यासाठी त्यांनी कोणत्याही कागदपत्रांचा आधार घेतला नाही. सबब या स्वच्छंद आदेशासाठी उप जिल्हाधिकारी जबाबदार आहेत. | | |
| ३४ | ३४ | जामा मस्जिद, बीड. | जामा मस्जिद, बीड ची 10' x 30' इतकी जमीन वक्फ अधिनियम, १९९५ च्या | वक्फ मंडळाने श्री. मुजफ्फर सिद्दिकी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | कलम 32(2)(j) येथील तरतुदींचे उल्लंघन करुन तत्कालीन सचिव, मराठवाडा वक्फ मंडळ, श्री. मुजफ्फर सिद्दिकी (आताचे वक्फ मंडळातील लेखा अधीक्षक) यांनी दि.२३/०९/१९९९ रोजी भाडेपट्टयावर दिले. सदर व्यवहारासाठी श्री. मुजफ्फर सिद्दिकी हे जबाबदार आहेत. | यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी. | |
| ३५ | ३५ | दर्गाह नूर शाह वली, मस्जिद, खानखॉं आणि कब्रस्तान, जालना | दर्गाह नूर शाह वली, मस्जिद, खानखॉं आणि कब्रस्तान, जालना ची जमीन अ.क्र.109 व 110 येथे त्रिभूवनदास रावजी यांनी राजकिशोर, बलदेव, रामेश्वर, जगदीश आणि दिलीप यांना अ.क्र.1907 येथे हस्तांतर केल्याची श्री.भगतसिंग यांना अ. क्र.1874 येथे, लक्ष्मीनिवास मधुसूदन, गौतम, राजेश, परसकुमार यांना अ.क्र.1869 येथे हस्तांतर केल्याची नगर सर्व्हेक्षण अभिलेखात नोंद आहे.<br>शंकुतलाबाई भ्र. रामदास यांनी सक्पाल यांना नगर सर्वेक्षण अभिलेखातील अ.क्र.4424 येथे हस्तांतरित केल्याची नोंद आहे.<br>त्रिभूवनदास यांनी हरीदास यांना सीटीएस एस क्र.2797 अन्वये हस्तांतरित केले. इ.<br>जिल्हा वक्फ अधिकाऱ्यांनी वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 55 खाली उप विभागीय अधिकारी, जालना यांना दि.20.04.2007 रोजी केलेल्या अर्जाची त्यांनी दखल घेतली नाही. मु.का.अ.वक्फ मंडळ यांनी दि.17.11.2004 च्या आदेशान्वये अतिक्रमण करणाऱ्यांची नावे नमूद केली. तथापि, महसुली अधिकाऱ्यसांनी या अतिक्रमण करणाऱ्यांची नावे 7/12 उताऱ्यावर नोंदविली. उप विभागीय अधिकाऱ्याविरुध्द राज्य शासनाने गंभीर कारवाई करणे आवश्यक असून त्यांना याप्रकरणी मु.का.अ. यांनी जारी केलेल्या अतिक्रमण हटविण्याविषयीच्या आदेशाची वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 55 मधील तरतुदींनुसार अंमलबजावणी करुन अतिक्रमण हटविणे विषयी तातडीने कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात यावेत. याप्रकरणी वक्फ न्यायाधिकरणात दावा क्र.31/2010 दाखल करण्यात आलेला आहे. | महसूल विभागाने जिल्हाधिकारी जालना यांना सदर प्रकरणाची दखल घेऊन महसूली अभिलेख्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या व वक्फ मालमत्तेवरील अतिक्रमणे हटविण्याचे निदेश द्यावेत. सदर प्रकरणाचा जिल्हाधिकारी, जालना तसेच वक्फ न्यायाधिकरण येथै पाठपुरावा करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ यांना निदेश देण्यात यावेत. | |
| ३६ | ३६<br>एम वाय पटेल | दर्गाह पीर इमाम बादशाह, पारोळा, जिल्हा-जळगाव | दर्गाह पीर इमाम बादशाह, पारोळा, जिल्हा-जळगाव ची सर्व्हे क्र.98 आणि 101 मधील जमीन वक्फ मंडळाच्या ठराव क्र.18, दि.18.10.2004 आधारे जाहीर लिलावाद्वारे दि.25.01.2005 रोजी विकण्यात आली. सदर व्यवहार तशा अर्थाच्या वक्फ मंडळाच्या वैध ठरावाशिवाय करण्यात आलेला असून तो | महसूल विभागाने श्री.एम.वाय. पटेल, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ यांच्याविरुध्द शिस्तभंग कारवाई करण्यात यावी. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 32(2)(जे) मधील तरतुदींचे भंग करणारा आहे. श्री.एम.वाय. पटेल, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ आणि श्री.एम.ए.अझीझ, वक्फ मंडळाचे तत्कालीन चेअरमन हे यासाठी जबाबदार आहेत. | सदर प्रकरणी झालेल्या व्यवहाराची तपासणी करुन सदर मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम, 1995 व वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 मधील तरतुदींनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याचा वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावे. | |
| ३७ | ३७<br>एम वाय<br>पटेल<br>अदलाबदल | दर्गाह हजरत मक्का शाह, नांदेड | दर्गाह हजरत मक्का शाह, नांदेड ची गट क्र.120 मधील 9 हेक्टर 6 आर इतकी जमीन चेअरमन आणि मुकाअ यांच्या अनुक्रमे दि.21.06.2006 आणि दि.26.06.2006 च्या आदेशान्वये कळंबर, ता.लोहा येथील गट क्र.437, 438, 439 आणि 440 बरोबर तसेच पिंपरणवाडी ता.लोहा येथील गट क्र.264/अे/1, 265/1अे तसेच बोरगाव ता.हातगाव येथील गट क्र.86 बरोबर अदलाबदल करण्यात आली. या संदर्भातील ठराव वक्फ मंडळाच्या एकूण 9 सदस्यांपैकी केवळ 5 सदस्यांच्या मान्यतेने करण्यात आले होते व त्यामुळे ते अवैध ठरते. वक्फ मंडळाने वक्फ अधिनियम 1995 च्या कलम 27 येथील तरतुदीस अनुसरुन दि.30.11.2005 रोजी पारित केलेल्या एका ठरावाद्वारे चेअरमन आणि एक अन्य सदस्य श्री.चांद पाशा इनामदार यांना वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 51 नुसार खालील प्रकरणी निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले होते. या प्रकरणी याचिका क्र.4258/07 दाखल आहे. वक्फ मंडळाने दि.13.07.2007 रोजी परित केलेल्या ठरावाद्वारे वरील अदलाबदल व्यवहार रद्द केला. तथापि, यासंदर्भात वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने श्री.एम.वाय.पटेल, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. या व्यवहारासाठी श्री.एम.वाय. पटेल, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ आणि श्री.एम.ए.अझीझ, वक्फ मंडळाचे तत्कालीन चेअरमन हे जबाबदार आहेत. | महसूल विभागाने श्री.एम.वाय. पटेल, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ यांच्याविरुध्द बेकायदेशीर आदेशांसंदर्भात कारवाई करावी.<br>सदर प्रकरणाचा तसेच याचिका क्र.4258/07 चा पाठपुरावा करुन वक्फ अधिनियमातील तरतुदींनुसार वक्फ जमिनीचा ताबा परत मिळविण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| ३८ | ३८<br>एम वाय<br>पटेल<br>अदलाबदल | दर्गाह हाजी बशिरुद्दीन, भोकर, नांदेड | दर्गाह हाजी बशिरुद्दीन, भोकर, नांदेड ची सर्व्हे क्र.196 येथील 3 एकर 39 गुंठे इतकी जमीन किन्नी, ता.भोकर, जि-नांदेड येथील सर्व्हे क्र.202/220 मधील 1 हेक्टर 10 आर इतक्या जमिनीबरोबर अदलाबदल करण्यात आली. यासंदर्भात मंडळाचे सदस्य श्री.चांद पाशा यांना मंडळाच्या दि.26.08.2005 च्या | महसूल विभागाने श्री.एम.वाय. पटेल, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ यांच्याविरुध्द बेकायदेशीर आदेशांसंदर्भात कारवाई करावी. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ठरावाद्वारा अधिकार प्रदान करण्यात आले होते आणि कायदेशिर बाबींची पूर्तता मुकाअ यांनी करणे आवश्यक होते. सदर ठराव 9 पैकी 5 सदस्यांच्या मान्यतेने करण्यात आला होता. संबंधीत आदेश क्र.वकफ /एसएनटी/1039/06, दि.23.02.2006 मुकाअ यांनी जारी केले. जमिनीच्या मुल्यांकनामध्ये उघड असद्‌भाव असल्याचे दिसून येते कारण भोकर शहराजवळील जमिनीचे मुल्य कमी आखण्यात येऊन सदर जमीन ग्रामीण क्षेत्रात असलेल्या जमिनीबरोबर अदलाबदल करण्यात आली. श्री.एम.वाय. पटेल, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ आणि श्री.एम.ए.अझीझ, वक्फ मंडळाचे तत्कालीन चेअरमन हे या व्यवहारासाठी व वक्फ मंडळाला झालेल्या नुकसानीसाठी जबाबदार आहेत. | सदर प्रकरणाचा पाठपुरावा करुन वक्फ अधिनियमातील तरतुदींनुसार वक्फ जमिनीचा ताबा परत मिळविण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| ३९ | ३९<br>एम वाय पटेल भाडेपट्टा | दर्गाह असहाबे रसुल, अर्धापूर, जिल्हा-नांदेड | दर्गाह असहाबे रसुल, अर्धापूर, जिल्हा-नांदेड ची गट क्र.611 मधील 11 हेक्टर 16 आर जमीन वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 32(2)(जे) मधील तरतुदींचे भंग करुन श्री.एम.वाय.पटेल, तत्कालीन मुकाअ यांनी दि.12.04.2006 रोजी भाडेपट्टयावर दिली. यासाठी श्री.एम.वाय.पटेल, तत्कालीन मु.का.अ. हेच जबाबदार आहेत. | महसूल विभागाने श्री.एम.वाय. पटेल, तत्कालीन मु.का.अ, वक्फ मंडळ यांच्याविरुध्द बेकायदेशीर आदेशांसंदर्भात कारवाई करणे आवश्यक. सदर प्रकरणाचा पाठपुरावा करुन वक्फ अधिनियमातील तरतुदींनुसार वक्फ जमिनीचा ताबा परत मिळविण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| ४० | ४०<br>एम वाय पटेल भाडेपट्टा | अशूरखाना मौला अली पंजा, धर्माबाद, नांदेड | वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 32(2)(जे) मधील तरतुदींचे भंग करुन मुकाअ, वकफ मंडळ यांच्या आदेश क्र.एमएसबीडब्ल्यु/एसएनटी/4294, दि.10.07.2006 च्या आदेशाद्वारे अशूरखाना मौला अली पंजा, धर्माबाद, नांदेड ची सर्व्हे क्र.160/बी (आता सर्व्हे क्र.160/अे) मधील 7 एकर 20 गुंठे जमीन 37 लोकांना 11 महिन्याच्या भाडेपटटयावर देण्यात आली. | महसूल विभागाने श्री.एम.वाय. पटेल, तत्कालीन मु.का.अ, वक्फ मंडळ यांच्याविरुध्द बेकायदेशीर आदेशांसंदर्भात कारवाई करावी. सदर प्रकरणाचा पाठपुरावा करुन वक्फ अधिनियमातील तरतुदींनुसार वक्फ जमिनीचा ताबा परत मिळविण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| ४१ | ४१<br>एम वाय पटेल भाडेपट्टा एनओसी | दर्गाह हजरत फतेहजंग, खाननवाब, नांदेड | वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 32(2)(जे) मधील तरतुदींचे भंग करुन दर्गाह हजरत फतेहजंग, खाननवाब, नांदेड ची सीटीएस क्र.1048 मधील 70 फुट x 140 फुट इतक्या जमिनीवर पेट्रोल पंपाकरिता मुकाअ, वक्फ मंडळ यांनी त्यांच्या क्र. क्र.एमएसबीडब्ल्यु/एसएनटी/239/4578, दि.28.07.2006 च्या | महसूल विभागाने श्री.एम.वाय. पटेल, तत्कालीन मु.का.अ., यांच्याविरुध्द बेकायदेशीर आदेशांसंदर्भात कारवाई करणे आवश्यक. सदर प्रकरणाचा पाठपुरावा करुन वक्फ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आदेशाद्वारे ना हरकत प्रमाणपत्र दिले. सदर ना हरकत प्रमाणपत्र वक्फ मंडळाने त्यांचे आदेश क्र.एमएसबीडब्ल्यु/एसएनटी/63/49/2007, दि.08.01.2008 अन्वये रद्द केली. | अधिनियमातील तरतुदींनुसार जमिनीचा ताबा परत मिळविण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| ४२ | ४२ | दर्गाह हजरत पीर साहेब, धनेगाव, नांदेड | दर्गाह हजरत पीर साहेब, धनेगाव, नांदेड ची सर्व्हे क्र.129 मधील 3 एकर 6 गुंठे इतक्या जमिनीचा भाडेपट्टा चेअरमन यांच्या आदेश क्र.एमएसबीडब्ल्यु/सीएच/244, दि.22.06.2006 अन्वये नियमित करण्यात आला. सदर मालमत्ता त्यापूर्वीच दि.24.12.1995 रोजी भाडेपट्टयावर देण्यात आली होती व या आदेशान्वये केवळ त्याचे नियमितीकरण करण्यात आले होते. सदर प्रकरणी वक्फ न्यायाधिकरणात दावा क्र.7/2008 दाखल करण्यात आलेला असून स्थगिती मिळवण्यात आलेली आहे. सदर प्रकरण दि.24.12.1995 म्हणजेच वक्फ अधिनियम, 1995 अंमलात येण्यापूर्वीचे आहे. आयोगाने निष्कर्ष नोंदविले नाही. | प्रकरण वक्फ न्यायाधिकरणापुढे न्यायप्रविष्ठ असून आयोगाने अभिप्राय नोंदविले नाही.<br>वक्फ न्यायाधिकरणातील प्रकरणाचा पाठपुरावा करण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| ४३ | ४३ | अशूरखाना मौला अली रत्नअली, ता. बिलोली, जि. नांदेड | अशूरखाना मौला अली रत्नअली, ता. बिलोली, जि. नांदेड ची सर्व्हे नं.195 मधील 9 एकर 17 गुंठे वक्फ जमिनीपैकी 2 एकर 32 गुंठे इतकी जागा कृषी उत्पन्न बाजार समिती, धर्माबाद, ता. बिलोली, जि.नांदेड यांना 99 वर्षाकरिता भाडेपट्टयावर देण्यात आलेली आहे.<br>प्रत्यक्ष भाडेपट्टा करार दि.12.2.1996 रोजी म्हणजेच वक्फ अधिनियम, 1995 अस्तित्वात आल्यानंतर करण्यात आलेला असल्याने या प्रकरणी सदर अधिनियमातील तरतुदींनुसार कार्यवाही होणे आवश्यक होते. सदर अधिनियमातील कलम क्र.32(2)(जे) मधील तरतुदींनुसार वक्फ मालमत्ता भाडेपट्ट्यावर देण्यासाठी 2/3 सदस्यांच्या बहुमताने ठराव पारीत होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कलम 56 येथील तरतुदींनुसार वक्फ मालमत्ता 3 वर्षाहून अधिक कालावधीसाठी भाडेपट्ट्यावर देता येत नाही.<br>सदर प्रकरणी झालेल्या बेकायदेशीर व्यवहारात मंडळाचे तत्कालीन सदस्य श्री.आसीफ पटेल हे हितसंबंधित व्यक्ति असल्याचे व त्यांनी त्यांच्या अधिकारांचा दुरुपयोग केल्याचे दिसून येते. मंडळाचे तत्कालिन सचिव श्री.महंमद अली व जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड श्री.आसीफुद्दीन हे जबाबदार अधिकारी होते व वक्फ अधिनियम, 1995 यामधील कलम 26 मधील तरतुदींनुसार, त्यांनी या प्रकरणी झालेला बेकायदेशीरपणा मंडळाच्या तसेच शासनाच्या निदर्शनास आणणे आवश्यक होते. तथापि, त्यांनी मौन पाळल्याने या | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 51 व 52 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात.<br>श्री.महमंद अली, तत्कालीन सचिव व जिल्हा वक्फ अधिकारी नांदेड श्री.आकीफुद्दीन यांच्यावर कारवाई करावी. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रकरणी झालेल्या व्यवहारासाठी ते बरोबरीने जबाबदार ठरतात. | | |
| ४४ | ४४ | मस्जिद व अशूरखाना वाजेगांव, जि. नांदेड<br>(2010) | मस्जिद व अशूरखाना वाजेगांव, जि.नांदेड ची सर्व्हे नं.8 मधील 22 एकर 2 गुंठे इतकी वक्फ जमीन जगन्नाथ किशनलाल, रा.वाजेगांव यांनी श्री.भास्करराव बाबूराव पाटील खतगांवकर यांना हस्तांतर करुन ताबा ही दिला असल्याची आयोगापुढे तक्रार प्राप्त झाली होती. सदर प्रकरणी अभिलेखात बदल (mutation entries) करुन श्री.भास्करराव बाबूराव पाटील यांचे नांव 7/12 उताऱ्यात नोंदविण्यात आलेली आहेत. याबाबत वक्फ न्यायाधिकरणामध्ये प्रकरण प्रलंबित आहे. (84/08) | सदर प्रकरणी वक्फ न्यायाधिकरणापुढे दाखल असलेल्या दावा क्र.८४/२००८ प्रकरणी पाठपुरावा करण्याच्या वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावे. ॲड.श्री. झुलफिकार सिद्दिकी यांनी दोन्ही पक्षांच्या वतीने काम पाहिले असल्याने त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्याविषयी वि.व न्या.वि. ला कळवावे. | |
| ४५ | ४५ | मोठी दर्गाह सय्यद सादिक शाह हुसैनी मस्जिद, नाशिक | मुतवल्ली कोण असावे, याबाबतची तक्रार. ३ तक्रारी आयोगाने प्रकरण दखल घेण्याजोगे नसल्याने निकाली काढले आहे. | अभिप्राय नोंदविले नाहीत. | |
| ४६ | ४६ | दर्गाह पीर करम अली शाह ट्रस्ट, पनवेल, (मुंबई) | दर्गाह पीर करम अली शाह ट्रस्ट, पनवेल, (मुंबई) ची सर्व्हे नं. 513/ए मधील 1200 चौ.वार इतकी जागा सदर ट्रस्टच्या मालकीची वक्फ मालमत्ता आहे. सदर मालमत्ता दि.18.9.2006 रोजी रु.1020/प्र.माह अधिक रु. 5,00,000/- ची देणगी च्या बदल्यात 3 वर्षाकरिता भाडेपट्टीवर देण्यात आलेली आहे. प्रस्तूत प्रकरणी कोणतेही ठराव नसतांना सहाय्यक मु.का.अ. श्री.अजीज अहमद सिराज अहमद यांनी संबंधित ट्रस्टला भाडेपट्टा करार करण्याची परवानगी दिली. सदर परवानगी देणाऱ्या पत्रात, "चेअरमनने मंजूर केले आहे", असा उल्लेख आहे. या संदर्भात ट्रस्टने पारीत केलेल्या ठरावाचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, सदर ट्रस्टने वक्फ मालमत्तेतील इतर काही भाग काही इतर व्यक्तीनाही भाडेपट्टयावर दिलेला आहे.<br>प्रस्तुत प्रकरणी वक्फ अधिनियम, 1995 मधील कलम 26 व कलम क्र.32(2)(जे) येथील तरतुदींचे भंग झाल्याचे आयोगाने नमूद केले आहे. सदर प्रकरणी झालेला बेकायदेशीर व्यवहारास वक्फ मंडळाचे तत्कालिन चेअरमन श्री.एम.ए.अजीज तसेच वक्फ मंडळाचे सहाय्यक मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अजीज अहमद सिराज अहमद हे जबाबदार असल्याचे आयोगाने नमूद केले आहे.<br>मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.एस.एस.अली काद्री यांनी सदर प्रकरणी आयोगाला आवश्यक सहकार्य केले नसल्याचे व ते निष्काळजीपणे व | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. श्री.अजीज अहमद यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | उध्दटपणे वागले असल्याचे आयोगाचे म्हणणे असून अशा अधिकाऱ्यांना शासन प्रशासनात कसे काय सहन करते, असा प्रश्न आयोगाने विचारला आहे. | | |
| ४७ | ४७ | दर्गाह हजरत तुराबुल हक्क, परभणी | श्री.गफ्फार मास्टर या खाजगी व्यक्तीच्या अर्जावरुन सर्व्हे नं.593 व 594 येथील सदर दर्गाहच्या मालकीच्या वक्फ जमिनीपैकी 104x12 चौ.मी. जागा रस्ता बांधण्यासाठी देण्यात आली. यासंबंधीचे आदेश मॅजेस्टिक आमदार निवास 309/310, मुंबई येथून कार्यालयीन अधीक्षक श्री.जाफर, यांनी दि.21/04/2005 रोजी निर्गमित केले. सदर प्रकरणी मंडळाचा ठराव नसताना बेकायदेशीर पणे जमीन दिली गेल्याने दि.08/01/2008 रोजी कार्यरत असणाऱ्या मु.का.अ., वक्फ मंडळ यांनी वक्फ मंडळाच्या दि.12/12/2007 रोजी पारीत करण्यात आलेल्या ठरावाआधारे क्र.MSBW/SNT/431/56/2007 च्या आदेशान्वये सदर व्यवहार रद्द करुन जमिनीचा ताबा मागितला. प्रस्तूत प्रकरणी वक्फ अधिनियम, 1995 यामधील कलम क्र.32(2)(जे) मधील तरतुदींचे भंग झाले असल्याचे व त्यासाठी तत्कालीन चेअरमन व तत्कालीन कार्यालयीन अधीक्षक श्री.शेख जाफर हे जबाबदार असल्याचे आयोगाने नमूद केले आहे. | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. श्री.जफर शेख यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. | |
| ४८ | ४८<br>महसूल | मस्जिद मेमारल्लन, गुजरी बाजार, परभणी | मस्जिद मेमारल्लन, गुजरी बाजार, परभणी ची सर्व्हे क्र.17/2 येथील 5 एकर 20 गुंठे जमीन वार्षिक पध्दतीने भाड्यावर देण्यात येत होती व त्यापोटी वक्फ मंडळाला लावणी रक्कम प्राप्त होत होती. यासंदर्भात मुतवल्लीने दि.18.12.1984 च्या तहसिलदार, परभणी यांना लिहिलेल्या पत्रान्वये लावणी रक्कमेच्या परताव्याची मागणी केली. राज्य शासनाने महसूल व वन विभागाच्या पत्र क्र.वक्फ-1098/4228/प्र.क्र.29/ल-3, दि.16.07.1998 अन्वये वक्फ जमिनी लावणी पध्दतीने देण्यास प्रतिबंध करुन सर्व जमिनी वक्फ मंडळाकडे पूर्ववत केल्या. तथापि, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. जिल्हा वक्फ अधिकारी यांनी देखिल त्यांच्या दि.16.04.2007 च्या तहसिलदार, परभणी यांना लिहिलेल्या पत्रान्वये सदर जमिनीचा ताबा देण्याची विनंती केली होती. तथापि, कोणताही प्रतिसाद देण्यात आला नाही. सहाय्यक जिल्हा अधिकारी, परभणी यांच्या त्यांच्या क्र.09/अतियात/इनाम/कवी-496, दि.22.10.2009 च्या पत्रान्वये अनावश्यक तपशिलाची मागणी केल्याचे दिसते. | महसूल विभागाने दि.16.04.2007 रोजी कार्यरत असणाऱ्या तहसिलदार, परभणी यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे महसूल विभागाने सदर वक्फ मालमत्तेचा ताबा वक्फ मंडळाला परत करण्याविषयी जिल्हाधिकारी, परभणी यांना आदेशित करावे.<br>सदर प्रकरणाचा जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे पाठपुरावा करण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सदर प्रकरणी झालेल्या चुकीसाठी तहसिलदार, परभणी आणि जिल्हाधिकारी, परभणी हे जबाबदार आहेत. सदर जमिनी स्वत:च्या ताब्यात ठेवल्याबद्दल तहसिलदार, परभणी यांना शासनाकडून शिक्षा केली जाणे आवश्यक आहे. | | |
| ४९ | ४९<br>एम वाय पटेल<br>महसूल | दर्गाह हजरत याकूब साहेब, तेरखेडा, जिल्हा-उस्मानाबाद. | 2/3 सदस्यांची मान्यता नसतानाही मुकाअ, वक्फ मंडळ यांच्या दि.06.03.2005 च्या आदेशान्वये दर्गाह हजरत याकूब साहेब, तेरखेडा, जिल्हा-उस्मानाबाद ची गट क्र.481 मधील 1 एकर जागा दवाखान्याची इमारत बांधण्याकरिता 3 वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्यावर देण्यात आली होती. सदर कृती वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 32(2)(जे) मधील तरतुदींचे भंग करणारी असून त्यासाठी तत्कालीन मुकाअ, वक्फ मंडळ श्री.एम.वाय.पटेल हे जबाबदार आहेत. आताचे मुकाअ, वक्फ मंडळ श्री.एस.एस.अली काद्री यांनी देखिल जिल्हा वक्फ अधिकाऱ्यांकडून सदर भाडेपट्टा नियमित करण्याचा प्रस्ताव मागविला होता. | वक्फ अधिनियम, १९९५ व वक्फ (सुधारणा) अधिनियम, २०१३ च्या अनुषंगाने महसूल विभागाने श्री.एम.वाय. पटेल, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ यांच्याविरुध्द बेकायदेशीर आदेशांसंदर्भात कारवाई करावी.<br>सदर प्रकरणाचा पाठपुरावा करुन वक्फ अधिनियमातील तरतुदींनुसार वक्फ जमिनीचा ताबा परत मिळविण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| ५० | ५०<br>एम वाय पटेल<br>महसूल | हजरत राजे बक्सर, पिरवाडी, ता. व जि. सातारा | हजरत राजे बक्सर, पिरवाडी, ता. व जि. सातारा ची सर्व्हे क्र.16 (जुना सर्व्हे क्र.110) मधील 4 एकर 29 गुंठे इतकी जमीन वक्फ मंडळाच्या ठराव क्र.20 दि.28.04.2005 अन्वये श्री.अशोक गोविंदराव नाईक यांना हस्तांतरण करण्याचे आदेशित करण्यात आले होते. यासंबंधी मुकाअ, वक्फ मंडळ यांच्या स्वाक्षरीने दि.19.05.2005 रोजी आदेश काढण्यात आले. सदर ठराव 9 पैकी 5 सदस्यांच्या मान्यतेने करण्यात आला होता. सबब, वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 32(2)(जे) मधील तरतुदींनुसार सदर ठराव अवैध आहे. सदर बेकायदेशिर कृतीसाठी मुकाअ, वक्फ मंडळ तसेच तत्कालीन चेअरमन डॉ.एम.ए.अझीझ (आता मयत) हे जबाबदार आहेत. याचबरोबर तत्कालीन महसूल मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी सदर जमीन इनाम वर्ग-3 (देवस्थान इनाम) मधून इनाम वर्ग-2 (वैयक्तिक इनाम) मध्ये रुपांतरीत करण्याच्या प्रस्तावास मान्यता देऊन सदर जमीन इनाम वर्ग-3 मधून वगळण्याचे आदेशित केले. | महसूल विभागाने श्री.एम.वाय. पटेल, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ यांच्याविरुध्द बेकायदेशीर आदेशांसंदर्भात कारवाई करावी. कायद्यामध्ये तरतूद नसतांना तत्कालीन महसूल राज्यमंत्री यांनी वर्ग-3 चे इनाम वर्ग 2 मध्ये बदल करण्याचे आदेश दिले .<br>सदर प्रकरणाचा पाठपुरावा करुन महसूल मंत्र्यांच्या दि.09.07.2008 च्या आदेशाविरुध्द यथोचित अभिकरणात अपिल दाखल करण्याविषयी वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| ५१ | ५१<br>महसूल<br>मोहिते, उपजिल्हाधि | जामा मस्जिद, नलदुर्ग आणि जामा मस्जिद, उस्मानाबाद. | जामा मस्जिद, नलदुर्ग आणि जामा मस्जिद, उस्मानाबाद च्या सर्व्हे क्रि.104 आणि 164 मधील जमिनी अ) नळदुर्ग येथील मस्जिदच्या सेवेसाठी व ब) उस्मानाबाद येथील मुंतखब मोअज्जन आणि पेश इमाम करिता देण्यात आले | महसूल विभागाने सदर प्रकरणांची तपासणी करावी व वक्फ मालमत्तांच्या अन्य संक्रमणास कारणीभूत ठरणाऱ्या आदेशांबाबत पुनर्विचार | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कारी | | असल्याची राजपत्रात नोंद आहे. म्हणजेच सदर जमिनी या वक्फ मालमत्ता आहेत. सदरचे इनाम उप जिल्हाधिकारी, भु.सू. यांनी पुढीलप्रमाणे खालसा केल्या आहेत.<br>अे) सर्व्हे क्र.104/4 मधील 4 एकर 19 गुंठे, दि.30.09.1997 रोजी खालसा करण्यात आले आहे. (उप जिल्हाधिकाऱ्यांचे नाव नमूद नाही)<br>बी) सर्व्हे क्र.104/8 व 118/1 येथील अनुक्रमे 2 एकर 10 गुंठे व 2 एकर 12 गुंठे दि.30.05.2003 रोजी खालसा करण्यात आले आहे. (उप जिल्हाधिकाऱ्यांचे नाव नमूद नाही)<br>सी) सर्व्हे क्र.228 येथील 1 हेक्टर 21 आर जमीन श्री.एस.बी.मोहिते उप जिल्हाधिकारी यांच्या दि.30.01.2004 च्या आदेशान्वये खालसा करण्यात आले आहे.<br>डी) सर्व्हे क्र.228 येथील 6 हेक्टर जमीन श्री.एस.बी.मोहिते उप जिल्हाधिकारी यांच्या दि.17.04.2004 च्या आदेशान्वये खालसा करण्यात आले आहे.<br>वरील प्रकरणांमध्ये महसुली अधिकाऱ्याने वक्फ मंडळाची बाजू ऐकून घेतली नाही. श्री.मोहिते यांनी सर्व्हे क्र.228 प्रकरणी दिलेल्या आदेशात सदर जमिनी मशरुत्तूल खिदमत असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे, हैदराबाद इनाम खालसा कायदा, 1954 च्या कलम 1(2)(i) च्या तरतुदी विचारात घेता, त्यांना सदर इनाम खालसा करणे शक्य नव्हते.<br>वरील उप जिल्हाधिकारी हे बेकायदेशीर आदेश पारित करण्यास जबाबदार आहेत. | करावा. वक्फ मंडळाने देखिल सदर प्रकरणांची तपासणी करावी व सदर मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने यथोचित कारवाई करावी. | |
| ५२ | ५२ | कब्रस्तान, भोकरदन, जि.जालना | भोकरदन, जि.जालना येथील कब्रस्तानाची जमिनीपैकी एक एकर जमिनीवर श्री.शब्बीर अहमद कुरेशी आणि श्री.अब्दुल खालेख अब्दुल कादर यांनी शिक्षण अधिकारी व गट विकास अधिकारी यांच्याशी हात मिळवणी करुन अतिक्रमण करुन त्यावर पक्का बांधकाम करुन शाळा चालवत आहेत. ते शासनाकडून रु.7000 ते 10,000 इतके भाडे वसूल करुन वक्फ मालमत्तेची लूट करत आहेत, अशी तक्रार होती. सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर तक्रारीत तथ्य आढळून न आल्याचे आयोगाचे म्हणणे असून सदर जागा मूळत: कब्रस्तानासाठी असल्याने भविष्यात कब्रस्तानाला जागा कमी पडल्यास त्यासाठी किंवा शाळेसाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे हा वक्फ मंडळाच्या | सदर प्रकरणी कोणतीही अनियमितता झाल्याचे आयोगाने निष्कर्ष काढलेले नाहीत. तथापि, वस्तुस्थिती जाणून घेऊन कार्यवाही करण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अखत्यारीतील विषय आहे. | | |
| ५३ | ५३ | मस्जिद ढोल दरवाजा धनेगाव, ता.पैठण, जि. औरंगाबाद | मस्जिद ढोल दरवाजा धनेगाव, ता.पैठण, जि. औरंगाबाद ची गट नं. 27 येथे 39 एकर 10 गुंठे (15 हे.90 आर) इतकी जागा वक्फ मालमत्ता आहे. सदर जमिनीच्या व्यवस्थापकाच्या कायदेशीर वारसांनी (शेख अमीर व इतर 7) सदर जमिनीची विक्री करण्यासाठी दि.29.7.2007 रोजी मु.का.अ. वक्फ बोर्ड औरंगाबाद यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळवून दि.27.10.2008 रोजी सदर जमिनीचा विक्री करार करुन दि.26.6.2009 रोजी रु.32,60,000/- इतक्या रकमेच्या मोबदल्यात श्री.बाबुभाई भुरालाल पटेल यांना हस्तांतरीत केली. या संदर्भात श्री.शेख अमीर व त्यांचे 7 सहकारी यांनी जिल्हा भूमी सुधारणा अधिकारी आणि उप जिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) औरंगाबाद यांच्याकडून दि.18.6.2009 रोजी ना-हरकत प्रमाणपत्र मिळविले. सदर प्रकरणी झालेला विक्री व्यवहार बेकायदेशीर असल्याने, दि.26.6.2009 चा विक्री करार, दि.27.10.2008 रोजीची श्री.धोडीराम गणपत पवार तसेच व्यवस्थापकाच्या वारसांनी दिलेली संमती व दि.27.10.2008 चा विक्री करार बेकायदेशीर असल्याने तो वक्फ मंडळावर बंधनकारक नाही. त्यामुळे भारतीय दंड विधानाच्या उपरोक्त तरतुदीखाली विक्रेता व खरेदीदार यांच्याविरुध्द खटला दाखल करण्यात यावा व वक्फ मंडळाने वक्फ अधिनियम, 1995 यामधील कलम 52 व 54 अंतर्गत कार्यवाही सुरु करावी असे आयोगाने नमूद केले आहे. | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना आदेश देण्यात याव्यात. तसेच वक्फ मंडळाने भारतीय दंड संहिता 467,468,771 व 420 (415सह) नुसार कारवाई सुरु करावी. | |
| ५४ | ५४ | सतोना, ता.परतूर, जि.जालना येथील इनाम जमीन | मालमत्ता वक्फ आहे किंवा कसे, याबाबतची तक्रार. तक्रारीत तथ्य आढळून न आल्याचे नमूद करुन आयोगाने तक्रार दप्तरी दाखल केली आहे. | तक्रारीत तथ्य आढळून न आल्याचे आयोगाने नमूद केले आहे. अभिप्राय निरंक. | |
| ५५ | ५५ | मस्जिद दर्गाह आणि कब्रस्तान, सिपोरा (बाझार), ता. भोकरदन, जि.जालना | दर्गाह आणि कब्रस्तान ची सिपोरा (बाझार), ता. भोकरदन, जि.जालना येथील सर्व्हे नं.46, गट नं.367 मधील 4 हेक्टर 13 आर. जमीन वक्फ मालमत्ता असून श्री.मोहम्मद शरीफ ताजमहमद हे या जागेत प्लॉट पाडून त्यांची विक्री करत असल्याच्या आयोगापुढे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तक्रारदारानी विविध अभिकरणांकडे दाखल केलेल्या काही तक्रारींचा तपशील आयोगाने नमूद केला असून तक्रारदार यांना तक्रार करायची सवय (Habitual) असल्याचे व त्यांच्या तक्रारीत तथ्य आढळून न आल्याचे नमूद करुन तक्रार दप्तरी दाखल केली आहे. | तक्रारीत तथ्य आढळून न आल्याचे आयोगाने नमूद केले आहे. अभिप्राय निरंक. | |
| ५६ | ५६ | जालना येथील म्युन्सिपल एच.नं. | सदर वक्फ मालमत्तेच्या श्रीमती सिताबाई ह्या भाडेकरु असून त्यांना सदर | सदर प्रकरणी कोणतीही अनियमितता | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 2-4-19 आणि 2-4-20 दुकान. | मालमत्तेवरुन बाहेर काढण्यासाठी (evict) वक्फ मंडळ प्रयत्नशील आहे. सदर मालमत्तेवरील श्रीमती सिताबाई यांच्या अधिकारांवरुन त्यांच्या व वक्फ मंडळादरम्यान वक्फ न्यायाधिकरणापुढे सुरु असलेला दावा सद्य:स्थितीत प्रलंबित आहे. | झालेली नसल्याचे आयोगाने निष्कर्ष काढलेले आहेत. तथापि प्रकरणाची सद्य:स्थिती जाणून घेऊन कार्यवाही करण्याचे आदेश वक्फ मंडळाला द्यावेत. | |
| ५७ | ५७ | बडा तकीया, नूतन कॉलनी, औरंगाबाद | बडा तकीया, नूतन कॉलनी, औरंगाबाद चा सीटीएस क्र.17474 मधील 159.5 मीटर इतक्या क्षेत्रफळाचे भूखंड मुतवल्लीने बेकायदेशीरपणे प्रथम भाडेपट्ट्यावर दिले व तद्नंतर त्याची विक्री केली. सीटीएस क्र.17494 हा भूखंड श्री.अब्दुल लतीफ शेख मुनीर यांच्या नावे असून त्याची दि.06.05.1978 च्या विक्री कराराद्वारे विक्री करण्यात आलेली आहे. तथापि, नंतरच्या कालावधीत दि.14.12.1978 रोजी सादर करण्यात आलेल्या शुध्दिपत्रकास उप निबंधक, औरंगाबाद यांनी मान्यता दिली असून त्याद्वारे वक्फ मंडळाच्या नावे असलेला सीटीएस क्र.17474 हा भूखंड हस्तांतरित करण्यात आल्याचे दर्शविण्यात आले. सदर प्रकरणी वक्फ बोर्डाला नोटीस देण्यात आली नव्हती व त्यांच्या अपरोक्ष सदर व्यवहार पूर्ण करण्यात आला होता. तथापि, वक्फ मंडळाने नंतरच्या कालावधीत सदर कार्यवाहीस (१.१.१९९५) मान्यता दिली. यासाठी तत्कालीन मु.का.अ., वक्फ मंडळ हे जबाबदार आहेत. | महसुल विभागाला विनंती आहे की, त्यांनी शा.नि. निर्गमित करुन, वक्फ मालमत्तांच्या मालमत्तांसबंधीच्या कोणत्याही व्यवहारात उप निबंधक स्तराच्या अधिकाऱ्यांकडून कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही, याबाबत दक्षता घेण्याच्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निदेश देण्यात यावेत, सर्व वक्फ मालमत्तांच्या 7/12 उताऱ्यातील कब्जेदार रकान्यात केवळ संबंधीत वक्फ मालमत्तेचे नाव नोंदविण्यात यावे आणि व प्रतिबंधीत सत्ता प्रकार अशी नोंद घेण्यात यावी. तत्कालीन मु.का.अ. यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.<br>सदर वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ न्यायाधिकरणात अपील दाखल करण्यात यावे. | |
| ५८ | ५८<br>महसूल<br>एस.डी.ओ.<br>श्रीरामपूर | मैदान आणि कब्रस्थान ट्रस्ट, नेवासा, अहमदनगर. | मैदान आणि कब्रस्थान ट्रस्ट, नेवासा, अहमदनगर ची सर्व्हे क्र.441-अे मधील 9 हेक्टर 86 आर इतकी जमीन शासनाने मुस्लिम कब्रस्थान आणि इदगासाठी सन 1950 साली फेरफार नोंद क्रमांक 2328 अन्वये प्रदान केली होती. उप विभागीय अधिकारी श्रीरामपूर यांनी त्यांच्या दि.19.06.2006 च्या आदेशान्वये सदर जमीन 2 हेक्टर 70 आर इतकी कमी केली. असे करताना त्यांनी वक्फ मंडळ किंवा इदगा कमिटीला नोटीस देखिल बजावली नव्हती. दि.19.06.2006 रोजी उप विभागीय अधिकारी, श्रीरामपूर पदावर कार्यरत अधिकारी यासाठी जबाबदार असून जिल्हा अधिकारी, अहमदनगर सदर प्रकरणात लक्ष घालण्याविषयी सांगता येईल. | 1. प्रकरणाची तपासणी करुन शासनाने करावयाच्या कारवाईबाबत अहवाल सादर करण्याचे महसूल विभागाने जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना निदेश द्यावेत.<br>2. प्रकरणाचा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे पाठपुरावा करण्याबाबत वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| ५९ | ५९ | मस्जिद शाहजहाँनपूरा, पैठण, | वक्फ मालमत्तेवरील बेकायदेशीर ताबा. सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन संबंधित | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | जि.औरंगाबाद | अधिकारी, वक्फ मंडळ यांनी दि. 28.6.2007 आणि दि.23.7.2007 रोजी पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, पैठण व पोलीस अधिक्षक (ग्रामीण), औरंगाबाद यांना केलेल्या तक्रारी सदर वक्फ जमीनीची राजपत्रात पृ.68-69 येथे अ.क्र.51 खाली दि.4.10.1973 रोजी नोंद असल्याचे व सदर जमिनीवर काही लोक अनधिकृतरित्या बांधकाम करीत असल्याचे व ते उप जिल्हाधिकारी (प्रशासन), औरंगाबाद यांच्या स्थगिती आदेशांचे पालन करीत नसल्याचे नमूद केले आहे. वास्तविक पाहता मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.एस.एस.अली कादरी यांनी वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 52 खाली कार्यवाही करणे आवश्यक होते. तथापि, त्यांनी तसे न केल्याने त्यांचे काही असद्भावपूर्वक हेतू होते असे नमूद करुन आयोगाने त्यांना वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 52 खाली कार्यवाही न करण्यास जबाबदार धरले आहे व सदर प्रकरणी वक्फ मंडळाने वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 52 व 54 खाली कार्यवाही करण्याची शिफारस केली आहे. | मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. | |
| ६० | ६० | जामा मस्जिद, थेरगाव, ता.पैठण, जि.औरंगाबाद | मुतवल्ली पदावरील नियुक्ती. तक्रारीत तथ्य आढळून न आल्याचे नमूद करुन आयोगाने तक्रार दप्तरी दाखल केली आहे. | तक्रारीत तथ्य आढळून आले नाही. अभिप्राय निरंक. | |
| ६१ | ६१<br>महसूल विभाग | धोबी समाजाची दर्गा, औरंगाबाद. | धोबी समाजाची दर्गा, औरंगाबाद ची सर्व्हे क्र.58 मधील 10 एकर 29 गुंठे इतकी जागा आहे. तथापि, महसूल विभागाने फक्त 1 एकर 20 गुंठे जमिनीची 7/12 उताऱ्यात नोंद घेतली आहे. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी दि.15.10.1975 च्या पत्रान्वये निदेश देऊनही मस्जिदीचे नाव देखिल कब्जेदार रकान्यात न दर्शविण्यात इतर हक्क रकान्यात दर्शविण्यात आलेले आहे. महसूल निरिक्षकांनी जमिनीची मोजणी करुन तहसिलदार औरंगाबाद यांना सादर केलेल्या दि.06.04.2010 च्या अहवालाअन्वये महसुली अभिलेखात 5 एकर 38 गुंठे इतकी जमीन मस्जिद आणि कब्रस्थानासाठी नोंदविण्याचे प्रस्तावित केले. सर्व्हे क्र.98 मधील नेमकी किती जमीन इनाम जमीन आहे, याचे तहसिलदाराने सादर केलेल्या कागदपत्रावरुन आयोगाला आकलन झाले नाही. सर्व्हेचा क्रमांक 89 आहे का 99 याबद्दल देखिल संभ्रम आहे. | 1. महसूल व वन विभागाने जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे अहवाल मागवावा आणि महसुली अभिलेखातील इनामासंदर्भातील नोंदी दुरुस्त कराव्यात.<br>2. प्रकरणाचा जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे पाठपुरावा करण्याबाबत वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| ६२ | ६२ | दर्गाह सय्यद मन्सूर शाहवली, बीड | दर्गाह सय्यद मन्सूर शाहवली, बीड च्या वक्फ जमिनीचा बेकायदेशीर भाडेपट्टा. वक्फ अधिनियम, 1995 मधील कलम 32 (2) (जे) चे उल्लंघन झालेले आहे. | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | दि.7.3.91 व दि.19.3.91 रोजी कार्यरत असणारे व तेव्हापासून ते आजतागायत कार्यरत असणारे जिल्हा वक्फ अधिकारी हे सदर बेकायदेशीर व्यवहारासाठी व त्याकडे दुर्लक्ष करण्यासाठी जबाबदार. सदर प्रकरणी झालेला व्यवहार नियमित करण्याविषयी वक्फ मंडळाने काढलेले दि.24.11.2005 रोजीचे आदेश हे कार्यालय अधिक्षकांच्या स्वाक्षरीने काढण्यात आलेले असल्याने त्यासाठी कार्यालयीन अधिक्षक तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी हे जबाबदार. | मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. | |
| ६३ | ६३<br>अतिक्रमण आणि भाडेपट्टा | मस्जिद तकीयाँ, बारुदगड नाला आणि चिल्ला शाह नसरुद्दीन अनिस शेख चाँद साहब सुभाणी, नागेश्वरवाडी, औरंगाबाद. | मस्जिद तकीयाँ, बारुदगड नाला आणि चिल्ला शाह नसरुद्दीन अनिस शेख चाँद साहब सुभाणी, नागेश्वरवाडी, औरंगाबाद ची सर्व्हे क्र.86 मधील 11 एकर 34 गुंठे ज्यामध्ये सीटीएस क्र.2928, 4672 आणि इतर मालमत्तांचा समावेश आहे, या जमिनी बेकायदेशिरपणे हस्तांतरित किंवा अतिक्रमणीत करण्यात आलेल्या आहेत. नगर सर्व्हेक्षण अधिकारी यांनी त्यांच्या क्रमांक एनबी/पीबी-2/बीएन/1297/08, दि.30.12.2008 च्या आदेशान्वये सर्व्हे क्र.86 ही वक्फ मालमत्ता असल्याचे जाहीर केले. तथापि, तक्रारदाराला अधिक्षक, भूमी अभिलेख यांच्यापुढे प्रकरण सादर करण्याचा सल्ला देण्यात आला. आयोगाची अशी भावना आहे की, महसुली अभिलेख दुरुस्त करण्याच्या दृष्टीने वक्फ मंडळाने देखिल सदर प्रकरण सक्षम न्यायालयात उपस्थित करणे आवश्यक होते. वक्फ मंडळाने अनेक भूखंड रु.10 ते रु.15 प्रतिवर्ष इतके अल्प भाडे आकारुन भाडेपट्टीवरही दिल्याचे निदर्शनास आले. वक्फ मालमत्तेकडे दुर्लक्ष करणारा दृष्टीकोन बाळगण्यासाठी सन 1978 पासूनचे आजपर्यंत वक्फ मंडळाचे चेअरमन आणि सचिव हे जबाबदार आहेत. सीटीएस क्र.4677 मधील 980.9 चौ.मी. इतकी जागा औरंगाबाद महापालिकेला भाडेपटटीवर देण्यात आली आहे किंवा कसे हा सुध्दा प्रश्न आहे. आयुक्त, महानगरपालिका आणि मुकाअ, वक्फ बोर्ड यांनी आयोगाच्या नोटीसींना प्रतिसाद दिला नाही. यासंदर्भात वक्फ न्यायाधिकरणात दावा क्र.46/2007 प्रलंबित आहे. | 1. सर्व वक्फ मालमत्तांच्या कब्जेदार रकान्यामध्ये संबंधीत वक्फ संस्थेच्या नावाची नोंद करण्याच्या महसूल विभागाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निदेश दयावेत.<br>2. प्रकरणाचा जिल्हाधिकारी, यांच्याकडे व वक्फ न्यायाधिकरणातील प्रकरणाचा पाठपुरावा करण्याबाबत वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |
| ६४ | ६४<br>महसूल निर्वासित मालमत्ता | मस्जिद नझीर रोझबा मोहल्ला (किल्ला अर्क), हर्सुल, औरंगाबाद. | श्रीमती.खैरुन्नीसा यांनी पाकिस्तानला स्थंलातर केल्यानंतर मस्जिद नझीर रोझबा मोहल्ला (किल्ला अर्क), हर्सुल, औरंगाबाद ची सर्व्हे क्र.42, 43, 47, 48, 173, 174 व 175 या मालमत्ता, सर्व्हे क्र.173, 174 वगळता, निर्वासित मालमत्ता (Evacuee property) म्हणून घोषित करण्यात आल्या व शासनाने | महसुली अधिकाऱ्यांनी पारित केलेले आदेश सुधारित करण्याच्या दृष्टीने वक्फ मंडळाने वक्फ न्यायाधिकरणात अर्ज करावा. कारण, वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 107 येथील | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | त्या ताब्यात घेऊन पाकिस्तानातून भारतात आलेल्या स्थलांतरितांना वाटप केल्या. उप जिल्हाधिकारी, भू.सु. यांनी त्यांच्या आदेश क्र.96/एलआर-डेस्क-2/वीपी/सीआर/14, दि.20.04.1996 अन्वये द्वारकादास यांची मालमत्ता इनाम खालसा कायदयाच्या तरतुदीतून वगळून दि.13.06.1996 रोजी विक्री करार कार्यान्वित केले. या आदेशात सदरची जमीन कम्युनिटी सर्व्हीस इनाम असल्याचे नमूद करण्यात आले असले तरी राजपत्रात सदर जमीन सर्व्हिस इनाम म्हणून नोंद आहे. उप जिल्हाधिकारी, श्री.जी.के.कळसकर यांनी कोणत्याही पुराव्यांचा आधार न घेता निर्णय घेतला व सर्व्हे क्र.173 येथील जमीन मदतमाश असल्याचे घोषित केले. असे करताना त्यांनी वक्फ मंडळाकडून अभिलेख मागविणे अपेक्षित होते. सबब. उप जिल्हाधिकारी हे स्वच्छंद (arbitrary) आदेश काढण्यासाठी जबाबदार आहेत. सर्व्हे क्र.42, 43, 47, 48 मधील वक्फ मालमत्तांची सद्यस्थिती काय आहे, व या मालमत्ता निर्वासित मालमत्ता म्हणून घोषित करणे शक्य आहे किंवा कसे याबाबत आयोगाने बजावलेल्या समन्सना मुकाअ, वक्फ मंडळ व उपजिल्हाधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. सबब, या मुद्दयावर आयोगाने कोणतेही निरिक्षण नोंदविले नाही. | तरतुदींनुसार वक्फ मालमत्तांना Limitation Act च्या तरतुदी लागू होत नाही. त्याचप्रमाणे वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 108 अन्वये विशिष्ट तरतूद करण्यात आली आहे की, वक्फ अधिनियमाच्या तरतूदी निर्वासित मालमत्तांना लागू होतील आणि Evacuee Property Act, 1950 च्या कलम 11(1) मधील उद्दिष्टांकरिता या मालमत्ता ज्याप्रमाणे वक्फ मालमत्तेच्या मुतवल्ली ठायी निहित होत्या त्याचप्रमाणे त्या वक्फ मंडळाच्या ठायी निहित होतील आणि आवश्यक असेल इतक्या कालावधीकरिता त्या वक्फ मंडळाच्या थेट व्यवस्थापनाखाली राहतील . | |
| ६५ | ६५<br>नगर विकास विभाग | दर्गाह हद्देखुर्द (बावीस ख्वाजा) खुलताबाद, जि.औरंगाबाद | दर्गाह कमिटीने एकूण 19 लोकांना वक्फ जमिनीवरील प्लॉट 11 महिन्याकरिता भाडेपट्टीवर दिले. या प्रकरणी कायदयाचे भंग झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, स.नं.144 चे व विशेष करुन 30 एकर वक्फ जमिनींची पुन: मोजणी करणे आवश्यक असल्याचे आयोगाने नमूद केले आहे. | स.नं.144 चे व विशेष करुन 30 एकर वक्फ जमिनींची पुन: मोजणी करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. | |
| ६६ | ६६<br>न.वि.वि.<br>नगर परिषद, जालना | अब्बासिया मस्जिद, जालना | अब्बासिया मस्जिद, जालना ची स.नं.233 मधील सी.टी. एस. नं.10599 आणि 10600 जालना नगर परिषदेने जाहीर लिलावाद्वारे श्री.रुणवाल यांना विकल्याचे व तद्नंतर तेथे बांधकाम करण्यास देखील परवानगी दिली असल्याचे आयोगाचे म्हणणे आहे. सदर प्रकरणी वक्फ जमिनींची बेकायदेशीरपणे विक्री करण्यासाठी जालना नगर परिषद जबाबदार असल्याचे आयोगाने नमूद केले आहे. | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. जालना नगर परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कार्यवाही करण्यात यावी. | |
| ६७ | ६७ | कब्रस्तान गरीबशाह बाजार, जालना | कब्रस्तान गरीबशाह बाजार, जालना. वक्फ जमिनी ११ महिन्याच्या भाडेपट्टयावर दिल्या. कायद्याचा भंग नाही तथापि, विहित पध्दत अनुसरली नाही. | -"- | |
| ६८ | ६८ | मोती कारंजा मस्जिद, औरंगाबाद | मोती कारंजा मस्जिद, औरंगाबाद. लीज करार सदर प्रकरणी करार करताना जिल्हा वक्फ अधिकारी व मु.का.अ. यांनी दाखविलेली तत्परता संशयास्पद असून सदर व्यवहारास श्री.एस.एस.अली कादरी व जिल्हा वक्फ अधिकारी श्री.मुनीर खान हे जबाबदार असल्याचे आयोगाचे म्हणणे आहे. | -"- | |
| ६९ | ६९ | दर्गाह मदारशाह पीर आडगाव, ता. व जि. नाशिक | सदर वक्फ मालमत्तेचे वर्णन स.नं. 289 प्रतीबंदी क्र.905 येथील 33 एकर 34 गुंठे असे असून अन्य एका स.नं. 905 प्रतिबंदी क्र.318 मधील 31 एकर 36 गुंठे ही जमीन मोतीयान कुटुंबियांची असून त्यावर मोतीयान बिल्डर्समार्फत बांधकाम सुरु असल्याचे आयोगास आढळून आले असून 905 हा आकडा दोन्ही ठिकाणी आल्याने गैरसमज झाल्याचे आयोगाने नमूद केले असून तथ्य आढळून न आल्याने तक्रार दप्तरीदाखल केली आहे. | प्रकरणात तथ्य नाही. दप्तरी दाखल. | |
| ७० | ७० करिमभाई अनाथालय | करीमभाई इब्राहीमभाई अनाथालय, मुंबई | मलबारहिल, मुंबई येथील करीमभाई इब्राहीमभाई अनाथालय, मुंबईची 4532.39 चौ.मी. म्हणजेच 48768.51 चौ. फूट ही जागा ॲन्टीलिया कमर्शियल प्रा.लि. यांना रु.21,05,00,000/- (रुपये एकवीस कोटी पाच लाख फक्त) इतक्या अत्यंत कमी किंमतीत विकण्यात आल्याची श्री.अनिस अहमद यांनी आयोगापुढे तक्रार दाखल केली होती. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांनी त्यांच्या पत्र क्र. सीएएच 2203/(101)/का-1, दि.14.8.2008 अन्वये काही वर्तमानपत्रांची कात्रणे व इतर संबंधित कागदपत्रे आयोगास पाठविण्यात आली होती. सदर व्यवहारावर वर्तमानपत्रातून मोठया प्रमाणावर टिका करण्यात आली.<br>सदर प्रकरणी झालेल्या व्यवहारास सह धर्मादाय आयुक्तांनी त्यांच्या दि.27.8.2002 च्या आदेशान्वये मान्यता दिली होती व त्यानुसार दि.21.11.2002 रोजी करीमभाई इब्राहिमभाई अनाथालय या संस्थेने विक्री करार कार्यान्वित केले.<br>आयोगाने बजावलेल्या समन्सला अनुसरुन मु.का.अ. यांनी मंडळाच्या दि.8.10.2004 च्या ठरावासोबत दि.9.3.2005 चे ठराव क्र.21 सादर केले हे दोन्ही ठराव मंडळाच्या एकूण 9 पैकी 5 सदस्यांनी पारीत केलेले असल्याने व ही संख्या 2/3 बहुमतापेक्षा कमी असल्याने सदर दोन्ही ठराव वक्फ अधिनियम, 1995 मधील कलम क्र.32 (2) (जे) चे उल्लंघन करणारे आहे. हे दोन्ही ठराव | न्याय प्रविष्ट प्रकरण. न्यायालयीन प्रकरणाचा पाठपुरावा करण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावे. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पारीत करण्यात मंडळाचे सदस्य श्री.हारुन आदम सोलकर व मु.का.अ. श्री.एम.वाय पटेल या दोघांनीही सक्रिय सहभाग घेतला असल्याचे आयोगाने नमूद केले आहे. सदर व्यवहाराच्या वैधतेला उच्च न्यायालयापुढे आव्हान देण्यात आले होते व त्यानंतर ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयापुढे गेले व सद्य:स्थितीत ते उच्च न्यायालयात याचिका क्र.3026/2005 अन्वये प्रलंबित आहे. सदर याचिकेन्वये धर्मादाय आयुक्तांच्या दि.24.7.2003 च्या परिपत्रकास आव्हान देण्यात आले होते, ज्यान्वये धर्मादाय आयुक्तांनी पब्लिक ट्रस्ट म्हणून नोंदणी झालेल्या वक्फ संस्थांना पब्लिक ट्रस्ट ॲक्ट खाली हाताळले जाणार नाही असे निदेश दिले होते. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन मु.का.अ. वक्फ मंडळ व धर्मादाय आयुक्तांना वक्फ अधिनियमांतर्गत कार्यवाही न करण्याबाबत निदेश देण्याची उच्च न्यायालयास विनंती करण्यात आली. सदर संपत्ती वक्फ नसून एक ट्रस्ट आहे असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने आयोगाने मतप्रदर्शन न करता पुढीलप्रमाणे वस्तुस्थिती मांडली आहे.<br>आयोगापुढे करीमभाई ट्रस्टची बाजू ॲड.श्री.साठे यांनी मांडली. त्यांच्या युक्तिवादाच्या पार्श्वभूमीवर आयोगाने पुढील मुद्दे मांडले आहेत :-<br>सदर ट्रस्ट/वक्फ दि.27.6.1896 रोजी खोजा समुदायातील निराश्रित/अनाथ मुलांना निर्वाह व शिक्षण पुरविण्याच्या हेतूने अस्तित्वात आले. ट्रस्टच्या नियमावली-तील कलम 5 मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, व्यवस्थापन समिती अनाथालयातील विद्यार्थ्यांना कुराण आणि इस्लाम धर्मातील मूलभूत तत्व शिकविण्यासाठी एका धार्मिक शिक्षकाची नियुक्ती करेल. तथापि, यामध्ये स्पष्ट शब्दात वक्फ असा उल्लेख नाही. वक्फ शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे :-<br>वक्फ म्हणजे, इस्लाम धर्माचे आचरण करणाऱ्या एखादया व्यक्तीने स्थावर किंवा जंगम मालमत्तेचे धर्मशील, धार्मिक किंवा धर्मादाय (pious, religious or charitable) उद्देशाने कायमसाठी दान/समर्पण करणे होय.<br>प्रस्तुत ट्रस्टच्या घटनेचे अवलोकनावरुन दिसून आले की, सदर ट्रस्टसाठी कायमस्वरुपाने संपत्ती समर्पण करण्यामागे कोणताही खाजगी हेतू नव्हता उलटपक्षी ट्रस्टच्या भल्यासाठी संपत्तीचे विक्री व पुनर्खरेदी अधिकार देखिल प्रदान करण्यात आले होते. सदर ट्रस्टची निर्मिती 1896 साली झाली व 1952 साली मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा, 1950 अंतर्गत त्याची ट्रस्ट म्हणून नोंद करण्यात आली. सन 2003 साली पहिल्यांदा त्याची वक्फ म्हणून नोंद करण्यात आली. 1952 साली वक्फ कायदा अस्तित्वात नसल्याने ट्रस्ट म्हणून नोंदणी करण्यात आली होती. तथापि, त्यामुळे समर्पणाच्या स्वरुपात बदल होत नाही. | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 2 येथील तरतुदीन्वये स्पष्ट करण्यात आले आहे की, सदर कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीच समर्पण करण्यात आलेल्या संपत्तींनासुध्दा हा कायदा लागू होईल. याचाच अर्थ एखादी मालमत्ता वक्फ अधिनियम अंतर्गत वक्फ म्हणून नोंदणी करण्यात आलेली आहे किंवा नाही याने फरक पडत नाही.<br>सदर संपत्ती वक्फ मंडळाची पूर्व मान्यता न घेता दि.21.11.2010 च्या विक्री कराराद्वारे ॲन्टीलीया कॉर्पोरेशनला हस्तांतरीत करण्यात आली. वक्फ अधिनियमातील कलम 32 (2) (जे) मधील तरतुदींनुसार वक्फ मालमत्ता हस्तांतरण करण्यापूर्वी वक्फ मंडळातील 2/3 सदस्यांच्या बहुमताने त्या अर्थाचा ठराव पारीत होणे आवश्यक आहे. तरच अशा व्यवहाराला वैधता प्राप्त होते. या प्रकरणी वक्फ मंडळाची मान्यता घेण्यात आलेली नव्हती व वक्फ मंडळात ठराव देखिल पारीत करण्यात आलेला नव्हता. सदर समर्पण वक्फ ठरल्यास हा मुद्दा विचारात घ्यावा लागेल.<br>वक्फ अधिनियम, 1995 मधील कलम 112 (3) मधील तरतुदीनुसार धर्मादाय आयुक्तांना वक्फ संपत्ती संदर्भात कोणतेही अधिकार नाहीत. सदर बाब विचारात घेतल्यास सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे दि.27.8.2002 चे आदेश वैध ठरतात का असा मुद्दा उपस्थित होतो.<br>या संदर्भात वक्फ मंडळाने केलेल्या कार्यवाहीस वक्फ न्यायाधिकरणापुढे दावा क्र.60/2004 अन्वये आव्हान देण्यात आले होते. तद्नंतर वक्फ मंडळाला रु.16,00,000/- इतक्या रकमेचा भरणा केल्यानंतर ते मागे घेण्यात आले. सदर कार्यवाही वक्फ मंडळातील दि.9.3.2005 च्या ठरावा आधारे करण्यात आली होती. विक्री व्यवहाराला वक्फ मंडळाने मागाहून अशाप्रकारे नियमित करणे वैध आहे का, असा मुद्दा उपस्थित होतो. वक्फ अधिनियम, 1995 यामधील कलम 51 मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, वक्फ मालमत्तेसंदर्भात करण्यात आलेला विक्री, उपहार, अदलाबदल किंवा गहाण ठेवण्यासंदर्भात करण्यात आलेले करार जर वक्फ मंडळाच्या पूर्व मान्यतेने करण्यात आलेले नसल्यास ते अवैध (void) ठरतात. सदर मालमत्ता वक्फ असेल तर हा मुद्दा देखिल उपस्थित होईल.<br>सदर संस्था वक्फ अधिनियमांतर्गत वक्फ म्हणून नव्हे तर मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायद्यांतर्गत ट्रस्ट म्हणून नोंदणी करण्यात आलेली आहे, असा आक्षेप देखिल खरेदीदार व विक्रेता यांनी उपस्थित केलेला आहे. या प्रश्नाचे उत्तर सदर संस्थेच्या घटनेच्या अन्वयार्थावर अवलंबून आहे. सदर संस्थेच्या घटनेकडे गांभीर्याने व यथोचित आशयाने (appropriate spirit) पाहिल्यास संबंधित | | |

पक्षाने सदर संस्थेचे गठन वक्फ म्हणून केले की, ट्रस्ट म्हणून हे स्पष्ट होते. येथे धर्मादाय संस्थांकरिता संपत्ती कायमची समर्पित करण्यात आलेली आहे. असे करताना संपत्ती हस्तांतरण करण्याचे अधिकार देखिल प्रदान करण्यात आले होते जे वक्फ तत्वाच्या विरुध्द आहे. समुदायातील अनाथ मुलांचे निर्वाह करणे व त्यांना धार्मिक म्हणजे कुराणाचे शिक्षण देणे असे संस्थेचे उद्देश असले तरी त्यात वक्फ या शब्दाचा उल्लेख नसून ट्रस्ट असा उल्लेख आहे.

ट्रस्टने ॲन्टीलिया कॉर्पोरेशन बरोबर दि. 20.11.2002 रोजी केलेला विक्री करार बोर्डाच्या दि.9.3.2005 च्या ठरावाद्वारे नियमित करण्यात आला व तद्नंतर सदर ठराव दि.28.4.2005 च्या ठरावाद्वारे दृढीकृत करण्यात आला. या वस्तुस्थितीला दोन संदर्भ आहेत. पहिले म्हणजे वक्फ न्यायाधिकरणापुढील दावा क्र. 60/2004 प्रकरणी दोन्ही पक्षांनी रु.16,00,000/- च्या बदल्यात तडजोड करण्यात आली. यावरुन असा मुद्दा उपस्थित होतो की, विक्रेता व खरेदीदारांनी अशाप्रकारे वक्फ अधिनियमाच्या कार्यकक्षेत समर्पण केल्यानंतर आता ते त्यांच्या शब्द व कृतीपासून मागे फिरु शकतात का, त्याचप्रमाणे वक्फ मंडळ सदर व्यवहारास पुन्हा आव्हान देण्यासाठी प्रतिष्टंभित (estopped) झाले आहे काय.

दुसरा मुद्दा म्हणजे वक्फ मंडळाने दि. 9.3.2005 रोजी ठराव करुन नंतर दि. 28.4.2005 रोजी सदर ठरावाचे दृढीकरण केले असले तरी सदर ठराव अवैध ठरतात का, व ते विक्री करार नियमित करण्यास सक्षम आहेत काय? कारण वक्फ अधिनियम, 1995 मधील कलम 51 येथील तरतुदींनुसार वक्फ मंडळाची पूर्वमान्यता आवश्यक आहे. सदर तरतुदीत पूर्व असा शब्द वापरण्यात आलेला असून त्याला विशिष्ट महत्व व आशय आहे. संपत्ती खाजगी नसून सार्वजनिक असल्याने पूर्व हा शब्द विशेष अर्थाने वारलला गेला आहे. म्हणजेच संपत्ती हस्तांतरणाच्या व्यवहारापूर्वी वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 32 (2) (जे) मधील तरतुदींनुसार वक्फ मंडळाचा ठराव पारीत केला जाणे आवश्यक आहे. येथे घोडयाच्या पुढे गाडी सोडण्यात आली आहे काय, व ते कायद्याने मान्य आहे काय, व त्यामुळे मंडळाचे उपरोल्लेखित ठराव वैधतारहित आहेत काय, शिवाय सदर ठरावास अनुसरुन विक्रेत्यांनी वक्फ मंडळाला रु.16,00,000/- चा भरणा केला व अशाप्रकारे विक्रेता व खरेदीदार या दोघांनीही वक्फ अधिनियमास शरण जाण्याला परिणाम उरतो का?

हे खरे आहे की, ॲन्टीलिया कमर्शियल प्रा.लि. यांनी तडजोडीचा प्रस्ताव पाठविताना त्याच्या सुरुवातीस Without Prejudice असे नमूद केले होते. करीमभाई अनाथालयाने पोस्टाने पाठविलेल्या दि.15.10.2010 व

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | दि.1.11.2010 पत्रात या मुद्दयावर भर दिला आहे की, रु.16,00,000/- च्या भूगतान Without Prejudice करण्यात आला होता व सदर अनाथालय वक्फ नसून ट्रस्ट आहे हा दावा सोडण्यात आलेला आहे. Without Prejudice या शब्द वापरासंदर्भात आयोगाने इंग्लंडच्या Halsbury's Law चा उल्लेख करुन या वाक्प्रचाराचा अर्थ, प्रकरणाचा अद्याप निवाडा झालेला नसून ते अद्याप अभिनिर्णयासाठी (adjudication) खुले आहे व पुढील कार्यवाहीस बाधा येणार नाही, असा होतो व पुढे या वाक्प्रचाराचा वापर केल्याने तो जुन्या वस्तुमानाच्या फेरबदल करण्यास व नवीन वस्तुमानाची निर्मिती करण्यास कार्यान्वित होतो, व संबंधित पक्ष या विधानाची (proposition) वैधता नाकारु शकत नाही, असे आयोगाने नमूद केले आहे.<br>सदर संस्थेची सन 1896 मध्ये स्थापना करताना खोजा समुदायातील लोकांकडून रु.35,951/- इतकी वर्गणी गोळा करण्यात आली होती व ती एकूण रु.55,000/- मध्ये समाविष्ट करण्यात आली होती.<br>सदर प्रकरणी झालेल्या बेकायदेशीर व्यवहारास वक्फ मंडळाचे तत्कालीन चेअरमन श्री.एम.ए. अजीज (आता मयत) व तत्कालीन मु.का.अ. श्री.एम.वाय.पटेल, हे जबाबदार असल्याचे आयोगाने नमूद केले आहे. श्री.एम.वाय.पटेल यांनी वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 26 अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर केला नाही. तत्कालीन मु.का.अ. श्री.एस.एस. अली कादरी हे सुध्दा दुर्बोध उत्तर (cryptic answer) देण्यासाठी जबाबदार असल्याचे आयोगाने नमूद केले आहे.<br>सदर प्रकरणी वक्फ मंडळ तसेच करीमभाई इब्राहीमभाई अनाथालय, या दोन्ही पक्षांकडे अधिक/उणे मुद्दे असल्याने दोन्ही पक्षांनी एकत्र येऊन सन्माननीय तोडगा काढावा, अन्यथा प्रकरण प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेत अडकून पडेल, असे आयोगाने शेवटी प्रस्तावित केले आहे. | | |
| ७१ | ७१ | माहीम, लोअर परेल डिव्हीजन, मुंबई येथील प्लॉट | सदर मालमत्ता वक्फ असल्या विषयीच्या तक्रारीत तथ्य न आढळून आल्याचे नमूद करुन आयोगाने तक्रार दप्तरी दाखल केलेली आहे. | चुकीची तक्रार. दप्तरी दाखल. | |
| ७२ | ७२<br>तारिक<br>अन्वर<br>आणि<br>ए.यु.पठाण | मुंबई येथील विविध वक्फ मालमत्ता | सद्य:स्थितीत वक्फ मंडळाला चेअरमन नसतांना तसेच वक्फ मंडळात कोणतेही ठराव पारीत न करता, मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ हे मुंबईतील विविध वक्फ मालमत्तेच्या विकासासंदर्भात नाहरकत प्रमाणपत्र जारी करत असल्याची आयोगापुढे तक्रार प्राप्त झाली होती.<br>दि.16/08/2007 नंतरच्या कालावधीत वक्फ मंडळात श्री.ए.यु.पठाण व | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मुंबईतील मालमत्ता | | श्री.तारीक अन्वर हे केवळ दोन सदस्य कार्यरत होते. मंडळाच्या चेअरमनची देखिल नियुक्ती करण्यात आलेली नव्हती.<br>भविष्यात अशी अवस्था असल्यास, वक्फ मंडळाने कायम स्वरुपी निर्णय (decisions of permanent nature) घेऊ नये, अशा अर्थाची नियमांत सुधारणा करावी, असे आयोगाने प्रस्तावित केले आहे.<br>दि.16/08/2007 नंतरच्या कालावधीत वक्फ मंडळाने मुंबईतील एकूण 9 मालमत्तांच्या विकासासंदर्भात ना हरकत प्रमाणपत्रे जारी केली आहेत. या 9 प्रकरणांपैकी 7 प्रकरणांमध्ये वक्फ मंडळाच्या ठरावाच्या सहाय्याने व उर्वरित 2 प्रकरणांमध्ये वक्फ मंडळाच्या ठरावाशिवाय कार्यवाही करण्यात आलेली आहे. ज्या 7 प्रकरणांमध्ये ठराव पारीत करण्यात आले त्यात सदरचे ठराव पारीत करताना किती व कोणते सदस्य उपस्थित होते याबाबत उल्लेख नाही. उर्वरित दोन प्रकरणांमध्ये वक्फ मंडळात ठराव पारीत करण्यात आला होता किंवा कसे, याबाबत संबंधित आदेशात उल्लेख नाही. त्यामुळे, मु.का.अ. यांनी त्यांच्या अधिकारांचा गैरवापर केला असण्याची शक्यता आहे. त्यामुळे, मु.का.अ., श्री.एस.एस. अली कादरी यांच्याविरुध्द विभागाने व शासनाने कारवाई करणे आवश्यक असल्याचे आयोगाने नमूद केले आहे.<br>याशिवाय, मुंबई येथील एक व औरंगाबाद येथील एक अशा एकूण दोन प्रकरणांमध्ये भाडेपट्टा कराराचे नुतनीकरण करण्यात आले. मुंबईतील जागेशी संबंधित आदेशात यासंदर्भात वक्फ मंडळाने ठराव पारीत करण्यात आल्याचा उल्लेख आहे, तथापि, त्यात सदरचे ठराव पारीत करताना किती व कोणते सदस्य उपस्थित होते याबाबत उल्लेख नाही. वक्फ मंडळाच्या चेअरमनची नियुक्ती करण्यात आलेली नसल्याने तसेच वक्फ मंडळ full fledge नसल्याने या प्रकरणांमध्ये केवळ 2 सदस्यांच्या मान्यतेने निर्णय घेण्यात आला असावा. वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 56(3) येथील तरतुदींनुसार वक्फ मंडळ भाडेपट्टीवर देण्यासंदर्भात केवळ मान्यता देऊ शकते व प्रत्यक्ष भाडेपट्टा कराराची कागदपत्रे कार्यान्वित करण्याचा मंडळास अधिकार नाही. याप्रकरणी महाराष्ट्र वक्फ नियमांतील नियम 25 चे ही पालन करण्यात आलेले नाही.<br>औरंगाबाद येथील जागेशी संबंधित प्रकरणामध्ये मंडळाच्या बैठकीत केवळ | कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. श्री. एस.एस. अली कादरी यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | एक सदस्य उपस्थित असल्याचा उल्लेख आहे. असे असेल तर वक्फ अधिनियम, 1995 मधील कलम क्र.32(2)(जे) चे पालन केले जाणे अशक्य आहे, कारण एक सदस्याने 2/3 बहुमत होऊ शकत नाही.<br>उपरोक्त प्रकरणांहून भिन्न अशा मुंबईतील आणखी 9 प्रकरणांमध्येही वक्फ मालमत्ताचा विकास करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याचे आयोगाने नमूद केले असून या प्रकरणीही आयोगाचे मत पुर्वीच्या 9 प्रकरणांसमान असल्याचे म्हटले आहे. | | |
| ७३ | ७३ | दर्गाह समर्थनगर, औरंगाबाद | दर्गाह समर्थनगर, औरंगाबाद शेजारील प्लॉट क्र.246 वर अतिक्रमण करण्यात आल्याची तक्रार. मु.का.अ., वा तक्रारदार यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने आयोग असहाय्य ठरल्याचे आयोगाने नमूद केले आहे. | निरिक्षण नोंदविण्यात आले नाही. | |
| ७४ | ७४ | जामा मस्जिद, कवडगाव, ता.पैठाण, जि.औरंगाबाद | बाबु बेग व इतर यांनी सदर मालमत्ता वक्फ असल्याचे मान्य करुन ते ती विकणार नाही असे सांगितल्याने तक्रार निकाली काढण्यात आली. | तक्रार निकाली काढण्यात आली. | |
| ७५ | ७५<br>मुकाअ<br>एस.एस.ए.<br>काद्री | दर्गाह हडेकला, खुलताबाद, जि.औरंगाबाद. | दै.तरुण भारत व दै.रहेबर (उर्दु) या वर्तमान पत्रात दि.4.4.2010 रोजी अशी बातमी प्रसिध्द झाली होती की, श्री. रफत बेग यांनी केलेल्या तक्रारीस अनुसरुन मु.का.अ. वक्फ मंडळ श्री.एस.एस.अली कादरी यांनी त्यांच्या जवळच्या नातेवाईकांना वक्फ जमिनीचे वाटप केल्याबद्दल त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणी आयोगाने प्रकरणनिहाय नोंदविलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत:-<br>भाग-1 : सदर प्रकरणी जिल्हा न्यायालयात आर.सी.ए. क्र.63/2009 दाखल असून न्यायालयाने दि.25.2.2010 रोजी जैसे थे (status-quo) परिस्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. सदर न्यायालयीन प्रकरणी वक्फ मंडळ देखिल एक पार्टी आहे. त्यामुळे ही वस्तुस्थिती वक्फ मंडळाच्या मु.का.अ. यांना माहित असणे अभिप्रेत आहे. प्रकरण न्याय प्रविष्ट असताना व जैसे थे चे आदेश असताना मु.का.अ. वक्फ मंडळ यांना सदर जमिनीचे कोणत्याही पक्षाला वाटप करता येत नव्हते. सदर वस्तुस्थिती मु.का.अ. यांच्या निदर्शनास आणण्यात आलेली होती. तथापि, नातेवाईकांच्या हितसंबंधापुढे न्यायालयीन आदेशांना महत्व देण्यात आले नाही. सबब, सदर प्रकरणी झालेल्या अनियमितता व बेकायदेशीर कृतींस श्री.एस.एस. अली कादरी, मु.का.अ. हे जबाबदार | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | असल्याचे दिसून येते. त्यांनी न्यायालयीन आदेशात हस्तक्षेप केल्याचे दिसते व ते न्यायालयाच्या अवमान करण्यास देखिल जबाबदार ठरु शकतील.<br>भाग-2 : दर्गाह समिती, दर्गाह हडेकला, खुलताबाद च्या पदाधिकाऱ्यांनी दि.3.2.2010 च्या पत्रान्वये गट नं.89 (42) मधील ढोरकीन मु.का.अ., श्री.एस.एस.अली कादरी यांनी त्यांच्या चुलत सासऱ्यांना वाटप केल्याची तक्रार केली होती. या संदर्भात आयोगापुढे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून आले की, श्री.फजलोद्दीन हनीफोद्दीन यांची सदर दर्गाहचे मुतवल्ली म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे व मु.का.अ. यांनी त्यांच्या दि. 30.12.2008 च्या आदेशान्वये जिल्हा वक्फ अधिकाऱ्याला सदर जमिनीचा ताबा घेण्याबाबत निदेश दिले आहेत. याचाच अर्थ ज्याच्या ताब्यात सदर जमीन होती त्याला बेदखल करुन सदर जमिनीचा ताबा श्री.फजलोद्दीन यांना देण्यात आला. यावरुन मु.का.अ. हे त्यांच्या नातेवाईकांचे हितसंबंध कशाप्रकारे जपत होते हे दिसून येते. या अनियमिततेसाठी श्री.एस.एस. अली कादरी, मु.का.अ., हे जबाबदार आहेत.<br>भाग-3 : परभणी येथील स.नं.291 ही वक्फ मालमत्ता असून तेथील 40x100 फुटाचा प्लॉट मु.का.अ. वक्फ मंडळ यांनी दि.24.9.2008 च्या आदेशान्वये शशिशेखर सखाराम भालेराव यांना देण्यात आला होता. सदर प्रकरणी वक्फ अधिनियम, 1995 यामधील कलम 32 (2) (जे) मधील तरतुदींचे पालन करण्यात आले होते किंवा कसे याबाबत मु.का.अ., यांच्याकडून आयोगाने स्पष्टीकरण मागविले होते. तथापि, त्यांनी उत्तर दिले नाही. यावरुन मु.का.अ. यांनी या प्रकरणी त्यांच्या अधिकाराचा गैरवापर केल्याचे दिसून येत आहे. वक्फ अधिनियम, 1995 मधील कलम 56 येथील तरतुदींनुसार 11 महिन्याच्या कालावधीसाठी वक्फ जमिन भाडेपट्टयावर देण्यासाठी वक्फ मंडळाच्या ठरावाची आवश्यकता नसते. तथापि, सदर अधिकार संबंधित वक्फ मालमत्तेच्या मुतवल्लींना असून मु.का.अ.यांनी अशा प्रकरणी महाराष्ट्र राज्य वक्फ नियम 2003 मधील नियम क्र. 25 खाली असलेले अधिकार वापरणे अभिप्रेत नाही. असे अधिकार वापरण्यास मु.का.अ. सक्षम नाहीत.<br>भाग-1 येथे नमूद दर्गाह हडकेला संदर्भात वक्फ मंडळाने यथोचित पावले | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | उचलून इतर निविदाकारांच्या तक्रारीचे निवारण करणे आवश्यक आहे. भाग-2 येथे नमूद ढोरकीन या वक्फ मालमत्तेसंदर्भात व भाग-3 येथे नमूद परभणी येथील मालमत्तेसंदर्भात वक्फ मंडळाने वक्फ अधिनियम, 1995 मधील कलम 52, 54 व 55 खाली कार्यवाही करणे आवश्यक आहे, असे आयोगाने नमूद केले आहे. | | |
| ७६ | ७६ | दर्गाह हजरत सय्यद सुलेमान, बीड. | सदर प्रकरणी करण्यात आलेली तक्रार अत्यंत मोघम स्वरुपाची असून तक्रारीच्या पुष्टयर्थ आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आलेली नसल्याने कोणतीही कार्यवाही करता आलेली नाही व प्रकरण दप्तरी दाखल करण्यात आल्याचे आयोगाने नमूद केले आहे. | मोघम तक्रार. दप्तरी दाखल. | |
| ७७ | ७७ | मस्जिद बुंदेलपूरा, बीड | बेकायदेशीरपणे 99 वर्षाच्या पोट भाडेपट्टयावर (re-leased) दिल्याची तक्रार. तक्रारीत नमूद करण्यात आलेली जमीन ही शहराच्या मध्यभागी स्थित असून घरांनी वेढलेली आहे. जिल्हा वक्फ अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या उत्तरात श्री.अयुबखान रहीम खान यांना सदर जमीन 51 वर्षाच्या भाडेपट्टयावर देण्यात आल्याची मागणी केली आहे. तथापि, आयोगाने स्पष्टपणे विचारुन देखिल त्यांनी श्री.अयुब खान यांनी श्री.निजामोद्दीन यांच्याशी केलेल्या दि.22.11.99 च्या व्यवहाराबद्दल चकार शब्दाने उल्लेख केला नाही. यावरुन जिल्हा वक्फ अधिकारी श्री.शेख मकसूद अहमद यांचा गैरहेतू दिसून येतो.<br>दि.22.11.99 च्या कराराच्या अवलोकनावरुन श्री.अयुब खान यांनी बेकायदेशीरपणे सदर वक्फ मालमत्ता श्री. शेख निजामोद्दीन जैनुद्दीन यांना यांना 99 वर्षाच्या पोट भाडेपट्टयावर दिल्याचे व सदर प्रकरणी अब्दुल खालेख पिता मुसा यांनी साक्षीदार म्हणून स्वाक्षरी केल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी वक्फ अधिनियम, 1995 यामधील कलम 32 (2) (जे) r/w कलम 56 मधील तरतुदींचे उल्लंघन झालेले आहे. आयोगाने असेही नमूद केले आहे की, खालेख पेंटर नावाच्या इसमाने आयोगापुढे अनेक तक्रारी दाखल केलेल्या असून त्यांनीच सदर प्रकरणी साक्षीदार म्हणून स्वाक्षरी केली असल्यास त्यांचा असद्हेतू दिसून येतो.<br>सदर प्रकरणी झालेल्या बेकायदेशीर व्यवहारास श्री.अयुब खान रहीम खान, श्री.खालेख मोहम्मद मुसा, मु.का.अ. श्री.एस.एस.अली कादरी व जिल्हा वक्फ | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अधिकारी श्री.मसुद अहमद हे जबाबदार असल्याचे आयोगाने नमूद केले आहे.<br>सदर जमिनीवर ईदगाह उभारण्यात आली असल्याचे नमूद करुन असे केल्याने बेकायदेशीर व्यवहार कायदेशीर ठरणार नाही, व वक्फ मंडळाने सदर ईदगाह संपूर्ण 5 एकर जागेवर आहे किंवा उर्वरित जागा अन्य खाजगी व्यक्तीच्या ताब्यात आहे ही बाब सुनिश्चित करुन आवश्यक कार्यवाही करावी व जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांच्या चुकीच्या/खोटया निवेदनाबद्दल कार्यवाही करण्यात यावी असे आयोगाने नमूद केले आहे. | | |
| ७८ | ७८ | दर्गाह मगदूम शाह, वाघोरा जि.बीड | सदर प्रकरणी करण्यात आलेली तक्रार श्री.शेख नजीर, अध्यक्ष, शहर कॉंग्रेस (आय) कमिटी यांच्या लेटर हेडवर करण्यात आली होती. तथापि, श्री.शेख नजीर यांनी त्यांचा या तक्रारीशी काहीही संबंध नसल्याचे व कोणीतरी त्यांच्या लेटर हेड चा गैरवापर केल्याचे सांगितले. | अभिप्राय नाही. | |
| ७९ | ७९ | मराठवाडा विभागातील विविध वक्फ मालमत्ता | सदर प्रकरणी तक्रारीचा खरेपणा (authenticity) सुनिश्चित करणे आयोगाला शक्य झाले नाही कारण तक्रारदाराने स्वत: चे नांव सांगितले नाही. सदर प्रकरणी वक्फ मंडळाने व राज्य शासनाने तथ्यांची तपासणी करावी व असे अतिक्रमण असल्याचे सिध्द झाल्यास त्यापोटी वक्फ मंडळाला देणगी व प्रचलित बाजार भावाने भाडे अदा करण्यात यावे, असे आयोगाने निदेश दिले आहेत. | अभिप्राय नाही. | |
| ८० | ८० | विविध वक्फ मालमत्ता | तत्कालिन मराठवाडा वक्फ मंडळाचे सचिव श्री.एम.एम. सिद्दीकी (आता वक्फ मंडळात लेखा अधीक्षक म्हणून कार्यरत) यांनी अनेक वक्फ मालमत्ता भाडेपट्टयावर दिल्याचे वा त्यासंदर्भात अन्य व्यवहार केले असल्याची तक्रार आयोगापुढे प्राप्त झाली होती. हे सर्व व्यवहार वक्फ अधिनियम, 1995 लागू झाल्यानंतरच्या कालावधीत करण्यात आलेले असल्याने या प्रकरणी वक्फ अधिनियम, 1995 मधील कलम 32 (2) (जे) r/w कलम 56 येथील तसेच महाराष्ट्र वक्फ नियम 2003 यामधील नियम क्र. 25 आणि 26 मधील तरतुदींनुसार कार्यवाही केली जाणे आवश्यक होते. तसे झालेले नसल्याने या तरतुदींचा भंग झालेला आहे.<br>सदर प्रकरणी झालेल्या बेकायदेशीर व्यवहारास श्री.एम.एम.सिद्दीकी हे जबाबदार असून श्री.एस.एस.अली कादरी, मु.का.अ. यांनी याप्रकरणी आयोगाला सहकार्य न करण्यासाठी तसेच श्री.एम.एम.सिद्दीकी यांच्याशी हातमिळवणी करण्यास जबाबदार असल्याचे आयोगाने नमूद केले आहे. | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. श्री.एम.एम.सिद्दीकी यांच्यावर कारवाई करावी. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८१ | ८१ | मस्जिद मंडी बाजार, बीड | सदर प्रकरणी तक्रारदाराने त्याच्या तक्रारीच्या पुष्टयर्थ कोणतेही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तक्रारीत तथ्य आढळून न आल्याचे नमूद करुन आयोगाने तक्रार दप्तरी दाखल केलेली आहे. | तथ्य आढळून आले नाही. दप्तरी दाखल. | |
| ८२ | ८२ अतिक्रमण | अम्बाई, ता.सिल्लोड येथील मस्जिद, जि.औरंगाबाद | सदर वक्फ मालमत्तेवरील अतिक्रमणे हटविण्याच्या दृष्टीने वक्फ मंडळाने कायदेशीर कार्यवाही सुरु करावी असे आयोगाने नमूद केले असून सदर प्रकरणी वक्फ मंडळाला Bombay Government Premises (Eviction) Act, 1955, the Amendment Act No.1 of 2008, जे दि.27.8.2008 पासून लागू करण्यात आलेले असून यातील तरतुदी वक्फ मालमत्तांना देखिल लागू करण्यात आलेले आहेत, या कायद्यातील तरतुदींतर्गत कार्यवाही करण्याचे शक्य असल्याचेही आयोगाने नमूद केले आहे. | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. | |
| ८३ | ८३ | मस्जिदे अहले हदीस, मुंबई | मस्जिदचे हिशोब सादर न करणे किंवा खात्यामध्ये अनियमितता असणे हा विषय आयोगाच्या कार्यकक्षेबाहेरील असल्याचे नमूद करुन आयोगाने तक्रार दप्तरी दाखल केली आहे. | तक्रार निकाली काढण्यात आली. | |
| ८४ | ८४ | मस्जिदे पलटण, हिंगोलीची बोरजा, ता.औढा, जि. हिंगोली येथील जमीन | बोरजा, ता.औढा, जि. हिंगोली येथील गट नं.168 मधील 3 हे. 63 आर. जमीन मस्जिदे पलटण, हिंगोलीची वक्फ मालमत्ता असल्याचे तसेच सदर जमीन दि.8.6.1995 च्या विक्री करार क्र.2430 अन्वये श्री.शिवाजी दगडू पडोळे व नागोराव परसराम पडोळे यांना रु.90,000/- इतक्या मोबदल्यात विक्री करण्यात आल्याची व त्यावेळी सदर जमिनीचे बाजारमुल्य 1,06,000/- इतके असल्याची आयोगापुढे तक्रार प्राप्त झाली होती. ताब्यात घेण्याच्या दृष्टीने वक्फ मंडळाने वक्फ अधिनियम, 1995 यामधील कलम 52 आणि 54 प्रमाणे कार्यवाही करण्याचे तसेच विक्री करारातील विक्रेता (सलीमखान मजीदखान पठाण व सतारखान ताहेरखान पठाण, रा.पलटण, ता.व जि.हिंगोली) यांच्याविरुध्द फौजदारी कार्यवाही सुरु करण्यात यावी असे आयोगाने नमूद केले असून सदर प्रकरणी वक्फ मंडळाला Bombay Government Premises (Eviction) Act, 1955, the Amendment Act No.1 of 2008, जे दि.27.8.2008 पासून लागू करण्यात आलेले असून यातील तरतुदी वक्फ मालमत्तांना देखिल लागू करण्यात आलेले आहेत, या कायद्यातील तरतुदींतर्गत कार्यवाही करण्याचे | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. तत्कालीन जिल्हा वक्फ अधिकारी, परभणी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | शक्य असल्याचेही आयोगाने नमूद केले आहे.<br>या प्रकरणी जिल्हा वक्फ अधिकारी, परभणी श्री.खूसरोखान व मु.का.अ. श्री.एस.एस.अली कादरी यांनी वक्फ मालमत्तांचे रक्षक म्हणून कार्य पार न पाडता ते वक्फ मंडळातील शत्रू असल्याप्रमाणे वागले आहेत असे देखिल आयोगाने नमूद केले असून त्यांच्याविरुध्द वक्फ मंडळाने व शासनाने कार्यवाही करण्याबाबत शिफारस केली आहे. | | |
| ८५ | ८५<br>नगर<br>विकास<br>विभाग<br>नगर परिषद,<br>खुल्ताबाद | खुलताबाद जि.औरंगाबाद येथील कब्रस्तानाची जागा | सदर वक्फ मालमत्तेवर 20 लोकांनी केलेल्या अतिक्रमणाविषयी आयोगाचा रिपोट नं.65 (प्रस्तुत तक्यातील अ.क्र.76) कृपया पहावा.<br>सदर प्रकरणी तक्रारदाराने आयोगापुढे, वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद यांनी दावा क्र. 3/2007 मध्ये दिलेल्या दि.31.7.2008 च्या आदेशाची प्रत सादर केली. सदर आदेशान्वये दावा क्र.17/2007 पुनर्स्थापित (restore) करण्याची विनंती खारीज केली आहे. या पार्श्वभूमीवर तक्रारदाराने वक्फ अधिनियमातील कलम 54 अंतर्गत किंवा अन्य कायदेशीर तरतुदींनुसार पुढील कार्यवाही करावी असा आयोगाने सल्ला दिलेला असून त्याचप्रमाणे सदर प्रकरणी वक्फ मालमत्ता भाडेपट्टयावर देण्याची कार्यवाही वक्फ मंडळामार्फत न होता ती नगरपरिषदेने केलेली असल्याने व तसे करण्यास नगरपरिषदेकडे कोणतेही अधिकार नसल्यामुळे वक्फ मंडळाने सदर प्रकरणी वक्फ अधिनियमातील कलम 52 आणि 54 अंतर्गत कार्यवाही तातडीने करावी. तसेच, सदर प्रकरणी वक्फ मंडळाला, Bombay Government Premises (Eviction) Act, 1955, the Amendment Act No.1 of 2008, जे दि.27.8.2008 पासून लागू करण्यात आलेले आहे व या कायद्यातील तरतुदी वक्फ मालमत्तांना देखिल लागू करण्यात आलेले आहेत, या कायद्यातील तरतुदींतर्गत कार्यवाही करण्याचे शक्य असल्याचेही आयोगाने नमूद केले आहे. | प्रकरणाची तपासणी करुन वक्फ मालमत्ता ताब्यात घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे आदेश मु.का.अ, म.रा.व.मं यांना द्यावेत.<br>सदर प्रकरणी गुंतागुंत निर्माण करण्यास नगरपरिषद खुलताबाद व तेथील मुख्य कार्यकारी अधिकारी जबाबदार असल्याने शासनाने त्यांच्याविरुध्द कार्यवाही करावी असे आयोगाने नमूद केले आहे. | |
| ८६ | ८६<br>मु.का.अ.,<br>एस.एस.ए.<br>काद्री | दर्गाह हजरत शाह पीर मोहम्मद, औरंगाबाद | सदर प्रकरणी वक्फ मंडळाने वक्फ अधिनियम, 1995 यातील कलम 52 आणि 54 अंतर्गत कार्यवाही तातडीने करावी. तसेच, सदर प्रकरणी वक्फ मंडळाला, Bombay Government Premises (Eviction) Act, 1955, the Amendment Act No.1 of 2008, जे दि.27.8.2008 पासून लागू करण्यात आलेले आहे व या कायद्यातील तरतुदी वक्फ मालमत्तांना देखिल लागू करण्यात आलेले आहेत, या कायद्यातील तरतुदींतर्गत कार्यवाही करण्याचे शक्य | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | असल्याचेही आयोगाने नमूद केले आहे. | अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. | |
| ८७ | ८७ | म्युन्सिपल घर नं. 2-2-52, बीड | सदर प्रकरणी आयोगाकडून विविध इसमांना व अभिकरणांना बजावण्यात आलेल्या नोटीसींना कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. या प्रकरणी जागेच्या क्षेत्रफळाबद्दल वाद असून तक्रारदाराने जागेचा ताबा मागितला असल्याने व हे विषय आयोगाच्या कार्यकक्षेबाहेरील असल्याचे नमूद करुन आयोगाने प्रकरण निकाली काढले. | क्षेत्रफळाबद्दलचे वाद. कमिशनचे कार्यक्षेत्र नाही. | |
| ८८ | ८८ | जामा मस्जिद, अंबेजोगाई, जि.बीड | जामा मस्जिद, अंबेजोगाई, जि.बीड येथील सर्व्हे क्र. ७६, १२६, १४१,१४३, १५५, २२४, ३६६, ३६९, ३७५, ४३५, ४३६, ४९८, ४९९, ५००, ५०१, ५०२, ५०३ आणि ५७३ मधील एकूण ४६२ एकर ५ गुंठे इतकी जागा मुतखब १८५७ खाली मंजूर आहे. मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. २८२३/१९८१ मध्ये दि. १३.८.१९९० रोजी असे आदेश दिले आहेत की, या मुंतखब अंतर्गत असलेल्या जागा या खाजगी इनाम - मदतमाश असून या जागा मश्रुतुल खिदमात (Service Inam) नाहीत. या जागेच्या स्वरुपाविषयी महसूल अधिकाऱ्यांनी अनेक परस्परविरोधी आदेश दिलेले आहेत.<br>पूर्वी उपजिल्हाधिकारी (भू.सु.) यांनी क्र. ८१/एमआयए/९, दि.३०.९.१९९२ च्या आदेशान्वये असे स्पष्ट केले आहे की, मुतखब १८५७ खालील जमिनी या धार्मिक सेवेसाठी असून जामा मस्जिदशी जोडलेल्या आहेत. त्या हैद्राबाद अबॉलिशन ऑफ इनाम्स अँड कॅश ग्रँट ॲक्ट १९५४ खाली निरसीत करता येणार नाहीत. दिवाणी न्यायालयाने दावा क्र. १२४/१९५६ मध्ये असे स्पष्ट केले आहे की, सर्व्हे क्र. ४९९ आणि सर्व्हे क्र. ५०१ या धार्मिक कार्यासाठी देण्यात आलेल्या इनाम जमिनी आहेत. मा.उच्च न्यायालयाने दिवाणी न्यायालयाने दिलेले सदर आदेश योग्य ठरविले आहेत.<br>अपर जिल्हाधिकारी, बीड यांनी त्यांचे आदेश क्र. पीके-९१/सीडी/ १/ अपील/आरओआर/७२, दि. २६.११.१९९३ असे स्पष्ट केले आहे की, सर्व्हे क्र. ३६६ आणि ३६९ मधील जमिनी धार्मिक संस्थांच्या इनाम जमिनी असून त्या हस्तांतरणीय नाहीत.<br>सदर निर्णयास आव्हान देण्यात आलेले नाही.<br>तद्नंतर श्री. पी. बी. आरोसकर, उपजिल्हाधिकारी (भू.सु.) यांनी दि.१०.६.१९९८ रोजी असे आदेश दिले आहेत की, सर्व्हे क्र. ३६६, ३७५, ४९९ए, ४९९बी आणि ५०१/१/ए या जमिनी कम्युनिटी सर्व्हिस इनाम जमिनी असून त्यांनी हैद्राबाद अबॉलिशन ऑफ इनाम्स अँड कॅश ग्रँट ॲक्ट १९५४ | मालमत्तेच्या स्वरुप बद्दलची कायदेशीर गुंतागुंत विचारात घेता, विधीविषयक सल्ला घेऊन या.क्र.2823/81 संदर्भात यथोचित अभिकरणात अपिल दाखल करण्याबाबत वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत.<br>MLRC अंतर्गत विहित कालावधीत तातडीने नोटीस देऊन ज्या सर्व्हे नं. मधील जे इनाम अद्याप निरसित झालेले नाहीत, त्यामध्ये जामा मस्जिदच्या नावाची नोंद कब्जेदार रकान्यात तातडीने घेण्यासाठी जिल्हाधिकारी, बीड यांना महसूल व वन विभागाकडून आदेश देण्यात यावेत.<br>मुकाअ, वक्फ मंडळ जिल्हाधिकाऱ्यांशी तातडीने संपर्क साधून वक्फ मालमत्तेवरील अतिक्रमणे हटविण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम, 1995 च्या कलम 54 आणि 55 येथील तरतुदींनुसार महसुली अधिकाऱ्यांच्या सहाकार्याने कार्यवाही करावी.<br>आयोगाने नमूद केलेल्या वक्फ मालमत्तांच्या हस्तांतरणाविरुध्द कार्यवाही करुन या जमिनींचा ताबा वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या देखिल वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |

खाली ताबा अधिकार मंजूर केला आहे. या प्रकरणी केवळ राज्य शासन प्रतिवादी होते म्हणून महत्वपूर्ण बाबी नोंदीवर घेण्यात आल्या नाहीत. यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. २८२३/१९८१ चा आधार घेण्यात आला.

महसूल राज्यमंत्री यांनी अपील क्र. एचआयए/४१/ए/२०००/पीके १५३/एल-३, दि. २८.१०.२००२ बाबत उपरोक्त निकालावर शिक्कामोर्तब केले.

उप जिल्हाधिकारी, अंबेजोगाई यांनी दि. ३०.७.१९९३ रोजी सर्व्हे क्र. ३७५, ४९९, ४९९ए, ५०१बी वरील Jama Masjid & Archak हे शब्द वगळण्याबाबतचा अर्ज फेटाळून लावला. श्री. महंमद झैनुल आबेदीन पिता महंमद जहुरोद्दीन यांनी या प्रकरणी विरोधाभासात्मक पुरावे दिले आणि यापूर्वी उपजिल्हाधिकारी, अतियात यांच्यासमोर दि. १२.८.१९८२ रोजी त्यांनी असे नमूद केले की, मुंतखब १८५७ खालील जमिनी जामा मस्जिद साठी सर्व्हिस इनाम आहेत. म्हणून ते घोटाळेखोर ठरतात. श्री. डी. आर. बन्सड, उप जिल्हाधिकारी (अतियात) यांनी दि. २८.२.१९८९ रोजी तहसलिदार यांचे कार्यवृत्त रद्दबातल ठरविले. ज्यामध्ये तहसिलदाराने असा निर्णय दिला होता की, मुतखब १८५७ मधील जमिनी शासनाकडे घेण्यात याव्यात कारण काही इनामदार मस्जिद साठी सेवा पुरवित नाहीत. श्री.सुजाउद्दीन पिता हसन मोईउद्दीन आणि अहमद मोईउद्दीन हे या जमिनींशी संबंधित विरोधाभासात्मक विधान करीत असल्याचे व ते घोटाळ्या प्रकरणी दोषी असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले.

उप जिल्हाधिकारी यांनी खालील प्रकरणी इनाम निरसीत करण्याबाबत संदर्भ केला आहे.

१) आयुक्त, औरंगाबाद यांचे आदेश क्र. अपील/ए-२२/७१, श्री. सुजाउद्दीन विरुध्द राज्य शासन, अन्वये श्री. गोविंदराव आणि विजयकुमार यांच्या ताब्यातील सर्व्हे क्र. ४९९/५ आणि ५०१बी व १४३ मधील इनाम निरसीत केले.

२) श्री. ज्ञानोबा पिता नामदेव पवार यांच्या ताब्यातील सर्व्हे क्र. ४९३ मधील जागा इनाम निरसीत केले.

३) क्र. ७१.एच/ए/५ अन्वये सर्व्हे क्र. ५९६, ३४४, ३४५ मधील इनाम निरसीत केले.

४) श्री. गोविंदराव निवृत्तीराव चिखलीकर यांच्या ताब्यातील सर्व्हे क्र. १४३ येथील इनाम, आदेश क्र. १९७१/WTA/Appeal/11/H.A./71, दि. ४.८.१९७१ अन्वये निरसीत केले.

तथापि, या जागांशी संबंधित रिट याचिका क्र. १०४८/१९९४,

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ३६१०/२००३ आणि ७४७१/२००५ मा. उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत.<br>मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. २८२३/१९८१ मध्ये या जागा मदत माश असल्याच्या आदेशाशी आयोग सहमत नाही. आयोगाचे असे म्हणणे आहे की, खुतबा पठणासाठी देण्यात आलेली देणगी, उदा. खिताबत ही देणगी पदासाठी आहे. म्हणजे ही खुतबा पठण करण्यासाठी असून खतीब म्हणून असलेल्या व्यक्तिसाठी नाही. म्हणून मुतखब १८५७ ही वैयक्तिक देणगी नसून विशिष्ट सेवा पुरविण्यासाठी देण्यात आलेली देणगी आहे. म्हणून हैद्राबाद अबॉलिशन ऑफ इनाम्स अँड कॅश ग्रँट अ‍ॅक्ट १९५४ च्या तरतूदी या जमिनींसाठी आकर्षित होत नाहीत आणि म्हणून या अधिनियमाच्या कलम १(2)(i) च्या तरतूदीतून यास सूट देण्यात यावी. मा.सर्वोच्च न्यायालयाने (AIR 1998 SC 972 मधील परिच्छेद क्र. ६) दिलेल्या निर्णयामध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ६(4) नुसार प्रसिध्द केलेली वक्फ ची यादी जर ती दिवाणी न्यायालयाच्या निर्णयान्वये बदलण्यात आली असेल तर अंतिम व निर्णायक असेल. या प्रकरणी आयोगाने असे मत व्यक्त केले की, वक्फ मालमत्तेबाबत राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेस कोणत्याही संबंधित पक्षाने आव्हान देण्याकरिता दावा दाखल केला नाही. म्हणून या नोंदी निर्णायक स्वरुपात वक्फच्याच नोंदी आहेत.<br>मा. मंत्री महोदयांनी दिलेले आदेश उपरोक्त अ.क्र. १ ते ६ मध्ये अंतर्भूत आहेत.<br>इनामाच्या वारसास मंजूरी देण्याबाबत महसूली अधिकाऱ्यांनी काही प्रकरणांमध्ये अनावश्यक विलंब केला असल्याचे आयोगाने निदर्शनास आणले आहे.<br>i) अतियात इन्क्वायरी अ‍ॅक्ट - श्री. गुलाम जिलानी यांनी मुळ याचिका १९७३ मध्ये दाखल केली. त्यांचा मृत्यू १९९७ साली झाला. हे प्रकरण दि. १.७.१९९८ रोजी फेटाळले गेले. पुर्ननिरिक्षणामध्ये हे प्रकरण फेटाळण्यात आले. मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. १०३६/२००३ अन्वये हे प्रकरण दाखल करुन घेतले आणि कनिष्ठ न्यायालयाकडे पाठविले. यामधून अंतिमत: काय निष्पन्न झाले याची माहिती नाही.<br>ii) अपर जिल्हाधिकारी यांनी दि. २३.२.१९९९ रोजी पारीत केलेले आदेश, आणि महसूल अधिकाऱ्याचे दि. १०.७.२००० चे आदेश आणि कनिष्ठ न्यायालयाचे दि.१.७.१९९८ चे आदेश मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. १५०७/२००१ अन्वये रददबातल ठरविले.<br>iii) उपजिल्हाधिकारी अतियात यांनी रिट याचिका क्र. १५०७/२००१ ऐवजी रिट | | |

याचिका क्र. २८२३/१९९१ च्या आधारे दि. २५.४.२००८ च्या आदेशान्वये वारसा हक्काचा दावा फेटाळला. आयोगाच्या मते यावरुन काही महसूल अधिकारी वक्फ मालमत्तेच्या विरोधात होते, असे दिसून येते.

या जमिनीमधील अनेक प्लॉट्स बदलाची प्रकरणे आयोगाने खालीलप्रमाणे निदर्शनास आणली आहेत. ज्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ आणि जिल्हा वक्फ अधिकारी यांनी दखल घेतली नाही.

अंबेजोगाई टाईम्स या वृत्तपत्रातील दि. १५.२.२००७ च्या अंकातील बातमीनुसार श्री. शेख मोहीउद्दीन पिता सिराज मोहीउद्दीन यांनी सर्व्हे क्र. ४३५/३ मधील प्लॉट श्रीमती शुभांगी दत्तात्रय बोडके यांना विकला. आयोगाने याबाबत मोठया प्रमाणावर विभागीय आयुक्त ते तलाठी यांच्यापर्यंतच्या महसूली अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार केला. तथापि, तलाठयाने कब्जेदार रकान्यामध्ये वक्फ च्या नावाची नोंद घेण्याच्या आदेशाचे पालन केले नाही. आणि याबाबत संशय व्यक्त केला की, अशाप्रकारची नोंद सर्व प्रकरणात करावी लागेल किंवा ज्यांचे इनाम निरसीत झालेले नाहीत फक्त त्या प्रकरणामध्ये करावी लागेल. याबाबत त्यांना खालीलप्रमाणे निदेश देण्यात आले होते तरी देखील त्यांनी वरील शंका उपस्थित केली.

अ) उप जिल्हाधिकारी अतियात, अंबेजोगाई यांनी तहसिलदार, अंबेजोगाई यांना त्यांच्या दि. १३.२.२००६ च्या पत्रात वक्फ संस्थांची नांवे, कब्जेदार रकान्यामध्ये समाविष्ट करावीत, असे कळविले होते.

ब) उप जिल्हाधिकारी (भू.सु.) यांनी तहसिलदार, अंबेजोगाई यांना त्यांच्या दि. १२.४.२००७ च्या पत्रान्वये अर्जदार श्री. महंमद उस्मान यांच्या दि.२०.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे जामा मस्जिद चे नाव ७/१२ च्या उताऱ्यामध्ये समाविष्ट करावे, असे कळविले होते.

क) उप जिल्हाधिकारी (भू.सु.) यांनी तहसिलदार, अंबेजोगाई यांना त्यांच्या दि. १३.४.२००७ च्या पत्रान्वये फेरफार करुन जामा मस्जिद चे नाव ७/१२ च्या उताऱ्यातील कब्जेदार रकान्यामध्ये समाविष्ट करावे, असे कळविले होते.

ड) याच विषयावर उप जिल्हाधिकारी यांनी तहसिलदार, अंबेजोगाई यांना त्यांच्या दि. १८.४.२००७ च्या पत्रान्वये कळविले होते. तहसिलदार, अंबेजोगाई यांनी त्यांच्या दि. ३०.७.२००७ च्या पत्रान्वये उपजिल्हाधिकारी (भू.सु.) यांना कळविले की, सर्व्हे क्र. १५५, ३६६, ३६९, ३७५, ४९९, ४३६, ४९८, ५००, ५०१ आणि ५९६ मधील इनाम निरसीत करण्यात आले आहेत आणि उर्वरित सर्व्हे नं. मधील इनाम निरसीत करण्यात

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आलेले नाहीत.<br>आयोगाने महसूली अधिकाऱ्यांशी मोठ्या प्रमाणावर केलेल्या अनेक पत्र व्यवहारांचा उल्लेख करुन, या प्रकरणी झालेला विलंब म्हणजे महसूली अधिकाऱ्यांनी जाणून बुजुन वक्फ मालमत्तेमध्ये गुंतागुंत निर्माण केली, असे ताशेरे ओढले आहेत. | | |
| ८९ | ८९ | मस्जिद चोरगल्ली, गेवराई, बीड | मस्जिद चोरगल्ली, मादळमोही (जव्हारवाडी) ता. गेवराई, जि. बीड येथील सर्व्हे क्र. ५१६ मधील २९ एकर १८ गुंठे, सर्व्हे क्र. ५१७ मधील २४ एकर, सर्व्हे क्र. २७३ मधील २९ एकर ३६ गुंठे आणि सर्व्हे क्र. ७७४ मधील ३० एकर ११ गुंठे अशी एकण ११३ एकर २५ गुंठे इतकी जागा महाराष्ट्र कृषि कमाल जमीन धारणा अधिनियम, १९६१ अन्वये अतिरिक्त घोषित करण्यात आली असून मुतवल्लींनी याबाबत तक्रारी केल्यानंतर देखील तहसिलदार व उपविभागीय अधिकारी, गेवराई यांनी दि. ३.१२.२००५ पासून सदर जमिनी इतरांना वितरीत केल्या आहेत. महाराष्ट्र कृषि कमाल जमीन धारणा अधिनियमातून सूट देण्याबाबत इनामदारांनी दि. १४.२.२००४ रोजी उपजिल्हाधिकारी (भु.सु.) यांचेकडे अर्ज दाखल केला होता. अधिनियम संमत झाल्यानंतर अधिनियमातून सूट मागणाऱ्या मुतवल्लींकडून जमीन परताव्याबाबत काहीही दाखल करण्यात आले नाही. | महाराष्ट्र कृषि कमाल जमीन धारणा अधिनियम, १९६१ च्या तरतूदीतून वक्फ जमिनीकरिता सूट देता येऊ शकेल किंवा कसे, याबाबत महसूल व वन विभाग आणि कृषि विभागाने तपासणी करावी.<br>कमाल जमीन धारणा अधिनियमामध्ये सुधारणा करुन वक्फ मालमत्तेला या अधिनियमातून सूट देण्याबाबत राज्य शासनाने विचार करावा. | |
| ९० | ९० | पळशी-शहर,औरंगाबाद येथील मस्जिदची वक्फ मालमत्ता | सदर प्रकरणी आर.सी.एस.क्र.334/83 मध्ये दि.30/06/2005 रोजी देण्यात आलेले डिक्री आदेश व अपिल क्र.337/2005 प्रकरणी दि.16/03/2006 रोजी झालेला निवाडा हे दोन्ही न्यायालयीन आदेश वक्फ अधिनियम, 1995 अंमलात आल्यानंतरच्या कालावधीतील असून सदर कायद्यातील तरतुदींनुसार वक्फ प्रकरणासंबंधातील वाद वक्फ न्यायाधिकरणाने हाताळणे आवश्यक आहे. सदर विचारात घेऊन वक्फ मंडळाने पुढील कायदेशीर कार्यवाही करावी, अशी आयोगाने शिफारस केली आहे. | वक्फ मंडळास कायदेशीर कार्यवाही करण्याचे निदेश द्यावेत. | |
| ९१ | ९१ | कामीलदाद शहा व एकखाना मस्जिद, नांदेड | कामीलदाद शहा व एकखाना मस्जिद, नांदेड येथील सर्व्हे नं. १ मधील ३ एकर ३० गुंठे इतकी जागा दि. ३१.१०.१९७४ च्या शासकीय राजपत्रात वक्फ म्हणून नोंद आहे. ही जागा शासनाने घेतली असून वक्फ ला परत केली नाही. शासनाने या जागेपैकी १ एकर ९ गुंठे इतकी जागा नांदेड महानगरपालिकेला टांगा स्टँड साठी भाड्याने दिली आहे. महानगरपालिकेने ही जागा इतर लोकांना भाड्याने दिली आहे. या सर्व्हे क्र. तील लोकांनी केलेले अतिक्रमण जिल्हाधिकाऱ्यांनी नियमित केले आहे. जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्या | सदर वक्फ जागा शासनाने का व कशी घेतली, याबाबतचा तपशील जिल्हाधिकारी, नांदेड यांचेकडून महसूल विभागाने मागवावा. जागा वक्फ मंडळाकडे पूर्ववत करावी. सदर जागा वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याचे वक्फ मंडळाला निदेश देण्यात यावेत. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | निष्काळजीपणामुळे वक्फ मालमत्तेचे नुकसान झाले आहे. सदर जागा परत मिळवण्यासाठी किंवा त्याची मोजणी करुन जागा ताब्यात घेणे किंवा भाडेपट्टा नियमित करणे याबाबत वक्फ मंडळाने कार्यवाही सुरु करावी. | | |
| ९२ | ९२ | दर्गाह शाह जमालबाबा, जि.औरंगाबाद | सदरचे इनाम खालसा होण्यास पात्र आहे किंवा कसे याचा बोध होत नाही. सदर प्रकरणी आवश्यक कागदपत्रे समोर नसल्याने भाष्य करता येत नसल्याचे आयोगाने नमूद केले आहे. | अभिप्राय नाहीत. कागदपत्रे सादर करण्यात आली नाहीत. | |
| ९३ | ९३ | पुणे जिल्हयातील विविध वक्फ मालमत्ता | सदर प्रकरणी तक्रारदारांनी विक्री, भाडेपट्टा वा इतर कोणतीही अनियमितता झाल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणलेले नाही. सबब, आयोगाने तक्रार दप्तरी दाखल केली आहे. | दप्तरी दाखल. कागदपत्रे सादर करण्यात आली नाहीत. | |
| ९४ | ९४ | सारंगपूरा बीड येथील मस्जिद | प्रस्तूत प्रकरणी वक्फ मंडळात ठराव पारीत करण्याबाबत काहीही उल्लेख नाही. त्यामुळे सदर प्रकरणी करण्यात आलेला व्यवहार बेकायदेशीर ठरतो. सदर प्रकरणी झालेल्या बेकायदेशीर व्यवहारास श्री.रोशन अली मुनवर अली हे जबाबदार असल्याचे तथापि, ते आता मयत झाल्याचे आयोगाने नमूद केले आहे.<br>सदर पकरणी झालेल्या व्यवहारासाठी मु.का.अ./ सचिव, वक्फ मंडळ तसेच जिल्हा वक्फ अधिकारी, बीड हे जबाबदार असल्याचे आयोगाने नमूद केले आहे. सदर प्रकरणी वक्फ मंडळाने वक्फ अधिनियम, 1995 यातील कलम 52 आणि 54 अंतर्गत कार्यवाही तातडीने करावी. तसेच, सदर प्रकरणी वक्फ मंडळाला, Bombay Government Premises (Eviction) Act, 1955, the Amendment Act No.1 of 2008, जे दि.27.8.2008 पासून लागू करण्यात आलेले आहे व या कायद्यातील तरतुदी वक्फ मालमत्तांना देखिल लागू करण्यात आलेले आहेत, या कायद्यातील तरतुदींतर्गत कार्यवाही करण्याचे शक्य आहे. | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. | |
| ९५ | ९५ | श्री.शेख नईम शेख लाल, रा.हिंगोली यांनी केलेली तक्रार | तक्रारदाराची मागणी आयोगाच्या अधिकार कक्षेबाहेरील असल्याने आयोगाने तक्रार दप्तरी दाखल केली आहे. | मु.का.अ., एस.एस.ए. काद्री यांची बदली करण्याविषयी तक्रार. आयोगाच्या अधिकार कक्षेबाहेरील प्रकरण. | |
| ९६ | ९६ | श्री.आय.ए. सय्यद, रा.पुणे यांनी केलेली तक्रार | सुन्नी दर्शविण्यात आलेल्या शिया मालमत्तां विषयीच्या राजपत्रातील नोंदी दुरुस्त करणेबाबत. | आयोगाच्या अधिकार कक्षेबाहेरील प्रकरण असल्याने दप्तरी दाखल. | |
| ९७ | ९७ | कप्तान सय्यद हुसैन सय्यद अहमद मेहंदी, रा.हैद्राबाद, आंध्रप्रदेश यांनी केलेली तक्रार | मुतवल्लींची नेमणूक करण्याविषयी राहत मागण्यात आली होती. | आयोगाच्या अधिकार कक्षेबाहेरील प्रकरण असल्याने दप्तरी दाखल. | |
| ९८ | ९८ | डॉ.मोहम्मद खलील पठाण कादरी, | मस्जिदचे पेश इमाम आणि दर्गाचे ट्रस्टी यांच्याकडून त्यांच्या जीवाला धोका | आयोगाच्या अधिकार कक्षेबाहेरील प्रकरण | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | माहीम, मुंबई यांनी केलेली तक्रार | असल्याबाबतची तक्रार. | असल्याने दप्तरी दाखल. | |
| ९९ | ९९ | श्री.मोहम्मद उस्मान गुलाम जिलानी खतीब रा.आंबेजोगाई, जी.बीड यांनी केलेली तक्रार | कोणतेही तोंडी अथवा लेखी पुरावे सादर करण्यात न आल्याने आयोगास भाष्य करणे शक्य नसल्याचे नमूद करुन आयोगाने सदरची तक्रार दप्तरी दाखल केली आहे. | दप्तरी दाखल. कागदपत्रे सादर करण्यात आली नाहीत. | |
| १०० | १०० | दर्गाह सय्यद शाह रजीउद्दीन मक्की, मोमीनपुरा, बीड | वक्फ मालमत्ता भाडे-पट्टयावर देताना कायदेशीर तरतुदीचे भंग, ही बाब रिपोर्ट क्र.15, 16 आणि 17 येथे यापुर्वीच हाताळण्यात आलेले असल्याने या प्रकरणी स्वतंत्ररित्या निष्कर्ष नोंदविण्यात आलेले नसल्याचे आयोगाने नमूद केले आहे. | सदर प्रकरणे आधीच हाताळण्यात आलेली आहेत. स्वतंत्र निरिक्षण नोंदविण्यात आलेले नाही. | |
| १०१ | १०१ | दै.रहेबर (उर्दु) आणि दै.हिंदुस्थान या वर्तमानपत्रात दि.18.1.2010 रोजी प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने आयोगाने स्वत:हून केलेली कार्यवाही. | सदर प्रकरणी जानेवारी, 2010 मध्ये बातमी प्रसिध्द होऊन देखिल यासंदर्भात तपशील देण्यासाठी कोणीही व्यक्ती आयोगापुढे हजर झाला नाही व त्यामुळे आयोगाला या प्रकरणी दखल घेता आली नसल्याचे नमूद करुन आयोगाने तक्रार दप्तरी दाखल केली आहे. | दप्तरी दाखल. तपशील देण्यात आला नाही. | |
| १०२ | १०२ मालमत्ता संबंधीचा वाद नाही. | अजमल खान, रा. नाशिक यांनी टपालाद्वारे केलेली तक्रार | वक्फ मंडळाचे नाशिक भागातील प्रतिनिधी म्हणून देण्यात आलेले दि.21.02.2008 चे पत्र मागे घेण्यात आल्याविषयीची तक्रार. आयोगाच्या अधिकार कक्षेबाहेरील प्रकरण असल्याने दप्तरी दाखल. | आयोगाच्या अधिकार कक्षेबाहेरील प्रकरण असल्याने दप्तरी दाखल. | |
| १०३ | १०३ | दर्गाह हजरत दाऊद गंज लष्करी मगरिबी अवलिया, औरंगाबाद | सदर प्रकरणी तक्रारदाराने वक्फ न्यायाधिकरणापुढे दावा क्र.198/2006 दाखल करुन निषेधाज्ञा (injunction) साठी अर्ज केला होता व ते त्याला मंजूर करण्यात आले असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने केवळ वस्तुस्थिती नमूद करण्यात येत असल्याचे आयोगाने नमूद केले आहे. | वक्फ न्यायाधिकरणापुढे दावा क्र.198/2006 अन्वये न्यायप्रविष्ट. | |
| १०४ | १०४ मालमत्ता संबंधीचा वाद नाही. | श्री.असर फारुखी, अध्यक्ष औकाफ परिषद, औरंगाबाद यांनी केलेली तक्रार | श्री.एस.एस.ए. काद्री यांची मुकाअ पदासाठीची पात्रता आणि तारिक अन्वर यांच्या सदस्यत्वाबद्दलची तक्रार. | मु.का.अ. यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्याने निरिक्षण नोंदविण्यात आले नाही. | |
| १०५ | १०५ | मस्जिद महेबूबशाही, परभणी | वक्फ न्यायाधिकरणापुढे दावा क्र.83/2008 अन्वये न्यायप्रविष्ट. | वक्फ न्यायाधिकरणापुढे न्यायप्रविष्ट. | |
| १०६ | १०६ मालमत्ता संबंधीचा वाद नाही. | इफ्तेखारुल्लाह बेग, सचिव, मराठवाडा वक्फ मंडळ कर्मचारी संघटना, यांनी केलेली तक्रार | सचिव, मराठवाडा वक्फ कर्मचारी संघटना यांनी त्यांच्या पेन्शनविषयीच्या दाव्याबद्दल तसेच वक्फ जमिनीवरील सिडकोसारख्या शासकीय यंत्रणांकडून करण्यात आलेल्या अतिक्रमणाबाबत. | दप्तरी दाखल. सदर प्रकरणी शासनाने निर्णय घेणे अपेक्षित. | |
| १०७ | १०७ | दर्गाह हजरत शाह पीर मोहम्मद, | सदर प्रकरणी वक्फ मंडळाने वक्फ अधिनियम, 1995 यातील कलम 52 | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | घांधेली, ता.जि.औरंगाबाद | आणि 54 अंतर्गत कार्यवाही तातडीने करावी. तसेच, सदर प्रकरणी वक्फ मंडळाला, Bombay Government Premises (Eviction) Act, 1955, the Amendment Act No.1 of 2008, जे दि.27.8.2008 पासून लागू करण्यात आलेले आहे व या कायद्यातील तरतुदी वक्फ मालमत्तांना देखिल लागू करण्यात आलेले आहेत, या कायद्यातील तरतुदींतर्गत कार्यवाही करण्याचे शक्य असल्याचेही आयोगाने नमूद केले आहे. | आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. | |
| १०८ | १०८ | दर्गाह हजरत सय्यद शाह गुलाम हुसेन कादरी, किल्ले अर्क, कलां दरवाजा, औरंगाबाद | आयोगाचे कामकाज संपुष्टात येत असल्याने आयोगाला याबाबत अधिक तपास करणे शक्य झालेले नसल्याने सदर प्रकरण तपासणीसाठी खुले ठेवण्यात येत असल्याचे आयोगाने नमूद केले आहे. | निरिक्षण नोंदविण्यात आले नाही. अपुरे कागदपत्र सादर करण्यात आले. | |
| १०९ | १०९ मुतवल्ली विषयीची तक्रार | मस्जिद चांदगाव, ता.वैजापूर, जि.औरंगाबाद | बेकायदेशीर भाडेपट्टा. श्रीमती नूरजहान बेगम व श्रीमती बिल्कीस जहान बेगम या मुतवल्ली असलेल्या दोन्ही महिलांविरुध्द mischief, falsification of record by facrication and forgery, together with the other penal provisions अंतर्गत फौजदारी गुन्हा नोंदविणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. मुतवल्ली मशिदीची सेवा करायला तयार नाहीत. त्यामुळे या मुतवल्लींना मुतवल्ली पदावरुन काढून टाकून त्यांच्याविरुध्द फौजदारी कार्यवाही सुरु करण्यात यावी अशी आयोगाची शिफारस आहे.<br>सदर प्रकरणी वक्फ मंडळाने वक्फ अधिनियम, 1995 यातील कलम 52 आणि 54 अंतर्गत कार्यवाही तातडीने करावी. तसेच, सदर प्रकरणी वक्फ मंडळाला, Bombay Government Premises (Eviction) Act, 1955, the Amendment Act No.1 of 2008, जे दि.27.8.2008 पासून लागू करण्यात आलेले आहे व या कायद्यातील तरतुदी वक्फ मालमत्तांना देखिल लागू करण्यात आलेल्या आहेत, या कायद्यातील तरतुदींतर्गत कार्यवाही करण्याचे शक्य असल्याचेही आयोगाने नमूद केले आहे. | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकते-नुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या तसेच, श्रीमती नूरजहान बेगम व श्रीमती बिल्कीस जहान बेगम या मुतवल्ली असलेल्या दोन्ही महिलांविरुध्द mischief, falsification of record by facrication and forgery, together with the other penal provisions अंतर्गत फौजदारी गुन्हा नोंदविणे शक्य असल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. | |
| ११० | ११० | दर्गाह दंडेशाहवली, औरंगाबाद | औरंगाबाद महानगरपालिकेने बेकायदेशीरपणे अतिक्रमित केल्याची तक्रार. तक्रारदाराने वकफ मंडळाकडे तक्रार नोंदविल्यानंतर दै.इन्साफ मध्ये दि.30/03/2008 रोजी जाहिरात देऊन सदर जागा वक्फ मालमत्ता म्हणून | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नोंदविण्याविषयी हरकती मागविण्यात आल्या होत्या. तद्नंतर याप्रकरणी काय प्रगती झाली ते स्पष्ट नाही. सिटी सर्व्हे च्या अभिलेखात ही मालमत्ता वक्फ म्हणून दर्शविण्यात आलेली नाही. | अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. | |
| १११ | १११ | दर्गाह हजरत शाह अली, नांदेड | नांदेड येथील सर्व्हे क्र.4 मधील 3 एकर 23 गुंठे इतकी जमीन दर्गाह हजरत शाह अली नांदेड या वक्फ संस्थेच्या मालकीची असल्याबाबत तोंडी तक्रार प्राप्त झाली होती. मुकाअ, वक्फ मंडळ तसेच जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड यांच्याकडून प्रतिसाद देण्यात आला नाही. सबब, वक्फ मंडळाने त्यांच्याविरुध्द कार्यवाही करावी. | निरिक्षण नोंदविण्यात आले नाही. कोणतीही माहिती पुरविण्यात आली नाही. तक्रारदाराने कोणतेही पुरावे सादर केले नसल्याचे दिसून आले. | |
| ११२ | ११२ | जामा मस्जिद, वैजापूर जि.औरंगाबाद | दैनिक लोकमत टाईम्स मध्ये दि.29.09.2010 रोजी वक्फ मालमत्तेच्या खोट्या 7/12 उताऱ्याबद्दल बातमी छापून आली होती. पोलिस उप निरिक्षक आणि मुकाअ, वक्फ मंडळ यांच्याकडून कोणतेही सहकार्य करण्यात आले नाही. | मु.का.अ. यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही. सबब, कोणतीही चौकशी करणे शक्य झाले नाही. | |
| ११३ | ११३ | मस्जिद पिंपळनेर, जि.बीड | जिल्हा वक्फ अधिकारी, बीड श्री.मकसूद अहमद यांनी आयोगापुढे दाखल करण्यात आलेल्या उत्तरात उपरोक्त वक्फ जमीन दोन इसमांना 51 वर्षाच्या भाडेपट्ट्यावर वार्षिक रु.1000/- भाडयावर देण्यात आल्याचे कबूल केले. वक्फ अधिनियम, 1995 मधील कलम 56 येथील तरतुदींचे भंग करुन सदरचे व्यवहार करण्यात आलेले असल्याने ते रद्द करुन संबंधित वक्फ जमीन वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्यात यावी व नव्याने व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देऊन निविदा मागवून सदर जमीन भाडेपट्टयावर देण्याबाबत नव्याने कार्यवाही करण्यात यावी, अशी आयोगाने शिफारस केली आहे.<br>दि.08/05/1978 चे करार व दि.03/06/1996 चे आदेश बेकायदेशीर असल्याने ते करणारे वक्फ मंडळाचे तत्कालीन चेअरमन व सदस्य, जर ते हयात असतील तर, त्यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, अशी देखिल आयोगाने शिफारस केली आहे. | सदर प्रकरणाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार संबंधित मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियम 1995 तसेच वक्फ (सुधारणा) अधिनियम, 2013 च्या कलम 52 व 54 प्रमाणे कार्यवाही करण्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांना सूचना देण्यात याव्यात. | |

-=:oooOooo:=-